
साप्ताहिक

# माणूस

१८ सप्टेंबर ८२
दोन रुपये



भगवान रजनीश
यांचं
नवं
‘सिपिरिच्यूअल कम्यून’
अॅन्टेलॉप

जुस्तजू
जिसकी थी
उसको तो
न पाया हमने।
इस बहानेसे
मगर देखली
दुनिया हमने॥
उमरावजानचं
हे दुःख
अधुरं वाटत
राहतं.........



स्ट्रेंजर
ते
जेनेट
हॅराल्ड
रॉबिन्सचा
‘ओल्या
स्वप्नांचा
धंदा.........

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : पंधरावा १६

१८ सप्टेंबर १९८२

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

अनंत सालकर

# तथास्तु

आपला अंत जवळ आला की गरुड-पक्षी दूरच्या, उंचीवरल्या एखाद्या डोंगरकपारीचा आश्रय घेतो आणि स्वत.ला खाली लोटून घेऊन मृत्युमुखी पडतो. कुणालाही गुरुडपक्षाचे मरण दिसत नाही, अशी एक आख्यायिका आहे.

हत्ती या महाकाय प्राण्याचा मृत्यूही असाच इतरांपेक्षा वेगळा व अदृश्य स्थितीचा असतो असे म्हणतात. शेवट जवळ आलेला हत्ती आपल्या कळपापासून दूर होतो, मागे राहतो आणि जेथे कुणी पाहणार नाही अशा एखाद्या घनदाट ठिकाणी निवातपणे एकटाच तो मृत्यूच्या स्वाधीन होतो.

सत्यकथा मासिकाचा शेवट असाच काहीसा वाटला.

शेवटी कोण कायमचा अमरपट्टा घेऊन या जगात आलेला असतो ?

पण प्रत्येकाचे जाणे हे वेगवेगळे असू शकते.

सत्यकथेचे जाणे हे एखाद्या गरुड-पक्षाच्या जाण्यासारखे वाटते ते यामुळेच. तीच मनस्विता ! तोच दूरस्थभाव ! तीच उंचीवरून स्वत:ला लोटून घेऊन केलेली जीवनाची समाप्ती !

कसलीही रडारड नाही. मराठी वाचकावरचे ठराविक दोषारोप नाहीत. आपल्या कर्तृत्वाचे गुणगान नाही. रागालोभांची उजळणी नाही. उपदेश नाही की अपेक्षाव्यक्ती नाही. जशी थंडगार वाटचाल तसाच थंडगार शेवट. अतर्क्य नसला तरी अकस्मात् झालेला. अंतर्मुख करणारा. शोभेसा, सुसंगत आणि प्रगल्भतेची खूण पटवणारा. मात्र अटळ नसलेला.

एक हजार निष्ठावंत वाचक, इच्छा आणि प्रयत्न यांच्या बळावर सत्यकथेला आर्थिकदृष्ट्या निश्चितच स्वयंपूर्ण करू शकले असते.

पण हजार वाचकांची, सहानुभूती बाळगणाऱ्यांची इच्छाशक्ती कुणीतरी एकवटायला हवी होती.

काही जणांनी असे म्हटले आहे की, सत्यकथेची उपयुक्तताच संपलेली होती. त्यामुळे वाचकाच्या इच्छाचे एकवट आर्थिक पाठबळ जरी लाभले असते तरी सत्यकथा आज नाही उद्या बंद पडलीच असती.

हे खरे नाही. सत्यकथेचा कलावाद कालबाह्य झाला, त्याची उपयुक्तता संपली म्हणून सत्यकथेनेही संपणे अपरिहार्य होते असे म्हणणे, हा अगदीच वरवरचा विचार आहे.

बांधिलकीवादी नियतकालिके तरी कुठे अगदी जोमदारपणे वाढताहेत ? जनसमूहांना, तमाम सर्वहारावर्गाला वळसा घालू पाहणारे पुण्यातले 'मागोवा' हे नियतकालिक बंदच करावे लागले आणि याच गटाचे सध्याचे 'तात्पर्य' मासिकही ओढगस्तीतूनच निघत आहे. सत्यकथा जसे मुठभराचे मासिक होते तसे तात्पर्य-आस्मितादर्श वगैरे मासिके-नियतकालिकेही शेवटी मुठभरांचीच असतात. फार तर कुणाची मूठ डाव्या हाताची तर कुणाची उजव्या हाताची म्हणा ! कुणाची झाकलेली तर कुणाची उघारलेली ! पण मूठ ती मूठच. तिच्यात काहीही लपवले-ठेवले तरी ते थोडेच पखालभर असणार

आहे ? अगदी सुबत्ता असलेल्या पाश्चिमात्य देशातही अभिजनांच्या आणि बहुजनांच्या आवडी-निवडीत, बौद्धिक-मानसिक गरजात तफावत असते आणि अभिजनांची गरज पुरविणारी नियतकालिके केवळ स्वतःच्या उत्पन्नावर कधीच धड चालत नाहीत. कलावादाची उपयुक्तता संपली म्हणून नव्हे तर सत्यकथेचे चालक कंटाळले, थकले म्हणून सत्यकथा बंद पडली. चाळीस वर्षे नुकसान सोसत काढल्यावर असा कंटाळा येणे अस्वाभाविकही नाही. कलावादी साहित्याची सध्याची परिणती नाहीतरी कंटाळावादात झालीच आहे ! बांधिलकीवाद जसा प्रचारवादात रूतून अप्रिय होत चालला आहे तसाच कलावादही त्यातील सर्वव्यापी कंटाळयामुळे गारठूनच गेलेला आहे. कलावादाची पुढची क्षितिजे कोणी हुडकायची ? कशी हुडकायची ? नवनवीन क्षितिजांचा शोध घेण्याचा, ती काबीज करू पाहणाऱ्या नव्या-जुन्या लेखकांचा संच पुन्हःपुन्हा जमवत राहण्याचा सत्यकथा चालकांना कंटाळा आलेला असावा व हा त्यांचा कंटाळा घालवण्याची, कलावादाला आलेला सध्याचा गारठा कमी करण्याची जी जबाबदारी त्यांच्या जुन्या आणि जाणत्या आणि नव्या आणि ताज्या दमाच्या लेखक वर्गाने, निष्ठावंत वाचकवर्गाने उचलायला हवी होती, ती न उचलल्याने सत्यकथा आज बंद पडली आहे. हजारभर लेखक-वाचकांनी हजार-हजार रुपये सत्यकथा निधी म्हणून काढले असते तरी या रकमेच्या व्याजावर सत्यकथा चालू ठेवता आले असते. कॉलेजातून मराठी विषय शिकवणाऱ्या प्राध्यापकांचीच संख्या ३००।४०० तरी असेल. त्यांनी जरी थोडी धडपड केली असती तरी निम्मा निधी जमला असता. उरलेल्यासाठी रसिक-वाचक-समीक्षक, सहानुभूती बाळगणारे उच्चपदस्थ होतेच. पण खटपट करायची कुणी ? एकदा केलेली खटपट वाया गेली कारण तिच्यात सातत्य राहिले नाही. पुन्हा खटपट करायची तर चालकांना थोडा उत्साह हवा. तोच चाळीस वर्षांच्या एकाकी वाटचालीमुळे संपला असण्याची शक्यता आहे. नवीन लेखक-कवी पुढे येतच असतात. त्यांच्या साहित्यगुणांची नीट मशागत जेथे होऊ शकते अशी सत्यकथेसारखी वाङ्मयीन व्यासपीठे समाजात असावीच लागतात. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी त्यांची गरज होती, उपयुक्तता होती, आता ती संपली या म्हणण्यात काही अर्थ नाही. त्यावेळी मर्ढेकर-गाडगीळ सत्यकथेद्वारा पुढे आले. नंतरच्याकाळात श्री. ना. पेंडसे किंवा आनंद यादव यांच्यासारखे लेखक या वाटेने येतच राहिले. चि. त्र्यं. खानोलकर-आरती प्रभू, ग्रेस ही नावे मराठी साहित्यात कुठल्या वाटेने आली ? केव्हा आली ? ही अलिकडचीच कमाई आहे. काव्याला इतके महत्त्व देणारे नियतकालिक मराठीत दुसरे नाहीच. म्हणून ते चालू राहणे ही आपल्या सांस्कृतिक उंचीची एक खूण ठरली असती. थोडी मदत, थोडी झीज, असा काही मधला मार्ग निघू शकला असता. पण आपण पडलो मराठी माणसं. सगळेच एकांडे शिलेदार. जे राजकारणात, समाजकारणात तेच साहित्यप्रांतातही. मधला मार्ग आपल्याला सापडणारच कसा ?

म्हणून टकमकटोकावरून सत्यकथेने खोल उडी घेतली आणि आपला अवतार संपवला.

तथास्तू.

—श्री. ग. मा.

## पुणे वार्ता

# 'जेसी क्विन' आणि निदर्शने!

शनिवार-११ सप्टेंबर. नेहरू मेमोरियल हॉलवर संध्याकाळी सहा वाजता सारस जेसीजतर्फे खास तरुणींसाठी एक सौंदर्यस्पर्धा आयोजित केली होती. 'जेसी क्वीन' निवडण्यासाठी प्रमुख पाहुणी म्हणून आशा सचदेव ही एके काळची किंचित विख्यात चित्रपटतारका आली होती. (हल्ली मात्र हिंदी चित्रपटांचा आणि आशाचा संबंध संपल्यासारखाच आहे. त्यामुळे तिला वेळही बराच असतो म्हणतात !) सौंदर्यस्पर्धा बघण्यासाठी प्रवेशमूल्य अर्थातच होतं.

पाच वाजल्यापासूनच हॉलवर वर्दळ सुरु झाली. फक्त हिंदी सिनेमातच बघायला मिळतील असे चित्रविचित्र कपडे घालून अनेकजणी अवतरत होत्या. फॅशनच्या जगातल्या 'लेटेस्ट' फॅशनचं ते प्रदर्शनच असल्यासारखं वाटत होतं. 'जेसी क्वीन' निवडली जाणार होती स्टेजवर, आशा सचदेवच्या साक्षीनं. पण ही बाहेरची स्पर्धा जास्त जिवंत वाटत होती. परत विनामूल्य. पोशाखी स्त्रीसौंदर्याचा तो आविष्कार ! सगळीकडे एक गुळगुळीत प्रसन्नता होती.

हॉलबाहेर रस्त्यावर १५।२० बायकांचा घोळका जमला होता. त्यांच्या हातात निषेधाचे फलक होते. फलकांवर सौंदर्यस्पर्धांचा धिक्कार केला होता. एका फलकावर लिहिलं होतं, 'They have acquired their beauty through luxurious life, and have put up their beauty on exibition's knife.' दुसऱ्या फलकावर 'लस्टी जेस्चर्स' आणि 'लेडीज पोस्टर' चा संबंध जोडला होता. फुटपाथजवळच्या भिंतीवर हे फलक लावू द्यायला जेसीज कार्यकर्त्यांनी नकार दिला. सौंदर्यस्पर्धाविरुद्ध मूक निदर्शन करण्यासाठी आलेल्या महिला संघटनांच्या

कार्यकर्त्यांनी हातात निषेधाचे फलक घेऊन प्रवेशद्वाराजवळ उभं राहायचं ठरवलं. निदर्शनात पुरोगामी स्त्री संघटना, स्त्री अत्याचार विरोधी मंच, समाजवादी महिला सभा, श्रमिक महिला समिती, सावित्रीबाई फुले महिलामंडळ–या संघटनांच्या कार्यकर्त्यांनी भाग घेतला.

प्रवेशद्वारातून आत जाणारे लोक या निषेधफलकाकडे बघत होते. तरुण मुली फलक बघायला टाळत होत्या, बघितलेच तर नाखूष चेहरा करून आत जात होत्या. सहा वाजता निदर्शनात भाग घेणाऱ्या मुलींनी कपाळाला काळ्या फिती बांधून स्त्रियांच्या सौंदर्य–स्पर्धांचा निषेध केला. स्पर्धा सुरू व्हायला थोडा अवधी होता. तेवढ्यात सारस जेसीजचे आजी व माजी अध्यक्ष, निदर्शक मुलींच्या घोळक्याकडे आले आणि त्यांची भूमिका पटवून द्यायला लागले. त्यांचं म्हणणं आमच्या सगळ्या स्पर्धक साड्या नेसूनच स्टेजवर येणार आहेत आणि आम्ही कसलीही 'मेजरमेंटस्' घेणार नाही. या प्रकाराला त्यांनी व्यक्तिमत्त्व विकास हा अवघड शब्दप्रयोग वापरला.

'सौंदर्य–स्पर्धेच्या' मूळ संकल्पनेलाच निदर्शकांचा विरोध असल्यामुळे जेसी अध्यक्षांशी चर्चा टाळण्यात आली.

यथावकाश प्रमुख पाहुणी आशा सचदेव आली. बाहेर मूक निदर्शनं चालू असतानाच आतल्या स्पर्धा उत्साही वातावरणात, सुरळीत पार पडल्या. 'जेसी क्विन' आणि आणखी दोन 'सुंदऱ्या' निवडण्यात आल्या. आशा सचदेवनं स्पर्धक सुंदऱ्यांचा सभाधीटपणा अजमावण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारले. उत्तरात बऱ्याच मुलींनी पुढेमागे मॉडेलिंग किंवा सिनेमात काम करण्याची इच्छा व्यक्त केली. अमुक एक रंगाची साडी आपण का नेसलो, असल्या प्रकारच्या प्रश्नांना उत्तरं देऊन स्पर्धकांनी सभाधीटपणा दाखवला.

कार्यक्रम संपला.

□

ज्या स्पर्धांत स्त्रीच्या फक्त शारीरिक सौंदर्याचा विचार केला जातो, स्त्रीचं मूल्यमापन जिथे फक्त शरीराच्या मोजमापातून होतं त्या स्पर्धांबाबत तरुण मुलींमध्ये निषेधाची भावना तर नाहीच, पण फाजील उत्साह मात्र दिसून येतो. अशा सौंदर्यस्पर्धांचा उपयोग मॉडेलिंग किंवा चित्रपट या सारख्या क्षेत्रात जाण्यासाठी 'स्टेपिंग स्टोन' म्हणूनच मुली करतात, हे त्यांच्या उत्तरावरून स्पष्ट होतं. काही मुलींनी हे उघडपणे व्यक्त केलं. पण हिंदी सिनेमातल्या वेगडी आकर्षणाला भुललेल्या असंख्य तरुण मुलींच्या मनात ही सुप्त आकांक्षा असते, त्यासाठी कोणत्याही 'स्पर्धे'त उतरण्याची त्यांची तयारी असते.

'सत्यम शिवम सुंदरम' सारख्या चित्रपटातून स्त्रीदेहाचं प्रदर्शन होत असल्याच्या निषेधार्थ, चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी आणण्यासाठी, दोन वर्षांपूर्वी काही मुलींनी मोर्चा काढला होता. वर्तमानपत्रातल्या जाहिरातीतून स्त्री देहाचं होणारं विकृत प्रदर्शन आणि त्यामुळे ढासळलेली स्त्रीची प्रतिमा पाहून, काही दिवसांपूर्वी अशीच निदर्शनं झाली होती. खेदाची गोष्ट म्हणजे निदर्शनाला पाठिंबा असणाऱ्यांची संख्या आज तरी नगण्य आहे.

अशा प्रकारची मूक निदर्शनं झाल्यावर तुम्ही आम्ही खादे उडवून म्हणतो, 'यानं काय होणार आहे ?'

स्त्रीकडे फक्त एक उपभोग्य वस्तू म्हणून बघण्याकडे काही स्त्रीसंघटनांना गैर वाटतंय, त्या त्याचा जाणीवपूर्वक निषेध करत आहेत. अशी भूमिका घेणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत आज ना उद्या वाढ नक्की होईल.

आज स्त्रियांचा प्रश्न आहे, आपण या निदर्शनांकडे 'फक्त 'बघ्याच्या' चष्म्यातून बघणार की काही ठाम भूमिका घेणार ?

कोणतीही ठाम भूमिका घेणं हे केव्हाही अधिक अडचणीत टाकणारं, बांधून ठेवणारं असतं. त्यासाठी थोडा विचार करावा लागतो. चुकीची मतं बदलण्याची तयारी लागते. यालाच कदाचित व्यक्तिमत्त्व विकास म्हणता येईल. आजच्या दिखाऊ फॅशनच्या जगात ज्या मुली झोकून देऊ बघताहेत त्या रस्त्याच्या शेवटी स्त्रीचं स्थान फक्त 'मॉडेल गर्ल' शिवाय कोणतंही नाही, अमेरिकेसारख्या प्रगत देशातही स्त्रीची प्रतिमा याहून वेगळी नाही.

वर्तमानपत्रात येणाऱ्या बलात्काराच्या बातम्यांचं प्रमाण वाढत आहे. वर्षानुवर्षे स्त्रीकडे बघण्याचा विकृत दृष्टिकोन त्याला कारण आहे. फक्त शरीरालाच नटवण्यात मश्गूल राहून स्त्रिया त्याला हातभार लावत आहेत. हे बदलायला हवं. म्हणूनच सौंदर्य स्पर्धांना निषेध करणाऱ्या निदर्शकाबरोबर आमच्या मैत्रिणींनी आज मनाने तरी रहायला पाहिजे. त्याचा सक्रीय सहभाग पुढे निश्चित होईल.

–मेधा देशपांडे


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

–रा. ग. जाधव
(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आं बे ड क र भा र त

लेखक : बाबुराव बागुल
राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य वीस रुपये

## मुंबई वार्ता

# मैत्रिणींचे अनुभव

घराबाहेर पडून पुरुषान अर्थार्जन करावं आणि स्त्रीनं घरातच राहून पत्नी, माता आणि प्रामुख्यानं गृहिणी या भूमिका बजावाव्यात; श्रमाची ही विभागणी आदिकालापासून ते अगदी काल-परवापर्यंत चालू होती पण काळ बदलला, तसे संदर्भ बदलले, मूल्य व्यवस्था बदलल्या, गोष्टीकडे पहाण्याचे दृष्टिकोनही बदलले. खरं म्हणजे गृहिणीपदाची जबाबदारी घेणं, घरातली अतर्गत व्यवस्था-मॅनेजमेन्ट चोख ठेवणं यामध्ये कमीपणा येण्यासारखं काहीच नाही; पण मूलतः सोयीसाठी निर्माण झालेल्या वर्णाश्रमधर्माची जशी दुष्ट, ठाम चाकोरी बनली, तशीच याही व्यवस्थेची ती बनली. घरात बसून चूल आणि मूल करणं कमी दर्जाचं आहे, त्याला बुद्धिमत्ता फारशी लागत नाही. स्त्रियांनीच या गोष्टी केल्या पाहिजेत आणि स्त्रियांनी केवळ या आणि एवढ्याच गोष्टी केल्या पाहिजेत, असे तर्कदुष्ट निर्णय समाजानं घेऊन टाकले. जन्मना जायते शूद्रः सारखं केवळ स्त्री म्हणून जन्माला आल्यामुळं प्रत्येक स्त्रीच्या अंगावर गृहिणीपणाचं जोखड येऊन पडलं, जे आवड, इच्छा, क्षमता असो किंवा नसो तिला पत्करायला हृ. 'ही, तुझी कर्तृत्वभूमी' असं सांगून स्त्रीसाठी घराचा तुरुंग बनवला गेला, आणि स्त्रीनंही तो स्वीकारला

बदललेल्या मूल्यव्यवस्थेच्या आजच्या काळात उच्चशिक्षित स्त्री, अर्थार्जन आणि करियर करणारी स्त्री या दृश्यात नाविन्य राहिलेलं नाही. मात्र आपल्या जुन्या भूमिकेपासून यत्किंचितही न ढळता या नव्या जबाबदाऱ्या स्त्रीनं स्वीकारल्या आहेत. समाजातलं हे एक फार मोठं आणि मूलगामी स्थित्यंतर आहे. जबाबदाऱ्यांच्या या गुंतागुतीबद्दल, वाढीबद्दल स्त्रीला काय म्हणायचं आहे? तिच्या समस्या, अपेक्षा काय आहेत?

'मैत्रिणी'च्या नुकत्याच झालेल्या बैठकीत या प्रश्नाबद्दल चर्चा झाली. गरज म्हणून, आवड म्हणून किंवा सवड म्हणून धरलेल्या किंवा न धरलेल्या / सोडलेल्या नोकरीबद्दल मनमोकळी चर्चा झाली. जमलेल्या मैत्रिणींनी आत्मानुभव कथन केले. त्यामधून महत्त्वाचे सर्वच मुद्दे मांडले गेले असं नाही; पण बोलण्याची संधी मिळताच *उसळून येणारा, खळाळून वाहणारा स्त्रियांच्या* विचारांचा प्रवाह याही बैठकीत प्रत्ययाला आला.

नोकरी कशासाठी? केवळ अर्थार्जनासाठी का? हे अर्थार्जन कुटुंबासाठी की प्रामुख्यानं स्वतःसाठी, नोकरीच्या स्वरूपाविषयी आधी काही विचार केला होता का? नोकरीमध्ये महत्त्वाकांक्षा कितपत आहेत? वरिष्ठ पदं मिळवण्याचा प्रयत्न करता का? करावासा वाटतो का? आर्थिक गरज हेच नोकरीचं कारण असेल, तर ही गरज संपल्यावर नोकरी सोडायला आवडेल का? नोकरी आणि घरसंसार- दोन्ही सांभाळण्यास तारेवरची कसरत करावी लागते का? त्यामध्ये कुणाची? मदत होते का सणवार किंवा इतर कौटुंबिक कर्तव्यं आणि नोकरी एकमेकाच्या मार्गात येतात का? नोकरी करणाऱ्या स्त्रीला सतावणाऱ्या या सर्व वास्तविक समस्या आहेत. या प्रश्नांबद्दल स्त्रियांनी जे अनुभव सांगितले, त्यातून या समस्यांचे निरनिराळे रूप तर उजेडात आलेच, त्याचबरोबर समाजमनात बदलत्या वृत्तीचीही सूक्ष्मपणे जाणीव होत गेली.

नोकरी कशासाठी? कोणासाठी? हा मूलभूत प्रश्न. बहुतेक मैत्रिणींचं यावरचं उत्तर म्हणजे नोकरी पैशांसाठी. कुणी कुटुंबाच्या अर्थार्जनात भर म्हणून, तर कुणी आर्थिक स्वावलंबनासाठी. आर्थिक स्वावलंबनाची गरज काय? एका मैत्रिणीनं सांगितलं. मी अविवाहित रहाण्याचा निर्णय घेतला, अर्थातच स्वतःची आर्थिक जबाबदारीही स्वतःच उचलली, आता या आर्थिक पायावर भक्कम उभी राहून मी हवी तशी वागू शकते. हवे ते छंद जोपासू शकते.

ठीक आहे. पण विवाहित स्त्रियांना *आर्थिक स्वावलंबनाची आवश्यकता काय?* त्यांना हवा तो पैसा पतीच्या अर्थार्जनातून मिळणार नाही का? एका नोकरी न करणाऱ्या मैत्रिणीनं सांगितलं, नवराबायकोंमध्ये मतैक्य आणि सहकार्य असेल तर माझ्या गरजा भागवण्यासाठी स्वतःच नोकरी केली पाहिजे, असा प्रश्न निर्माण होण्याचं कारण नाही. दोन अहंकाराचीच स्पर्धा ठेवली तर मात्र हा प्रश्न उद्भवेल. मुद्दा बरोबर, पण केवळ आदर्श म्हणून. अशा प्रकारचं पूर्ण मतैक्य शक्य आहे का? एका मैत्रिणीनं कडवटपणे सांगितलं, *आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण* झालेल्या बायका नवऱ्यांना मुळीच आवडत नाहीत. एका घटस्फोटित मैत्रिणीनं सांगितलं, मी अर्थार्जन करावं आणि माझ्या नवऱ्याला राजकीय–सामाजिक कार्यात रस असल्यानं त्यानं त्यात झोकून घ्यावं, अशी श्रमविभागणी आम्ही ठरवून घेतली. परंपरेनं पुरुषानं वठवायची भूमिका मी घेतली आणि सपूर्ण कुटुंबाच्या अर्थार्जनाचा भार उचलला. तरीही घरात येणारा हा पैसा नवरा माझ्याशी सल्ला-मसलत न करता खर्च करतो आहे, उडवतो आहे, असंच चित्र दिसत राहिलं, आणि अखेर घटस्फोटापर्यंत पाळी आली,

सेवानिवृत्तीच्या जवळ आलेल्या एका मैत्रिणीनं असाच जळजळीत अनुभव सांगितला. गाण्याचा छंद, करियर नवऱ्याच्या मनाविरुद्ध म्हणून सोडून द्यावा लागला. संसाराला आणि स्वतःसाठीही पैशाची आवश्यकता असताना नवऱ्याचा अहभाव आड येत राहिला. अखेरीस या अहंकाराला न जुमानता नोकरी धरली, तेव्हा नवऱ्याकडून सहकार्य शून्य! संसार चालवायचा म्हणजे पैशाचं लिपण हवंच'. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' हा तर रोजचाच अनुभव. तेव्हा मुलांना आपल्याकडे वळवून घेतल, अर्थात सांसारिक गरजा. नवराबाकोमधला बेबनाव, आईच्या विचारातला व्यवहारी योग्यपणा हे सारं मुलांच्या डोक्यात भरवणं शक्यच नाही. तेव्हा मुकलांडून सहकार्य मिळवताना, तुम्हाला चांगले कपडे हवेत ना? आठवड्यातून दोनदा सिनेमा हवा ना? म्हणून मी नोकरी करते. तुम्ही घरकामाचा वाटा उचलायला हवा! अशी लाचलुचपत केली, नंतर मुलीही समजूतदार झालं. घरकामाची बसवलेली घडी विस्कटली नाही; पण नवऱ्याचं सहकार्य म्हणाल तर ते मात्र आजही नाही'

पुरुषी असहकाराचे, आडमुठेपणाचे हे नमुने. अर्थात अतिशय महत्त्वाचं हे की यावरून पुरुष आडमुठे असतात असं सामान्यी-

करण करणं हे तद्दन खोटं ठरेल. निष्कर्ष काढता येईल तो असा की, नवराबायकोमध्ये शंभर टक्के मतैक्य, सहकार्य शक्य नाही, असं खरं म्हणजे कोणत्याच दोन व्यक्तींमध्ये शक्य नसतं. तेव्हा आपल्या मतांचं, व्यक्तिस्वाचं स्वातंत्र्य टिकवायचं, तर त्यासाठी आर्थिक स्वावलंबन हवंच. खेरीज असं की, नवऱ्यानं अर्थार्जन करावं आणि बायकोनं त्यात आपले छंद पुरवावे, ही काही मोठी योग्य श्रमविभागणी नव्हे ! अर्थार्जन करणाऱ्या नवऱ्यानं ज्याप्रमाणे घरगुती जबाबदाऱ्या टाळणं योग्य नव्हे, तसं घरगुती व्यवस्थापन करणाऱ्या स्त्रीनंही आर्थिक हातभार लावायचं टाळणं योग्य नव्हे ! अर्थार्जन आणि घरगुती व्यवस्थापन या दोन्हीही दोघांच्याही जबाबदाऱ्या आहेत आणि दोघांनीही त्या उचलायला हव्यात.

अर्थार्जनासाठी नोकरी करणाऱ्याबद्दल हे विचार झाले. नोकरी करण्यामागे आणखी काय हेतू असू शकतात ? करियर म्हणून, व्यक्तिविकासासाठी म्हणून.

नोकरी करणाऱ्या आणि न करणाऱ्या स्त्रियांचे या मुद्द्यावर पुष्कळच मतभेद होते. सगळ्याच नोकऱ्या करियर होऊ शकत नाहीत. खरं म्हणजे १० ते ५ अशी वेळेची बांधिलकी, वरिष्ठांची हुकुमत अशी बंधनं असलेली कोणतीच नोकरी करियर होऊ शकत नाही. नोकरी करणं म्हणजे मोठ्या यंत्रातलं एक छोटं चक्र बनणं. ज्यात स्वातंत्र्य नाही त्यात करियर कशी करता येणार ? त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे सगळ्याच नोकऱ्या व्यक्तिविकासाला हातभार लावू शकत नाहीत.

नोकरीबद्दलची ही मतं नोकरी करणाऱ्या आणि न करणाऱ्या दोन्ही स्त्रियानी मान्य केली. डॉक्टर, इंजिनियर किंवा आय. एस. ऑफिसर सारखे व्यवसाय, जिथे खास प्रशिक्षण लागतं, अशांचा अपवाद वगळला, तर नोकरीत खास करियरला वाव नसतो. तुमच्या प्रतिभेला, बुद्धीला वाव नसतो. कारण नोकरी म्हणजे सापशिडीचा खेळ. इन्क्रीमेन्ट–प्रमोशनच्या शिड्या भराभरा चढणं एवढ्यापुरतीच महत्त्वाकांक्षा मर्यादित होते. चाकोरीबाहेरचं वागणं तर सोडाच विचार देखील अनावश्यक ठरतात.

व्यक्तिविकासासाठी नोकरी हे विधान तर त्याहूनही फसवं आहे. सर्वसामान्य कारकुनाच्या नोकरीत कसला व्यक्तिविकास ? आणि कुठली व्यक्ती अशा विकासासाठी नजर उघडी ठेवून वावरते ? स्त्रीकारकुनांचा सोडा; पण पुरुष कारकुनांचा तरी असा काही विकास झालेला पहायला मिळतो का? पुरुषमंडळी गाडीतून जाता–येता, जेवणाच्या सुट्टीत पत्त्यांचे डाव हाणतात. वर्तमानपत्रातल्या 'पत्नीचा दगडाने ठेचून खून नाही तर 'गायीला पाच पायांचे वासरू' सारख्या बातम्या वाचतात, तर स्त्रिया स्वेटर विणतात. ऑफिसजवळच्या दुकानातून किराणा सामान खरेदी करतात आणि 'काल काय झालं, हे म्हणाले आत्ता भजी कर......' यासारख्या गप्पा मारतात. यामध्ये व्यक्तिविकासाचा प्रश्नच कुठे येतो ? स्वत:च्या पैशातून साडी घेणं किंवा ऑफिसच्या मैत्रिणींबरोबर सिनेमाला जाणं यापलीकडे स्वातंत्र्याच्या कल्पना पोचत नाहीत. तेव्हा नोकरी म्हणजेच व्यक्तिविकास हे समीकरण बरोबर नाही. खरं म्हणजे घरी राहून जो मोकळा वेळ मिळतो त्यातच माझ्या व्यक्तिविकासाला दिशा मिळाली असं एका डॉक्टरेट केलेल्या मैत्रिणीनं अभिमानानं सांगितल.

तरी देखील व्यक्तिविकासाच्या अनेक साधनांपैकी नोकरी हे एक महत्त्वाचं आणि प्रभावी साधन आहे, हे नाकारता येणार नाही. आज नोकरी करणं चाकोरी झालं आहे; पण सुरुवातीच्या काळात, स्त्रिया जेव्हा प्रथमच घराबाहेर पडल्या, तेव्हा त्यांना नवनव्या दिशांची, बाह्य जगाच्या स्वरूपाची प्रथमच जाणीव झाली. कारण घराबाहेर पडणं हा त्यांनी जाणीवपूर्वक, उघड्या डोळ्यानी घेतलेला निर्णय होता. त्याच्या व्यक्तित्वाचा विकास झाला. कारण तो करून घेण्याची त्यांची तयारी होती. आज व्यक्तित्वविकास होत नसेल, तर त्याला कारणीभूत आहे डोळसपणाचा अभाव. नोकरी करणं याला प्रातिनिधिक, सांकेतिक महत्त्व आहे. खरं महत्त्वाचं आहे ते चाकोरी मोडणं, घराबाहेर पडणं, नवे अनुभव घेणं. नोकरीच्या निमित्तानं स्त्रीला ही संधी मिळते. तिचं घराबाहेर पडणं नियमित आणि समाजमान्य होतं. एखाद्या स्त्रीनं आपल्या छंदाच्या जोपासनेसाठी रोज दहा ते पाच घराबाहेर पडायचं ठरवलं किंवा रोज घरातच राहून असा वेळ मोकळा काढायचं ठरवलं, तर कदाचित ते सुरळीत पार पडणार नाही. बहुधा ती स्त्री सर्वांच्या टीकेचा आणि वाईट म्हणजे स्वत:च्या अपराधी भावनेचा बळी ठरेल. नोकरी नसूनही दहा ते पाच एवढा वेळ स्वत:साठी काढणं हा तिचा स्वार्थीपणा, बेजबाबदारपणा ठरेल. या सगळ्या समस्या तात्त्विक चर्चेच्या पातळीवर नाकारता येतील; पण वास्तवाच्या पातळीवर नोकरी, त्यानिमित्तानं घराबाहेर पडण्याची अधिकृत संधी आणि जोडीला अर्थार्जन हे त्या समस्येचं महत्त्वाचं आणि सोपं उत्तर ठरेल.

उच्चपदस्थ आणि जबाबदारीच्या नोकऱ्या करणाऱ्या स्त्रियांचे काही खास प्रश्न होते. त्यापैकी बहुतेकाकडे अविश्वासानं पाहिलं जातं. त्याचे सहकारी त्यांच्याशी सहकार्य करत नाहीत. प्रसूतीची रजा इत्यादी स्त्रियांना मिळणाऱ्या खास सवलतीबद्दलही चीड असते, वगैरे; पण नोकरी हा प्रकारच असा आहे की, जिथे राव मेल्यावरच पंत चढतात ! प्रत्येक सहकारी हा प्रतिस्पर्धीच असतो. अशा परिस्थितीत असंस्कृत, रूढिग्रस्त मनांकडून अशीच उथळ वागणूक मिळणार. त्याला तोंड देणं जिकिरीचं ठरतं हे मात्र खरं; पण त्याबरोबरच आपलं स्त्रीत्व, शारीरिक अडचणी आणि कमकुवतपणा सतत खणखणीत वाजवून घेणाऱ्या, त्याचा फायदा उठवून जबाबदारी टाळणाऱ्या स्त्रियाही असतात हे विसरता येणार नाही.

सहकाऱ्याचे, घरातले अनुभव चागले येतात की वाईट ? तुमची कामं वाटून घेतली जातात की, सगळ्याच जबाबदाऱ्या अंगावर घेऊन ओझ्याचं गाढव बनावं लागतं ? याः सारख्या अनेक प्रश्नांना हो किंवा नाही असं एकारलेलं उत्तर देता येणार नाही. कारण बरीचशी उत्तरं व्यक्ती–व्यक्तीवर अवलंबून असतात. तात्त्विक आणि वास्तविक पातळीवर शोधायची उत्तरं, करायच्या अॅडजस्टमेंटस् या अखेर व्यक्तिगत असतात. कधी तात्त्विक पातळीवर मान्य केलेल्या गोष्टी प्रत्यक्षात उतरवणं कठिण जातं, तर कधी बायकोला मदत करणारा नवरा, तत्त्वतः त्याबद्दलची जबाबदारी टाळतो.

तेव्हा 'स्त्रियांनी नोकरी केलीच पाहिजे', किंवा 'स्त्रियांनी नोकरी न करणंच श्रेयस्कर' असा कुठलाही ठाम, सार्वत्रिक निष्कर्ष अशा

चर्चांतून काढता येणार नाही हे खरं; कारण माणसासारखा बुद्धी आणि भावना तीव्र असणारा प्राणी अशा चौकटीत ठोकता येणार नाही; पण समाजाचं बदलतं स्वरूप, वाढत जाणाऱ्या आर्थिक अडचणी, महत्त्वाकांक्षा, आवडी–निवडींबद्दल नव्यानं येणारी जाग, या साऱ्यांचा विचार केला, तर स्त्रियांची नोकरी हेच दृश्य आता वाढत्या प्रमाणावर दिसू लागेल, हे नक्की. समाजातल्या सर्वच स्त्री-पुरुषांनी हे जाणून घ्यायला हवं आणि जीवनाच्या या बदलत्या स्वरूपाशी जुळवून घ्यायला आवश्यक ते मानसिक, भावनिक बदल स्वतःमध्येही घडवून आणायला हवेत. ही स्वतः काळाचीच गरज आहे.

— ललिता बर्वे




## संप / अखेरच्या टप्प्यात

गिरणीकामगारांच्या अखेरच्या पर्वाला आता सुरुवात झाली असून त्या दृष्टीने गिरणगाव तापण्यास आता सुरुवात होत आहे.

गुरुवार ९ सप्टेंबर रोजी कामगारनेते डॉ. सामंत यांच्या युनियनशेजारील जागेत कार्यकर्त्यांची एक सभा आयोजित करण्यात आली होती. सभेची वेळ रात्री ९ ची असली तरी आठपासूनच कामगार युनियन ऑफिसशेजारी जमू लागले होते. ही सभा तशी गिरणीकामगारांची नव्हती. त्यांच्या प्रतिनिधींची होती डॉ सामंतांनी आयोजित केलेल्या जेलभरो आंदोलनानंतर कामगार व नेतेही थंड बसून होते. याबाबतच कामगार आपसात चर्चा करीत होते. त्यांची चर्चा परिस्थितीला वळण लावणारी होती.

२॥ लाख गिरणीकामगार आपल्या न्याय्य मागण्यांसाठी डॉ. सामंतांच्या नेतृत्वाखाली लढा देत आहेत. संप सुरू होऊन आता आठ महिने पूर्ण होत आहेत. या आठ महिन्यात डॉ. सामंतांनी जे जे आदेश दिले त्या सर्वांचं गिरणीकामगारांनी आदरानं पालन केलं. डॉ. सामंतांच्या सांगण्यानुसार त्यांनी लाँग मार्च, मुंबई बंद, महाराष्ट्र बंद आदींसारखे कार्यक्रम केले. सामंतांच्या सांगण्यानुसार त्यांनी जेल भरो आंदोलनही केलं; परंतु जेल भरो आंदोलनानंतर नेतेमंडळींनी कोणताच कार्यक्रम न दिल्याने कार्यकर्त्यांत एक कुजबूज चालू होती. आपापसात ते याच विषयाबाबत चर्चा करत होते.

एकीकडे डॉ.सामंतांकडून कोणताही कार्यक्रम नसणे आणि दुसरीकडे कामगार कामावर परतत असल्याच्या वार्ता ऐकणे यांमुळे काही प्रतिनिधी चलबिचल झाले होते. आता काय होणार हाच त्यांच्यासमोरचा प्रश्न होता.

याच वातावरणात गिरणीकामगारांच्या प्रतिनिधींची सभा रात्री दहा वाजता भर रस्त्यावरच सुरू झाली. सभेला डॉ. सामंत, डॉ. सामंतांचे वडीलबंधु दादा सामंत, सरचिटणीस टी.एस. बोराडे, चिटणीस मुणगेकर, काशीनाथ आचरे आदी नेतेमंडळी उपस्थित होती. गिरणीकार्यकर्त्यांच्या संपाबाबत काय भावना आहेत हे जाणून घेण्याबाबतचीच ही सभा असल्याने मिलचे प्रतिनिधी बोलू लागले.

प्रथमतः जे दोन प्रतिनिधी बोलले त्यांनी प्रांजलपणे आपल्या भावना व्यक्त केल्या. आठ-दहा महिन्यांच्या संपामुळे कामगार अतिशय हैराण झाला आहे, परिस्थितीमुळं तो पुन्हा राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या झेंड्याखाली जाऊन कामावर परतू लागला आहे. त्यामुळे डॉ. सामंतांनी ही संधी वाया घालवू नये अशी या प्रतिनिधींनी कळकळीची विनंती केली.

हे दोन प्रतिनिधी सोडले तर बाकीच्या दहा–बारा प्रतिनिधींनी जी भाषणे केली त्यात एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती, ती ही की आम्हास काही तरी कार्यक्रम द्या! गेले आठ महिने शांततामय मार्गाने लढूनही जे सरकार आमच्याशी बोलणीही करायला तयार नाही त्या सरकारचे डोळे उघडण्यासाठी मुंबई बंद, महाराष्ट्र बंद, रास्ता रोको अशा प्रकारचे काही उग्र कार्यक्रम युनियनने आम्हाला द्यावेत, अशी मागणी रामदास मोरे बागवे, जी. टी. शर्मा, आत्माराम गावडे, के. डी. राणे, एस. पी. तिवारी आदींनी केली. कामगार प्रतिनिधींच्या भावना खूप तीव्र होत्या.आम्हाला काही तरी कार्यक्रम द्या हीच प्रमुख मागणी प्रत्येक प्रतिनिधीने केली.

प्रतिनिधींच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी सरचिटणीस टी. एस. बोराडे उभे राहिले. पोलीसबंदामुळे आम्ही थोडे गप्प होतो, हे त्यांनी प्रारंभीच कबूल केलं. आजकाल रेल्वेखाली सापडून एखादं कुत्रं जरी मेलं तरी ते डॉ. सामंतांनी मारलं असा आमच्यावर आरोप केला जातो. म्हणून आम्ही थोडे थंड होतो, असं ते म्हणाले. कोणाच्याही हिंसेशिवाय गिरणीकामगारांचा संप शांततेने व लोकशाहीमार्गाने सुटावा ही आमची प्रथमपासूनची भूमिका असल्याचं बोराडे म्हणाले. एवढं करून सरकारच्या डोक्यात काहीही शिरत नाही, उलट संप फोडण्याच्या दृष्टीने सरकारने प्रयत्न चालविले आहेत, म्हणून आंदोलन उग्र करण्याचा कार्यक्रम आम्ही निश्चित केला असल्याचं बोराडे म्हणाले. हे आंदोलन अधिक तीव्र करण्यासाठी चालू असलेले सर्व कारखाने बंद करण्याचा विचार आम्ही करीत आहोत असे जेव्हा बोराडे म्हणाले तेव्हा त्या घोषणेचं प्रतिनिधींनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केलं.

प्रत्येक प्रतिनिधीचे भाषण डॉ. सामंत शांत चित्ताने ऐकून घेत होते. रात्रीचे अकरा वाजून गेल्याने डॉ. सामंतांच्या चेहऱ्यावर थकवा जाणवत होता. शेवटी ते ११–१५ वा. भाषणास उभे राहिले. आपल्या अर्धा तासाच्या भाषणात त्यांनी ताज्या घटनांची माहिती प्रतिनिधींना दिली. 'डॉ. सामंत कोणाचंच ऐकत नाही ' अशी माझ्यावर आज टीका होत आहे; पण जोपर्यंत कामगारांच्या पदरात काही तरी पडण्याची भाषा होत नाही तोपर्यंत मी कोणाचे व कसे ऐकावयाचे हा प्रश्नही त्यांनी या वेळी विचारला. एस. एम. जोशींपासून गुलजारीलाल नंदापर्यंत सर्वजण मला भेटले; पण साठ मालकांना ताळ्यावर आणून गिरणीकामगारांना योग्य तो न्याय देण्याची कोणीच तयारी दर्शवली नाही. आठ महिने जीवघेणा लढा देऊनही जर हे मालक आणि सरकार आपणास काही देत नसेल तर ते आतमध्ये गेल्यावर काय

देणार असा प्रश्न त्यांनी विचारला. कामगारांनी कामावर जाण्याची चूक करू नये त्यापेक्षा बाहेर राहूनच आणखी काही काळ त्यांनी लढा द्यावा हे त्यांनी आवर्जून सांगितले.

आंदोलन उग्र करण्यासाठी १६ सप्टेंबरला विधानभवनावर १५ लाख कामगारांचा विराट मोर्चा काढण्याची डॉ. सामंतांनी घोषणा केली. यानंतरचा दुसरा कार्यक्रम म्हणजे दोन ऑक्टोबरच्या गांधीजयंतीपासून महाराष्ट्रात सर्वत्र सत्याग्रह करण्याचा कार्यक्रम त्यांनी जाहीर केला. २ ऑक्टोबर रोजी एक लाख कामगार सत्याग्रह करतील असे त्यांनी सांगितले.

आंदोलन उग्र करण्यासाठी डॉ. सामंतांनी ह्या घोषणा केल्या. तिकडे इंदिरा कॉंग्रेसपासून फारकत घेतलेल्या शिवसेनेने कामगारांना डॉ. सामंतांना सोडून स्वतःकडे येण्याचे आवाहन केले. तिसरी गोष्ट म्हणजे कंटाळलेले कामगार कामावर हळूहळू परतू लागले आहेत. कामगारांच्या या कामावर परतण्याने सरकारची बाजू आणि आशा उंचावत आहेत. सरकारची बाजू भक्कम होऊ नये आणि गिरणीकामगारांचा संप फोल ठरू नये म्हणून कोणतेही तीव्र आंदोलन उभं करणं ही काळाची गरज होऊन बसली होती. डॉ. सामंतांनी उशीरा का होईना ती ओळखून त्याप्रमाणे पावले टाकली आहेत; पण डॉ. सामंतांना आता तिहेरी झुंज द्यावी लागणार आहे. एक सरकारशी, दुसरी शिवसेनेशी आणि तिसरी त्यांच्या विरोधकांशी! कामगारांना आपल्याकडे खेचून आणण्याची शिवसेनेने मनी गाठ बांधली आहे. कोणत्याही परिस्थितीत संप मोडून काढावयाचा ही सरकारची प्रथमपासूनची भूमिका आहे. बाळ ठाकरे का डॉ. सामंत असा हा आता प्रतिष्ठेचा प्रश्न होणार असून सरकार मजा बघत बसण्याची शक्यता आहे; पण निर्माण झालेल्या ह्या परिस्थितीने गिरणीसंपाने अखेरच्या टप्प्यात प्रवेश केला आहे असंच म्हणावं लागेल. यात कोण काय मिळवतो आणि घालवतो याचीच निरीक्षक वाट पहात आहेत.

—मोहन शं. कुलकर्णी

## परराष्ट्र

# पोलंड

## लढ्याचा पुढचा टप्पा

वा. दा. रानडे

पोलंडमध्ये सॉलिडॅरिटी या स्वतंत्र कामगार संघटनेने ३१ ऑगस्टला केलेल्या निदर्शनावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात दोघे ठार झाले व एक नंतर हॉस्पिटलात मरण पावला. शेकडो जखमी झाले आणि ४०–५० निदर्शकांना अटक करण्यात आली. लष्करी कायद्याच्या दडपशाहीने सॉलिडॅरिटीची चळवळ दबलेली नाही हे या निदर्शकांनी पुन्हा एकदा दाखविले. सरकारी अंदाजाप्रमाणे ६५ हजार लोकांनी निदर्शनात भाग घेतला; पण अनधिकृत अंदाजाप्रमाणे हा आकडा एक लाखापेक्षा अधिक होता. सॉलिडॅरिटी संघटनेला सरकारने बंदी केली आहे, तरीही तिच्या समर्थकांनी ही निदर्शने केली होती. दोन वर्षांपूर्वी ३१ ऑगस्ट १९८० ला ग्दान्स्क करार झाला व तेथील कामगारांनी स्वतंत्र कामगार संघटना स्थापण्याचा हक्क मिळविला. त्यातूनच पुढे सॉलिडॅरिटीचा जन्म झाला. पोलंडमधील कामगारचळवळीच्या इतिहासात या दिवसाला फार महत्त्व आहे.

पोलिसांच्या गोळीबारात दोघे ठार झाले. सायलेशियातील लुबिन या खाणीचे शहरात निदर्शकांनी मोर्चा काढला होता. तो पोलिसांनी अडविला. पोलिसांनी त्यांना पांगण्यास सांगितले; पण निदर्शकांनी ते ऐकले नाही. त्यांच्यातल्या काहींनी पोलिसांवर दगड व बाटल्या फेकल्या. तेव्हा पोलिसांनी गोळीबार केला. त्यात दोघे ठार झाले. वॉर्सा, ग्दान्स्क, रॉक्लॉ आणि नोवा हुटा या सॉलिडॅरिटीच्या चार प्रमुख केंद्रांत तर निदर्शने झालीच; पण देशातील दूरवरच्या भागातही झाली. रॉक्लॉ, गोझॉव्ह, लुबिन, लेग्निका आणि बॉलेव्हिच या शहरांमध्ये संचारबंदी पुकारण्यात आली. सरकारी आकड्यांप्रमाणे वॉर्सा येथे ६००, रोक्लॉ येथे ६४५ व झेसिल येथे १०० निदर्शकांना अटक करण्यात आली. इतर ठिकाणचे आकडे जाहीर करण्यात आले नाहीत; पण सर्व देशात मिळून धरपकडीचा आकडा चार हजारांवर गेला!

निदर्शने सुरू होण्यापूर्वी केलेल्या भाषणात वॉर्सामधील सॉलिडॅरिटीचे नेते झिगन्यूबुजाक म्हणाले, 'ही निदर्शने म्हणजे सरकारशी लोकांबरोबर बोलणी करण्याची खरोखर इच्छा आहे हे दर्शविण्याची सरकारला दिलेली शेवटची संधी आहे.'

एकवीस ऑगस्टची निदर्शने आणि पोलिसांशी झालेल्या चकमकी म्हणजे सॉलिडॅरिटी व सरकार या दोघांनीही आपले बळ अजमावण्यासाठी घेतलेली चाचणी होती. संघटनेला बंदी असतानाही आम्ही आमच्या समर्थकांना रस्त्यावर निदर्शनासाठी आणू शकतो असे सॉलिडॅरिटीला दाखवावयाचे होते, तर आम्ही ही निदर्शने काबूत ठेवू शकतो हे सरकारला दाखवावयाचे होते. सॉलिडॅरिटीने आपल्या समर्थकांची शिस्तबद्ध निदर्शने केली आणि त्यातून आपली ताकद दर्शविली. देशात लष्करी कायदा जारी असताना व निदर्शकांविरुद्ध कडक उपाय योजले जातील असा इशारा सरकारने दिला असता निदर्शनांना एवढा मोठा प्रतिसाद मिळाला हे सॉलिडॅरिटीची शक्ती कायम असण्याचेच निदर्शक होते. सॉलिडॅरिटीला लोकांचा पाठिंबा नाही. मूठभर लोकच हे आंदोलन करीत आहेत असा दावा सरकार आता करू शकणार नाही व केला तरी तो लोकांना पटणार नाही, एवढे या निदर्शनातून सिद्ध झाले. पण त्याचबरोबर आंदोलनाच्या मर्यादाही स्पष्ट झाल्या. सरकार ही निदर्शने काबूत ठेवू शकते. सरकारला पदच्युत करून सत्ता हाती घेण्याइतकी सॉलिडॅरिटीची ताकद वाढलेली नाही. सॉलिडॅरिटीला हिंसाचारी मार्गाचा अवलंब करायचा नाही. शांततेनेच आपले आंदोलन करायचे नाही हे जसे या निदर्शनातून दिसून आले तसेच सरकारलाही बळाचे जादा प्रदर्शन करावयाचे नाही, हेही दिसून आले. गोळीबारात दोघे ठार झाले हे खरे; पण सरकारला

दडपशाहीच करावयाची असती तर यापेक्षाही अधिक हानी झाली असती.

पण पुढे काय ? सॉलिडॅरिटीने आपली ताकद दाखविली हे खरे; पण आंदोलनाची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी यापुढे ते कोणत्या मार्गाने चालवायला हवे ? सॉलिडॅरिटीचे कार्यकर्त्यातच या बाबतीत तीन-चार प्रवाह आहेत. निदर्शने चालू ठेवून सरकारवर दडपण आणीत रहावे, असे एका गटाला वाटते तर सरकारशी काही एका मर्यादेपर्यंत सावध सहकार्य करावे असे मानणारा एक प्रवाह त्यांच्यात आहे. भूमिगत चळवळीचे जाळे अधिक खोलवर पसरवून पुढच्या प्रतिकार लढ्याची तयारी करावी असे काही कार्यकर्त्यांना वाटते तर काहींना स्वत.ची संस्कृती, स्वतःची अर्थव्यवस्था असलेला प्रतिसमाज किंवा नवसमाज निर्माण करावयाचा आहे; पण बहुसंख्य नेते स्थानबद्ध असल्याने, तसेच संघटनाही विस्कळित झाली असल्याने या निरनिराळ्या मतप्रवाहांवर चर्चा होऊन चळवळीच्या पुढच्या मार्गाची सर्वांच्या विचारविनियमाने आखणी करणे शक्य नाही.

या परिस्थितीचा फायदा घेऊन सॉलिडॅरिटीला बाजूला सारावयाचे आणि नव्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली नवी कामगार संघटना सुरू करावयाची असा सरकारचा बेत असल्याचे सूचित होत आहे; पण नव्या संघटनेला लोकांचा पाठिंबा कितपत मिळेल याबद्दल शंका व्यक्त केली जाते. कम्युनिस्ट नेतृत्वाखाली चालणाऱ्या सरकारनियंत्रित अधिकृत कामगार संघटनेसारखीच ही एक संघटना असे मानले जाण्याचा अधिक संभव आहे आणि नव्या कामगार संघटनेचे रूपाने कम्युनिस्ट पक्षाच्या व सरकारच्या कलाने चालणारीच संघटना कामगारांवर लादण्याचा हा प्रयत्न यशस्वी होण्याची शक्यता नाही.

सरकार आणि जनता याच्यात अविश्वासाची दरी निर्माण झाली आहे. ती भरून काढण्यासाठी सरकारनेच उपाय योजायला हवेत. लष्करी राजवट रद्द करून लोकशाही कार्यपद्धती सुरू झाली पाहिजे. लोकांनी शांतता राखावी आणि सरकारशी सहकार्य करावे. उद्योग, शेती व इतर क्षेत्रात कामगाराना हव्या असलेल्या सुधारणा आम्ही घडवून आणू व लष्करी कायदाही उठवू असे सरकारतर्फे सांगण्यात येत आहे.

उलट सॉलिडॅरिटीच्या नेत्यांना असे वाटते की, सरकारवर सतत दडपण कायम ठेवण्यानेच आपणास पाहिजे असलेल्या सुधारणा होतील. पूर्व युरोपातील एक पक्षीय राजवटीतल्या नोकरशाहीची प्रवृत्ती सुधारणांना विरोध करण्याकडेच असते. तेव्हा दडपण कमी झाले तर नोकरशाहीतील सुधारणा विरोधी प्रवृत्तीच पुनः बळावेल असे सॉलिडॅरिटीच्या नेत्याना वाटते. तेव्हा आपल्या मागण्यांसाठी दडपण व लढा सॉलिडॅरिटी चालूच ठेवील.

पोलंडशी संबंधित आणखी एका घटनेचा उल्लेख करायला हवा. बर्नमधील पोलिश वकिलात पोलिश बंडखोरांनी ताब्यात घेतली. पोलंडमधील लष्करी कायदा उठवावा अशी त्याची मागणी होती. त्यांचा हा प्रयत्न फार काळ टिकला नाही; पण पोलंडमधील बंडखोर गट कोणते नवे मार्ग अवलंबण्याची शक्यता आहे हे त्यातून सूचित झाले. या बंडखोर गटाशी सॉलिडॅरिटीचा काहीही संबंध नाही हे सॉलिडॅरिटीतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

आपल्या मागण्यांसाठी सॉलिडॅरिटीला दीर्घकाळ लढा द्यावा लागेल असे सरकारच्या धोरणावरून दिसते. सॉलिडॅरिटी अशा लढ्याची तयारी करीत आहे. □

# रंगीत दूरदर्शन येणार !

प्रा. राम बिवलकर

'इंद्रप्रस्थ स्टेडियमवर' एक हजार कोटी रुपये उधळले गेले. 'एशियाड' भरविण्यासाठी आणि जगात भारताचा दिमाख दाखविण्यासाठी ही प्रचंड गुंतवणूक ! 'एशियाड'-मधील सामने जगभर रंगीत दूरदर्शनवर दिसायलाच हवेत. त्यासाठी त्याचे रंगीत चित्रण व्हायलाच हवे. उपग्रहामार्फत ते ठिकठिकाणी पोचायला हवे. भारतातही दिसायला हवे; पण इथे रंगीत चित्रवाणीसंच कुठे आहेत ? इथे तर सारे 'काळे-गोरे' राज्य. त्यामुळे इथे कुणी ते बनवीतच नाही. तंत्रज्ञान आहे हो. काही ठराविक यंत्रसामग्री हवी. परदेशांतून ती आणली, इथल्या दूरदर्शनसंचात बसविली की, झाला तो रंगीत चित्रवाणीसंच. बरे, या आयात-यंत्रभागाची सचामागे किंमत किती ? फक्त १२५० रुपये! बरे, देशातील ८-१० दूरदर्शनकेंद्रांचे रंगीत कार्यक्रम प्रसारित करायचे झाले तर त्या केंद्राच्या सुधारणांसाठी आणि त्यात नवे रंगीत कॅमेरे बसविण्यासाठी प्रत्येकी फार तर दोन-अडीच कोटी रुपये लागणार ! 'एशियाड' वर हजार कोटी रुपये खर्च होणार. 'इन्सॅट'वर दोन-अडीच कोटी रुपये गेलेच की ! १९७४ साली राजस्थानात अणुबाँब फोडला त्यावर पैसे खर्च झालेच ना ? आणि मंत्र्यांच्या, खासदारांच्या, आमदारांच्या देशभर आणि परदेशांतील वाऱ्या यावर किती कोटी रुपये प्रतिवर्षी खर्च होतात ? मग रंगीत दूरदर्शननेच काय घोडे मारले ? देशातल्या वाढत्या गरिबीचे तुणतुणे वाजवीत बसले, वाढत्या महागाईचा बाऊ करीत बसले, समाजवादाचा खराखुरा पुरस्कार करीत बसले तर ज्याना काही सुबत्ता आहे त्यांना काही नव्या सुविधा, सुखसोयी मिळायलाच नकोत !

अशा अगदी व्यवहारी दृष्टीने, भारताच्या माजी माहिती आणि नभोवाणी मंत्र्यांनी गेली दोन वर्षे भारतात रंगीत दूरदर्शन आणण्याचा चंग बांधला होता. त्याचा त्यांना ध्यासच लागला होता. त्यात पुन्हा तो मराठी माणूस. दाती धरले ते सोडणारा नव्हे ! पण नामदार वसंतराव साठ्यांच्या या अथक प्रयत्नांना परवा यश आले. 'एशियाड'चा शेव धरून का होईना, नोव्हेंबर १९८२ पर्यंत दूरचित्रवाणी-संचांना बसविता येतील अशी ५० हजार रंगीत चित्रवाणी किट्स् आयात करण्याचा निर्णय जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात भारत सरकारने घेतला. सरकारी अर्थक्षेत्रातील, 'इलेक्ट्रॉनिक्स् ट्रेड अँण्ड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट कार्पोरेशन' तर्फे दोन दक्षिण

कोरियातील आणि एका पश्चिम जर्मनीतील कंपन्यांकडून ही 'किटस्' खरेदी केली जातील आणि भारतातील प्रतिवर्षी पाच हजार दूरचित्रवाणीसंच निर्मिणाऱ्या सर्व उत्पादक कंपन्याना ती पुरविली जातील. या रंगीत दूरचित्रवाणीसंचाना ८ हजार रुपये ग्राहकांना मोजावे लागतील असा 'साठे अंदाज'; पण वर्तमानपत्रांतून विविध कंपन्यांच्या ज्या जाहिराती येताहेत त्यावरून गुणवत्तेच्या भिन्नतेनुसार १० ते १५ हजार रुपये या संचाना पडतील असे वाटते आहे.

ना. वसंतराव साठेप्रणीत 'रंगीत दूरदर्शन' योजना तीन पदरी होती. सरकारच्या वरील निर्णयामुळे हाती निदान एक 'पदर' तरी आला आहे.

ते तीन पदर असे :–

(१) देशातील एकूण दूरचित्रवाणीसंच निर्मात्या कंपन्यांना प्रत्येकी १२५० रुपये किंमतीची १ लाख 'रंगीत दूरदर्शन किटस्' आयात करण्याची पुढील चार महिन्यात परवानगी द्यावी. यासाठी फक्त १२.५ कोटी रुपयांचे परकीय चलन खर्ची पडेल.

(२) परदेशात वास्तव्य करणाऱ्या भारतीयाना प्रतिवर्षी एक लाख दूरचित्रवाणीसंच भारतातील आपल्या नातेवाइकांना पाठविण्याची परवानगी द्यावी. त्यावरील सरकारी आयात–कर भरून हे संच भारतात येणार असल्याने सरकारचे कर–उत्पन्नही वाढेल; परकीय चलनही वाचेल. परदेशांत वास्तव्य करणाऱ्या काही भारतीयांच्या एका गटाने तर, प्रतिवर्षी ६०० रु. भाड्याने, २५ हजार रंगी दूरदर्शनसंच भारतीय नागरिकाना पुरविण्याची 'ऑफर' दिली आहे–तीही विचारात घ्यावी.

(३) खाजगी आणि सरकारी अर्थक्षेत्रातील दूरदर्शन–संच–निर्मात्या कंपन्यानी, ग्रामपंचायती, रुग्णालये, समाज विकास केंद्रे आणि इतर दानशूर–दयाळू संस्था यांसारख्या अग्रक्रमी ग्राहकांसाठी रंगीत चित्रवाणीसच आयात करावेत.

या तीन पदरांपैकी पहिलाच फक्त अर्धामुर्धा सरकारने आज मान्य केला असला तरी 'साठे योजना' व्यवहार म्हणूनही किती तरी फायदेशीर होती असा माहिती आणि नभोवाणी खात्याचा दावा आहे. कसा तो पाहा. १२५० रुपयेवाली एक लाख किट्स् आयात करण्यावर १२·५ कोटी रुपये खर्च होतील; पण जोडीने परदेशस्थ भारतीयाना तिथे अडीचशे डॉलर्सना म्हणजे २२५० रुपयांना मिळणारे संच आपल्या भारतीय नातेवाइकाना पाठवायची अनुज्ञा दिली तर अशा एक लाख संचावर २३० टक्के या दराने ५१ कोटी ७५ लक्ष रुपयाचा आयातकर सरकारला मिळेल. हा तर एका वर्षाच्या आयातीचा हिशेब; पण त्यातही ३९·२५ कोटी रुपये सरकारला मिळतील. त्यांचा विनियोग भारतातील ८ दूरदर्शनकेंद्रे रंगीत करण्यासाठी (खर्च प्रत्येकी दोन-अडीच कोटी रुपये) करूनही सरकारजवळ १९.२५ कोटी रुपये दूरदर्शनच्या विस्तारासाठी उरतील.

देशात रंगीत चित्रवाणी सुरू झाल्यावर 'व्हीडिओ कॅसेट रेकॉर्डर्स' ची चोरटी आयात बंद नाही का पडणार? गेल्या ३ वर्षांत असले ६० हजार 'व्हिडिओ कॅसेट रेकॉर्डर्स' भारतात चोरट्या पद्धतीने आयात झाल्याने सरकारचे ६० कोटी रुपयाचे कर–उत्पन्न बुडाले असा कस्टम्स्च्या मंडळीचा अंदाज आहे! शिवाय रंगीत चित्रवाणी–संचाच्या तंत्रशिक्षणासाठी फक्त 'रंगीत चित्रवाणी किट्स्' आयात करण्याची परवानगी दिलेल्या काही संचनिर्मात्या कपन्यांनी आयातधोरणातील फटीचा फायदा उठवून 'किट्स्' ऐवजी संपूर्ण रंगीत चित्रवाणीसंच खरेदी करून आणि हाँगकाँग अगर सिंगापूर येथे त्याचे विविध भाग सुटे करून ते ७५ टक्के सुटीच्या कर–दराने भारतात आयात केले आणि भारतीय बनावटीचे रंगीत चित्रवाणीसंच म्हणून जबर भावाने विकले. यात होणारे नुकसान विचारात घ्यायला हवे.

साठे-योजनेमध्ये भारतातील दूरदर्शनसंच-निर्मितीची वेगळ्या रंगीत वाटेने वाढ अनुस्यूत होती. भारतात रंगीत चित्रवाणी संच तयार करून सहाव्या पंचवार्षिक योजनाकाळात प्रतिवर्षी ५०० कोटी रुपयांचे संच निर्यात करून परकीय चलन मिळवता येईल अशी त्याची धारणा होती. 'दक्षिण कोरिया, हाँगकाँग, सिंगापूर यांच्यासारखे छोटे देश प्रतिवर्षी एक हजार कोटी रुपयांची इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात करतात. मग तंत्रदृष्ट्या तुलनेने प्राप्त असलेल्या भारताला ते का शक्य होऊ नये?' अशी त्यांची भूमिका होती. ती अगदीच 'स्वप्नाळू' असेही म्हणता यायचे नाही.

पण सरकारची विविध मंत्रालये आणि विविध संस्था यांच्या धोरणात कधी एकवाक्यता दिसून येते का? 'एशियाड'चे रंगीत चित्रण करायचे घाटू लागल्यानर प्रत्येकी १२५० रुपयाचे 'किट' आयात करून बसविलेले दूरचित्रवाणीसंच समाधानकारक ठरतील का हे पडताळण्याचे काम 'सी. एस्. आय. आर. ने' (कौन्सिल ऑफ सायंटिफिक ॲण्ड इंडस्ट्रियल रीसर्च) केले. ते सच उत्तम रीतीने काम देतात असे आढळून आले. त्यामुळे 'सी. ई. एल.' (सेन्ट्रल इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड) आणि ई. सी. आय. एल.' (इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड) या कंपन्यानी भारतात असे रंगीत चित्रवाणीसंच निर्माण करण्याच्या दृष्टीने 'सी. एस. आय. आर.' शी बोलणी सुरू केली; पण या बोलण्यातून काही निष्पन्न होण्याआधीच 'युनियन इलेक्ट्रॉनिक्स' खात्याने, आपण या संचांच्या तांत्रिक कसाची पडताळणी केली नसल्याने 'इ. सी आय्. एल.'ने रंगीत चित्रवाणीसच निर्माण करू नयेत अशी भूमिका घेतली. भारत सरकारने तर 'सी एस्. आय् आर.'च्या तांत्रिक कामगिरीचा विचारही न करता आपले आयातधोरण जाहीर केले. 'किट्स' आयात न करता भारतात तयार करावीत आणि सपूर्ण भारतीय बनावटीचे रंगीत संच निर्माण करावेत अशी 'सी. एस्. आय्. आर. च्या वैज्ञानिकाची आणि तत्रज्ञाची भूमिका आहे' 'किट्स्' आयात झाली तर नाकारलेली, दुरुस्त केलेली, जुनाट तंत्र वापरलेली 'किट्स' आपल्या पदरात पडतील. खऱ्या अर्थी रंगीत दूरचित्रवाणीसंचनिर्मितीला चालना द्यायची असेल तर 'तत्रज्ञान' फार तर आयात करावे, 'किट्स्' करू नयेत' अशी आपली भूमिका 'सी. एस्, आय्. आर.' चे डायरेक्टर जनरल, डॉ. जी. एस्. सि यांनी पंतप्रधानांच्या उपस्थितीत जोरदारपणे मांडूनही ५० हजार 'किट्स्' आयात करयचा निर्णय झाला. 'साठे योजने'ला डॉ. सिंधू यांच्या म्हणण्याची जोड देऊन निर्णय घ्यायला हवेत; पण ते घेणार कोण? आपल्या योजनेतला अर्धामुर्धा पदर मान्य झाला म्हणून ना. साठे यानी खूष राहायचे का?

'रंगीत दूरदर्शन'कडे 'पांढरा हत्ती' म्हणून पाहायचे की, इलेक्ट्रॉनिक्ससारख्या जगात भरमसाठ वेगाने वाढणाऱ्या उद्योगात आपण मागे पडू नये, ते आव्हान समजून ती संधी पकडायची हा खरा प्रश्न आहे; पण त्यासाठी एकसंध धोरण हवे. सरकारच्या विविध खात्यात एकसूत्रता हवी. त्यांनी एकमेकाचे पाय ओढणे थांबवायला हवे. नाही तर आमच्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर होणार नाही आणि तंत्रज्ञमंडळी परदेशाची वाट धरतील! ☐

## अवती भवती

शरद कृष्णन

# □ केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल

'मंत्रिमंडळामधील फेरबदलाच्या वार्ता हा एक विनोद झाला आहे. लोकसभेचे अधिवेशन संपले किंवा मी परदेशामध्ये निघाले की, या वार्ता प्रसृत होतात. मंत्रिमंडळामधील फेरबदलाच्या बातम्या या नित्याच्या झाल्या असल्याने त्याची दखल घेण्याचे कारण नाही.' –पंतप्रधानांनी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आणि दुसऱ्याच दिवशी मंत्रिमंडळामध्ये फार मोठे फेरबदल करण्यात आले. करण्यात आलेले फेरबदल नजरेखालून घातले तर जाणवण्यासारखी पहिली गोष्ट म्हणजे कै. संजय गांधी यांच्या कठोर पुरस्कर्त्यांना मिळालेले महत्त्व. याखेरीज कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यांपैकी वसंत साठे यांचे झालेले अवमूल्यन. पी. सी. सेठी यांची काहीशी अनपेक्षित बढती आणि काही महत्त्वपूर्ण खात्यांची पुनर्रचना या अन्य महत्त्वपूर्ण बाबी आहेत.

इंदिराजी तशा कुणाला भीक घालणाऱ्या नाहीत. आज तर त्या इतक्या सामर्थ्यशाली आहेत की, त्यांची इच्छा हा त्यांच्या पक्षासाठी व जनतेसाठी अखेरचा शब्द आहे आणि तरीही कुठे तरी त्या आपल्या सूनबाईंना बिचकून आहेत. मनेका गांधी यांनी थोडा आक्रमक पवित्रा घेऊन एक-दोन खासदारांचा पाठिंबा मिळवण्यात यश मिळवताच इंदिराजींनी संभाव्य फुटीरांच्या हालचालींना आळा बसावा अशा पद्धतीनेच मंत्रिमंडळामध्ये फेरबदल घडवून आणले आहेत.

### संजय-समर्थकांचा भरणा

ज्या नवीन मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे त्या आठ मंत्र्यांपैकी तीन मंत्री कै. संजय गांधी यांचे समर्थक, तथापि मनेका गांधी यांचे विरोधक आहेत. या तिघांमध्ये युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष रामचंद्र रथ, तसेच गुलाम नबी आझाद व अशोक गबोट या मंडळींचा समावेश आहे. खेरीज आधीच मंत्रिमंडळामध्ये स्थान पटकावून बसलेल्या मंडळींपैकी याच गटाचे पी. एन. सिंग यांच्यावर वाढत्या जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या आहेत. थोडक्यात म्हणजे संजय समर्थकांना पुरेसे प्रतिनिधित्व देऊन मनेकाचा पाठपुरावा करण्यात त्यांचे हित नाही, हे दोलायमान अवस्थेमध्ये असलेल्या मंडळींच्या मनावर बिंबवण्यात आले आहे. नवीन मंत्रिगणांमध्ये कॅबिनेट दर्जाचा कोणीही मंत्री नसला तरी पाच राज्यस्तरीय मंत्री असून तीन उपमंत्री आहेत. आजपर्यंत ज्या ज्या वेळी मंत्रिमंडळाची पुनर्रचना झाली त्या त्या वेळीच एन. के. पी. साळवे यांचे नाव घेतले गेले होते. त्यांना मंत्रिमंडळामध्ये प्रवेश मिळण्यास उशीर लागला खरा; परंतु त्यांना माहिती व नभोवाणी मंत्रालयासारखे महत्त्वाचे खाते स्वतंत्रपणे देण्यात आले आहे. या मंत्रालयाला कॅबिनेट दर्जाचा मंत्री नसल्यामुळे या मंत्रालयाचे तसे अवमूल्यन झाले आहे, असेच म्हणावे लागेल. इंदिराजी सत्तेवर आल्यापासून हे खाते वसंत साठे यांच्याकडे होते. या मंत्रालयावर त्यांनी आपला ठसा जरूर उमटवला होता. रंगीत टी.व्ही.चा त्यांनी सतत घोषा लावला होता. खेरीज इंदिराजींनी या संदर्भात नाराजी व्यक्त करूनही वसंत साठे रंगीत टी.व्ही. बाबत आग्रही होते. अगदी अलीकडेच त्यांनी बिहार प्रेस बिलाबाबत आपला सल्ला घेतला नव्हता, असे जे निवेदन त्यांनी केले तेही इंदिराजींना रुचले नसावे. खेरीज ऑल इंडिया रेडिओऐवजी त्यांनी आकाशवाणी असा केलेला वापर इंदिराजींना रुचला नव्हता. आपल्या अधिकारात त्यांनी पुन्हा आकाशवाणीचा ऑल इंडिया रेडिओ असा बदल करवून घेतला. साठे यांची वाढती लोकप्रियता त्यांना रुचली नसावी. माहिती आणि नभोवाणी मंत्रालयासारख्या वातानुकूलित खात्यातून त्यांची उचलबांगडी करून ऊर्जा व पेट्रोलियम मंत्रालयापासून फोडून वेगळे केलेले रसायन व खते हे कर्तृत्ववान माणसालाही निष्क्रिय करणारे खाते देण्यात आले आहे. वसंत साठे यांचा खातेबदल हे त्यांचे खचितच मोठे अवमूल्यन आहे. याउलट गृहखात्यासारखे महत्त्वपूर्ण खाते पी. सी. सेठी यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. त्यांची ही मोठीच बढती मानावी लागेल. त्यांच्याकडे यापूर्वी असलेले रेल्वेखाते ए. बी. ए. गनीखान चौधरी यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. कॅबिनेट मंत्र्यांच्या खात्यात बदल करण्यात आले असले तरी अर्थ, परराष्ट्र व संरक्षण ही तीन सर्वांत महत्त्वाची मंत्रालयं जुन्या मंडळींच्या हातीच कायम आहेत. उदंड बडबड करणारे आणखी एक मंत्रीमहोदय म्हणजे सी. एम. स्टिफन. त्यांना आता वाहतूक व जहाजबांधणी हे खाते देण्यात आले असून त्यांचे जुने खाते श्री. ए. पी. शर्मा यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. ज्यांना स्वतंत्रपणे आपली खाती सांभाळता येतील असे सहा राज्यस्तरीय मंत्री आहेत. त्यामध्येच नव्याने आलेले एन. के. पी. साळवे यांचा समावेश आहे. श्री. साळवे राज्यसभेमधील इंदिरा काँग्रेसचे उपनेते असून पक्षयंत्रणेतही त्यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. राष्ट्रपती–निवडणुकीच्या वेळी झैलसिंग यांची प्रचारयंत्रणा त्यांच्या हातीच होती. १९६७ ते ७७ मध्ये साळवे संसदसदस्य होते. त्यानंतर ते राज्यसभेचे सदस्य आहेत. श्री. साळवे यांनी काही अर्थविषयक पुस्तके लिहिली आहेत. मोजक्या शब्दांत आपले विचार व्यक्त करण्याबाबत त्यांची ख्याती आहे.

### बदलामुळे काय साधले ?

मंत्रालयामधील फेरबदल दोन कारणांसाठी आवश्यक होते. संरक्षणमंत्री आर. वेंकटरमण यांना गृहमंत्रालयाचे काम सांभाळण्यास सांगितले होते. दोन अत्यंत महत्त्वाची खाती सांभाळताना त्यांची धावपळ होत होती. गृहमंत्रालयासाठी पूर्ण वेळ देऊ शकणारा मंत्री तातडीने हवा होता. खेरीज राज्यस्तरीय पातळीवरही चरणजित चानता व एस. एस. ससोदिया निवृत्त होत असल्याने नव्याने मंत्रीगणांची भरती होणे आवश्यकच होते. या दोघांचीही राज्यसभेची मुदत पूर्ण होऊन गेली होती आणि पुन्हा उमेदवारी न मिळाल्याने त्यांना निवृत्ती स्वीकारणे भाग होते. कोणत्याही पदाचे सदस्य नसता-

नाही त्यांना पाच महिने काम पाहू दिले हेच विशेष मानावे लागेल. इंदिराजीच्या मंत्रिमंडळाचे ठळक वैशिष्ट्य हे की, एकही मंत्री स्वयंप्रकाशी दिसत नाही. खातेबदलाची कुणाला खंत वाटत नाही. आज पी. सी. सेठीसारखा फारसा कार्यक्षम नसलेला मंत्री गृहमंत्रालयामध्ये जाऊन बसतो. का ? तर इंदिराजींची मर्जी! त्यांना गृहमंत्रालय सुपूर्त केले जात असल्याचे केवळ तीन तास आधी सांगण्यात आले. सल्लामसलत, संबंधित मंत्र्याकडे खातेबदलाबाबत विचारणा, हा प्रकारच नाही. कै. नेहरू हेही एका अर्थी सर्वसत्ताधीश होते; पण त्यांच्या काळातही मंत्री स्वयप्रकाशी होते. कै. शास्त्री यांनीही मंत्र्यांना कधी निष्प्रभ, निस्तेज केले नाही. सत्तेवर आपली परिपूर्ण हुकमत जमवेपर्यंत इंदिराजीही काही पथ्ये सांभाळून होत्या; परंतु आणीबाणीच्या रणधुमाळीनंतर सत्तेवर आलेल्या इंदिराजी या खऱ्याखुऱ्या सर्वसत्ताधीश आहेत आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या प्रणवकुमार मुखर्जीपासून ते उपमंत्री म्हणून नव्याने रुजू झालेल्या दिग्विजयसिंग यांच्यापर्यंत कोणालाही स्वत:साठी स्थान निर्माण करता आलेले नाही. तसे ते निर्माण करता येऊ नये याच दृष्टीने काळजी घेण्यात आली आहे. काहीसा अपवाद म्हणून परराष्ट्र खाते सांभाळणाऱ्या पी. व्ही. नरसिंहराव यांचा उल्लेख करावा लागेल.

मंत्रिमंडळाच्या फेररचनेबरोबरच पक्षयंत्रणेचीही फेररचना करण्यात आली आहे. काँग्रेस कार्यकारिणी आणि संसदीय मंडळ यांची पुनर्रचना करण्यात आली आहे. पक्षाचे नियंत्रण करणाऱ्या या सर्वोच्च यंत्रणेमध्ये आता अंतुलेजी व गुजराथचे मुख्यमंत्री माधवसिंग सोळंकी यांना स्थान नाही. कर्नाटकचे मुख्यमंत्री आर. गुंडुराव यांना कार्यकारिणीमधून वगळले जाईल अशी अपेक्षा होती; परंतु ते आपली जागा टिकवून आहेत. राजीव गांधी यांना पक्षयंत्रणेमध्ये अजून कोणतेही पद दिले नसले तरी लवकरच त्यांच्यावर सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवली जाईल. तापदायक ठरलेल्या जुन्या मंडळींना स्वत:साठी कोणतेही स्थान निर्माण करता आलेले नाही. व्ही. सी. शुक्ला यांना अवमानित करून वगळण्यात आले होते; परंतु धडपड करूनही त्यांच्यावर इंदिराजींची मेहेरनजर झालेली नाही. कमलापती चुपचाप असल्याने ते कार्यकारिणी व संसदीय मंडळ या दोन्ही ठिकाणी आपले स्थान टिकवून आहेत. इंदिराजींच्या कृपेची वाट पहात बसलेल्या यशवंतरावांना अर्थआयोगाचे अध्यक्षपदापलीकडे कोणतेही स्थान नाही. मिळवण्यासारखे काही राहिलेले नाही असे ते म्हणतात; पण वस्तुस्थिती अशी आहे की, इच्छा असली तरी त्यांना आता फारसे काही मिळणार नाही. मंत्रिमंडळामधील प्रवेशाचे तर सोडाच पण पक्षयंत्रणेतही त्यांना कोणतेही स्थान नाही. बुटासिंग यांना कार्यकारिणीमधून वगळण्यात आले असून पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना जागा करून देण्यात आली आहे. दरबारासिंग यांनी पंजाबमधील शिख हिंदू तणावावर मात करावी व तेथील वातावरण पूर्ववत करावे यासाठी त्यांना सर्वतोपरी सहकार्य देण्यात येत आहे.

## □ सुभेश्वर सिंग आणि बिहार प्रेस बिल

बिहार प्रेस बिलाच्या संदर्भात संपूर्ण देशाच्या वृत्तसृष्टीमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या बिलाची खरी झळ अर्थातच बिहारमधील वर्तमानपत्रांना बसणार आहे. कलकत्ता येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'संडे' या साप्ताहिकाने या बिलाविरुद्ध एक विशेष अंक प्रसिद्ध केला असून अंकाच्या मुखपृष्ठावर या अंकाबद्दल कृपया आम्हाला अटक करा असे आवाहन बिहारच्या मुख्यमंत्र्यांना केले असून या आवाहनाखाली बिहारचे मुख्यमंत्री श्री. जगन्नाथ मिश्रा यांचे छायाचित्र छापले आहे. बिहार प्रेस बिलाच्या विरोधात अत्यंत स्फोटक मजकूर या अंकामध्ये आहे. या मजकुरामध्येच श्री. सुभेश्वर सिंग यांची एक मुलाखतही आहे. बिहारमध्ये वाटेल त्या मार्गाचा अवलंब करून वृत्तपत्रांची गळचेपी होत असताना श्री. सुभेश्वर सिंग हे दोन बलदंड वृत्तपत्रांचे सामर्थ्य संगती घेऊन श्री. जगन्नाथ मिश्रा यांच्या विरोधात उभे आहेत. एके काळी श्री. मिश्रा यांची श्री. सिंग यांच्यावर कृपादृष्टी होती; परंतु पुढे त्यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाल्यावर श्री. मिश्रा यांनी सुभेश्वर सिंग यांना अनेक प्रकारे त्रस्त करून सोडले. श्री. मिश्रा यांच्यावरोबर टक्कर द्यायची म्हणजे समोरचा मनुष्यही तितकाच सामर्थ्यशाली हवा. सुदैवाने श्री. सिंग हे तेवढे सामर्थ्यशाली आहेत. 'इंडियन नेशन' व 'आर्यवर्त' या बिहारमधील सर्वाधिक खपाचे प्रकाशन करणाऱ्या संस्थेचे ते प्रमुख आहेत. दरभागा भागामधील अत्यंत श्रीमंत अशा जमीनदार कुटुंबामध्ये त्यांचा जन्म झाला. जमीनदारीच्या सुखासीन आयुष्यापेक्षा वृत्तपत्राचे नियंत्रण करून ज्वलंत जीवन जगणे श्री. सुभेश्वर सिंग यांना जास्त मानवते. आज बिहार प्रेस बिलाच्या कठोर विरोधात ते उभे असताना त्यांच्याबरोबर झालेल्या बातचितीमधील विशेष महत्त्वपूर्ण भागाची दखल घेणे अगत्याचे वाटते.

प्रश्न : अप्रामाणिक, असभ्य आणि दुष्ट हेतूने प्रेरित झालेल्या लिखाणाविरोधी काही हालचाल करता यावी या दृष्टीने व आपण हे प्रेस बिल आणले असल्याचे मुख्यमंत्री सांगतात. त्यांचे हे विधान प्रामाणिक आहे, असे आपल्याला वाटते का ?

उत्तर : नाही. श्री. मिश्रा हे प्रामाणिकपणा या शब्दापासून शेकडो मैल दूर आहेत. खरं सांगायचं तर हा कमालीचा अप्रामाणिक गृहस्थ आहे. मला सांगा, बिहारमधील कोणत्या जबाबदार पत्रानं श्री. मिश्रा म्हणतात तशा स्वरूपाचा मजकूर प्रसिद्ध केला आहे ? खेरीज तसा जर तो कोणी केला असेल तर उपलब्ध कायद्याच्या आधारे योग्य ती कारवाई करता येतेच. त्यासाठी आणखी जाचक अशा कोणत्याही तरतुदीची गरज नाही.

प्रश्न : या बिलाचा खरा उद्देश कोणता आहे असे आपल्याला वाटते ?

उत्तर : खरं सांगायचं तर वृत्तपत्रांना धमकावणे आणि आपल्या विरोधी आवाज परिपूर्णपणे बंद पाडणे या एकमेव उद्देशाने हे बिल आणण्यात आले आहे. एक प्रकारच्या निराशेतून या बिलाचा जन्म झाला आहे.



दोन
बलदंड
वृत्तपत्रांचे
सामर्थ्य

**प्रश्न** : या बिलाविरुद्ध विहारमध्ये व अन्यत्र एवढा मोठा आगडोंब उसळला असताना राष्ट्रपती या बिलाला संमती देतील का ?

**उत्तर** : हो. नक्कीच देतील ! राष्ट्रपती दुसरे काय करणार ? रबरी शिक्का उमटवण्यापलीकडे ते काहीही करू शकणार नाहीत !

**प्रश्न** : या बिलाच्या संदर्भात आपण केंद्रीय माहिती व नभोवाणी मंत्रालयाची संमती घेतल्याचे सांगतात ते कितपत खरे आहे ?

**उत्तर** : माजी केंद्रीय नभोवाणीमंत्री श्री. वसंत माठे यांनी असा सल्ला घेतला गेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. श्री. मिश्रा हे खोटारडे गृहस्थ असल्याचे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. त्यांच्या खोटारडेपणाचा हा एक ताजा नमुना आहे.

**प्रश्न** : 'बिहारमधील किती वृत्तपत्रांविरुद्ध खटले सध्या चालू आहेत ?

**उत्तर** : संपादकांच्या प्रतिनिधींनी हाच प्रश्न मिश्राजींना केला होता तेव्हा असे अनेक खटले चालू असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर या संपादकांच्या मंडळाने मुख्यमंत्र्यांना असे तोंडावर सांगितले की, महोदय, आपण धादांत खोटे बोलत आहात. बिहार शासनाने केवळ एका वृत्तपत्राच्या संपादकावर खटला दाखल केला असून असभ्य मजकूर छापल्याचा त्याच्यावर आरोप आहे. यावर मुख्यमंत्री म्हणाले,

माझ्याजवळ यादी नाही. तपासून पहावे लागेल. हे बिल आणायचेच असे निश्चित केल्याने त्याच्या समर्थनार्थ ते वाटेल ते खोटेनाटे बोलतात.

**प्रश्न** : आपण वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या विरोधात नाही असे केंद्र सरकार, तसेच खुद्द पंतप्रधान वारंवार सांगतात.

**उत्तर** : अहो, ती केवळ बोलायची भाषा आहे. वृत्तपत्रवाले देशभर आंदोलनं करून उठत असताना 'बोगस' अशा शब्दात पंतप्रधान या आंदोलनाची निर्भर्त्सना करतात तेव्हा त्यांच्या मनात काय आहे ते सहज लक्षात येते.

**प्रश्न** : आपल्या वृत्तपत्रांना बिहार शासनाकडून कधी त्रास झाला आहे का ?

**उत्तर** : जास्तीत जास्त त्रास देण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक सूचना अप्रत्यक्षपणे दिल्या जातात; परंतु आम्ही दखल घेत नाही. काही पुरावे हाती असल्यामुळे आम्ही 'इंडियन नेशन' या आमच्या वृत्तपत्रात–शासकीय निर्णयांच्या विरोधात जोरदार लिखाण केले. मला बोलावून घेण्यात आले; परंतु मी बधलो नाही. मग 'इंडियन नेशन'वर खटला भरण्यात आला; परंतु त्यातूही काही निष्पन्न होऊ शकले नाही. थोडाफार अनुनय करण्यात आला; परंतु आम्ही बधलो नाही.

**प्रश्न** : आपल्या वृत्तपत्राच्या संपादकांना व्यवस्थापनाकडून कितपत स्वातंत्र्य दिले जाते ?

**उत्तर** : संपादकीय विचार आणि वृत्त याबाबत आम्ही ढवळाढवळ करत नाही. तथापी आमच्या राजकीय मतांची दखल लक्षात घेऊन त्यांना काम करावे लागते आणि मला वाटते देशामधील अन्य वृत्तपत्रांच्या संपादकांनाही या चौकटीतच काम करावे लागते.

**प्रश्न** : आपल्यावर दबाव आणला गेला तर आपण प्रेस बिलाला असलेला विरोध मागे घ्याल का ?

**उत्तर** : छे ! हे जराही संभवत नाही. मी एखादी भूमिका निश्चित केली की, पडेल ती किंमत देऊन मी त्या भूमिकेचा पाठपुरावा करतो. खेरीज बिहार प्रेस बिल विरोधी आंदोलनाचा इतका जोरदार भडका उडाला आहे की, त्यामध्ये प्रलोभन अथवा दडपण यामुळे सरकारी भूमिकेचे समर्थन करणारा जबाबदार पत्रकार बिहारमध्ये नाही आणि अन्यत्रही नाही. वृत्तपत्रस्वातंत्र्य मर्यादित होऊ लागले तर सर्वांना एकत्र यावेच लागते.

**प्रश्न** : आपण सरकारविरोधी भूमिका घेतल्यामुळे आपल्या वर्तमानपत्रांच्या जाहिराती काढून घेतल्या जातील. त्याचा वर्तमानपत्राच्या अर्थकारणावर परिणाम होईल आणि ... प्रश्न पूर्ण होण्यापूर्वीच सिंग म्हणाले की, 'शासकीय जाहिरातींवर अवलंबून राहायचे नाही हे मी प्रथमपासूनच ठरवले होते. माझ्या वर्तमानपत्रांचा मुख्य भर खाजगी जाहिरातींवर असतो.

**प्रश्न** : या बिलाच्या विरोधात जे आंदोलन उभे राहिले आहे त्याचे नेमके फायदे कोणते ?

**उत्तर** : मिश्राजी सत्तेवर आहेत आणि इंदिराजी त्यांचे समर्थन करत आहेत. स्वाभाविकच प्रेस बिलाचे कायद्यात रूपांतर होईल. या आंदोलनामुळे ही प्रक्रिया थांबणार नाही. मात्र त्याचबरोबर या आंदोलनाची दखल शासनाला घ्यावीच लागेल. खेरीज, आंदोलनामुळे शासनावर दडपण राहील आणि प्रेस बिल मंजूर झाल्यावर आपण मनमानी करू असे जे मिश्राजींना वाटते तसे करता येणार नाही. कोणालाही आलतूफालतू सबबीवर तुरुंगात टाकले जाऊ लागले तर या आंदोलनामध्ये जनताही मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्याखेरीज रहाणार नाही. कायदा हाती असला तरी त्याची अंमलबजावणी करणे अवघड असल्याचे दिसून येईल. आंदोलनाचे हे जसे मोठे यश आहे तसेच इतर राज्यांमध्ये अशा स्वरूपाचा कायदा करण्याचे धारिष्ट्य अन्य कोणा मुख्यमंत्र्याला होणार नाही. वृत्तपत्रांवर वाढती बंधने घालताना केंद्र सरकारलाही दहा वेळा विचार करावा लागेल.

**प्रश्न** : वृत्तपत्रांबाबत केंद्र शासनाचे धोरण कसे राहील ?

**उत्तर** : बिहार बिलाचा ज्या पद्धतीने पुरस्कार केला गेला त्यावरून धोरणाची दिशा स्पष्ट झालीच आहे. न्यायसंस्था आणि वृत्तपत्रे ही आपल्या देशाच्या लोकशाहीचे मोठेच आधारस्तंभ आहेत. इंदिराजींचे धोरण आक्रमक असून सोयिस्कर अशी न्यायसंस्था आणि शासकीय धोरणाचा उदो उदो करणारी वृत्तपत्रे त्यांना हवी आहेत. इंदिराजी त्याच दृष्टीने पावले टाकत आहेत आणि अशी गळचेपी देशाच्या लोकशाहीला हानिकारक असल्याने मी कठोरपणे विरोधात उभा आहे. आज विरोध केला नाही तर विरोधी आवाज उठवण्याची संधीच मिळणार नाही अशी परिस्थिती असल्याने सर्व सामर्थ्यानिशी या बिलाला विरोध करणे हे मी माझे कर्तव्य मानतो. □

# पूर्वेचे आध्यात्मिक ज्ञान आणि पश्चिमेची संपन्नता यांचा संगम हे रजनीश यांचे स्वप्न आहे. अ‍ॅन्टेलोप इथं ते स्वप्न साकारत आहे.

## मा आनंदशीला सिल्व्हरमन

अमेरिकेतील ओरेगॉन राज्यातील अ‍ॅन्टेलोप नगराजवळ शंभरएक चौरस मैल क्षेत्राला 'बिग मडी रांच' असं म्हणतात. या ठिकाणी 'रजनीशपुरम' उभं राहात आहे. प्रत्येकी दोन इंजिनांची दोन विमाने, ट्रॅक्टर्स, बुलडोझर्स (अर्थ मूव्हर्स) रस्ते करण्याची यंत्रसामुग्री, खडक-दगड फोडण्याची अजस्त्र यंत्रे, एका जागेवरून दुसरीकडे हलविता येण्याजोगी तयार घरे – बंगले, धान्यासाठी कोठारे, रोपवटिका इ. इ. पाहिलं की, रजनीशपुरमच्या भव्य आराखड्याची कल्पना येऊ शकेल. यासाठी पैसा लागतो. तो येतो कुठून ?

आंतरराष्ट्रीय रजनीश फाउंडेशनच्या खजिनदार मा. सविता सागतात, 'देणग्या आणि भगवान रजनीशांची पुस्तके, टेप्स, व्हीडिओ विक्रीतून.' तिच्या खुलाशाप्रमाणे ओरेगॉन राज्यातील रजनीशांची स्थावर मिळकत, आर्थिक व्यवहार व कायदेशीर हक्क आणि इतर गोष्टींसाठी तीन कंपन्या स्थापलेल्या आहेत. एक कंपनी धार्मिक आणि आध्यात्मिक बाजू पाहते. ही कंपनी आर्थिक फायदा-तोटा पाहात नाही आणि ती कर-मुक्त आहे. गेल्या वर्षी पन्नास लाख डॉलर्सच्या देणग्या फाउंडेशनला मिळाल्या. पुष्कळ देणग्या जगभर पसरलेल्या 'रजनीश ध्यानकेन्द्रा'मधून आणि रजनीश-भक्तांनी चालविलेल्या फायदा मिळविणाऱ्या कंपन्यांकडून आल्या.

'प्रत्येक केन्द्र कायदेशीरदृष्ट्या आणि अर्थव्यवहाराच्या दृष्टीने स्वतंत्र आहे; पण आमचे 'आध्यात्मिक' संबंध आहेत देणग्या त्यांच्याकडून जशा येतात, त्याचप्रमाणे आम्हीही त्याना देतो. देवाण-घेवाण चालू असते.' – मा. सविता.

फाउंडेशनच्या एका प्रवक्त्याने एक उदाहरण दिले. कॅथालिक ख्रिश्चन व्यापारी जसा पोपला देणगी देतो तसंच ते आहे.

लॉस एंजेलेसजवळ 'ग्रोथ अ‍ॅन्ड मेडिटेशन' नावाचे एक संपन्न केन्द्र आहे. इंग्लंडमध्ये एक 'रिट्रीट कॅसल' आहे. बर्कले गावच्या 'पारस रजनीश मेडिटेशन सेन्टर'च्या शेजारीच रजनीशभक्तानी अर्थार्जनासाठी एक कॉम्प्युटर कंपनी काढली आहे. फाउंडेशनला सढळ हाताने देणग्या देता येतील असा फायदा या कंपन्यांतून मिळेल आणि तो मिळतो, अशी त्यांची खात्री आहे.

एखाद्या हिंदु माणसासमोर गोमास खाणे किंवा गॅसचेम्बरविषयी एखाद्या ज्यू माणसासमोर उथळपणे बोलणे ही जशी त्यांची क्रूर चेष्टा होऊ शकेल, तसंच लाल-भगव्या रंगाबद्दल अ‍ॅन्टेलोपच्या रहिवाशांच्या बाबतीत होऊ पाहात आहे. त्यानी या रंगाचा जणू धसकाच घेतला आहे. त्याना काही रशियन लाल रंगाची भीती वाटत नाही; पण भगवान रजनीशांचे शिष्यगण वापरत असलेल्या विशिष्ट भगव्या–लाल–तांबड्या रंगांच्या कपड्यांची वाटते. मग तुम्ही लाल रंगाच्या गाडीतून त्यांच्यासमोर उतरा, लाल रंगाचा स्वेटर अंगात घाला किंवा नेकटाय अगर अगदी लाल रंगाचो केसातली रिबन त्याना दिसू द्या. त्याना सहन होत नाही असं दिसतं. या रंगामुळं त्याना शंका येईल, तुम्ही 'त्यांच्यापैकी' तर नसाल ? गुरुबाज नसाल ?

'एका प्रातःकाळी जणू परग्रहावरून एखाद्या यानातून पाहुणे पृथ्वीवर उतरावेत, त्याप्रमाणे हे भगवे वस्त्रधारी अ‍ॅन्टेलोपमध्ये अवतरले आणि पाहावे तिकडे ते पसरलेले दिसले.' श्रीमती रोज कहलमन नावाच्या एका गृहिणीचे हे शब्द. या गृहिणी आपल्या पतिसमवेत, १९७६ साली निवृत्त होऊन येथे कायमच्या राहाण्यास आल्या. त्या पुढे म्हणतात, 'कुणास ठाऊक ही टोळधाड कुठून आली, ईश्वर जाणे ते इथं काय करणार आहेत.'

अ‍ॅन्टेलोप या भागातील अमेरिकन रहिवासी गेल्या पाच-सहा पिढ्या इथं राहताहेत. येथील प्रत्येकजणाचं दुसऱ्या रहिवाशाशी काही ना काही नातं आहे. आपलं नातं दृढ आणि सुरक्षित आहे या भावनेनं ते आपले तसं कष्टाचंच जीवन शांतपणे व्यतीत करीत आहेत. (आता करीत होते असं म्हणायला हवं.) पोर्टलॅंड शहरापासून दक्षिण पूर्वेस १५० मैल अंतरावर हा एक निवांत असा छोटासा भूभाग आहे. उन्हाळ्यात या जागेपेक्षा अधिक शीतल आणि हिवाळ्यात अधिक उबदार अशी काही ठिकाणं इतरत्र जवळ आहेत हे इथल्या लोकाना ठाऊक नाही असं नाही. तिथं ते जाऊ शकतात; पण शेवटी आपलं घर ते आपलं घरच. त्याची सर इतर ठिकाणांना कशी यावी ? या खडकाळ आणि खडबडीत भागाचं नंदनवन करण्याच्या वेडानं झपाटलेले हे नागरिक इथंच आपलं विश्व निर्माण करण्यात आजवर मग्न राहिले आहेत.

पण हे सगळं भगवे, वस्त्रधारी रजनीशगण अवतरण्याच्या आधीचे. भगवान रजनीशाच्या शिष्याना स्थानिक लोकांनी 'रेडकोटस' असं नाव ठेवलं आहे. त्यांच्या दृष्टीनं हे नावही तसं सौम्यच – त्यांच्या विरोधाच्या मानानं.

हे भगवान म्हणविणारे रजनीश म्हणजे एक पूर्वेकडील गुरु–जे भगवान बुद्ध, अ‍ॅलेक्स कंफर्ट आणि रेम्ब्रन्ड यांचे मिश्रण वाटावे.

गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यात या गुरूंच्या शिष्यगणानी साळसूदपणे ६० लाख डॉलर्स ओतले. (यापैकी १५ लाख रोखीने) आणि वास्को कौंटीमधील सुमारे शंभर चौरस मैल क्षेत्राचे एक दलदलमिश्रित कुरण (राच) विकत घेतले आणि त्यांनी आपल्या अडीच लाख शिष्यासाठी 'आध्यात्मिक जग' निर्मायला सुरुवात केली. त्यातही एक वसाहत त्याच्या खास निष्ठावंत शिष्यवर्गासाठी राखून ठेवलेली आहे.

## रजनीश-आक्रमण

येथील दृश्य पाहिल्यानंतर प्रथमदर्शनी कुणाला असं वाटेल की, त्यांना येथे एखादी कृषि-संस्कृतीची वसाहत उभी करायची असेल; पण असं दिसतं की, त्याना जणू एक मोठं शहरच वसवायचं आहे. त्यांच्या योजनांमध्ये इस्पितळे, एक मुद्रण-प्रकाशन संस्था, रेकॉडिंग स्टुडिओ (भगवानांचा संदेश सर्वत्र पोचविण्यासाठी ?), एक रेस्टॉरंट (भगवानांचा अनुग्रह घेण्यासाठी येणाऱ्यांची सोय !) इ गोष्टींचा समावेश आहे; पण ओरेगॉन राज्याच्या जमीनविषयक कायद्याने या मोठ्या दलदलमिश्रित जमिनीवर अशा सुविधा निर्माण करण्यास मनाई आहे. म्हणून मग रजनीश फाउंडेशन इंटरनॅशनल या नावाच्या त्यांच्या प्रतिष्ठानानं आपल्या पैशाच्या राशीतून साठ लाख डॉलर्स बाहेर काढले आणि ॲन्टेलोपच्या जवळपासच्या इस्टेटी खरेदी करायला सुरुवात केली. ॲन्टेलोप या नगराचे वार्षिक अंदाजपत्रक पंधरा हजार डॉलर्स असून लोकसंख्या ४० आहे ! (आता होती म्हणा.) आता या छोट्याशा नगरात घबराट पसरली आहे. त्यांची पारंपारिक जीवनपद्धती उध्वस्त होत आहे. पोर्टलॅन्डहून आलेले आणि जवळपासच्या कुरण-शेताचे, निवृत्त जीवन जगत असलेले धनी यांना असं वाटतं की, या नव्या धनाढ्य, अत्यंत सुसंघटित आणि तितक्याच वादग्रस्त पाहुण्यांनी मूळच्या येथील जीवनाला संपूर्ण ग्रासले आहे धार्मिक आक्रमण आणि प्रगतीची वाढ खुंटली असल्याच्या आरोपांना रजनीशशिष्यांना तोंड द्यावे लागते. मे महिन्याच्या तिसऱ्या-चौथ्या आठवड्यात तेथील स्थानिक लोकानी आपल्या नगरपालिकेची निवडणूक 'रजनीश-आक्रमण' या मुद्द्यावर लढविली. हा प्रश्न त्याना इतका गंभीर वाटला. जर ते या निवडणुकीत यशस्वी झाले असते तर त्यांच्या स्वायत्त शासन-संस्थेला, वास्को काउंटी कमिशनचा नव्या लोकांना गावात प्रवेश न देण्याचा कायदा ते अमलात आणू शकले असते; पण स्थानिक लोक निवडणूक हरले !

त्यानी अद्याप धीर सोडलेला नाही. झालेल्या निवडणुकानाच त्यांनी आव्हान दिले आहे. दुसरी एक गंमत म्हणजे, एक प्रकारच्या घबराटीमधून आणि उपहासात्मक विनोदातून त्यांनी एक नवा धर्मपंथ स्थापला आहे. त्याचे नाव 'डिसेंडंटस् ऑफ ओरेगॉन पायोनियर्स.' या नावाच्या झेंड्याखाली सर्व स्थानिक लोक संघटित व्हावेत हा त्यांचा उद्देश. रजनीशाच्या गुरुबाजीस विरोध म्हणजे त्याच्या प्रत्येक गोष्टीस विरोध स्वाभाविकपणे आला. म्हणून मग तांबड्या-भगव्या रंगालाही विरोध बंदुकांच्या गोळ्यांच्या रिकाम्या आवरणापासून त्यांनी जपमाळेसारख्या माळा तयार केल्या आहेत. रजनीशभक्त वापरत असलेल्या मालेला हे त्यांचे उत्तर आहे. शिवाय ॲन्टेलोपपासून पंधरा मैलांवर विलोडेल कॅफे या उपहारगृहात (जेथे श्री. जॉन वेन त्याचे एक मोठे तैलचित्र ठळकपणे लावले आहे.) 'डिसेंडटस्' बटने विकली जातात. 'बी रिॲलिस्टिक-प्लान फॉर अमिरॅकल' हा त्या बटनावरील संदेश आहे. शहरातील निम्म्या कारवर रजनीशाची तर उरलेल्या निम्म्यावर 'बेटर डेड दॅन रेड' अशा मजकुराची स्टिकर्स चिकटवलेली आढळतात.

काऊ बॉय पद्धतीच्या कादंबऱ्यांतून जे संवाद असतात आणि काल्पनिक शाब्दिक चकमकी असतात, जवळजवळ त्या पद्धतीच्या भाषेतून ही लढाई चाललेली आहे. रजनीशही तशीच उत्तरे देतात. एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढणे, आरोप-प्रत्यारोप करणे एकमेकाच्या जीवनपद्धीतील उणीवांवर बोट ठेवणे असा प्रकार चाललेला दिसतो, पण खरं पाहिलं तर दोन्ही बाजूचे ध्येय म्हणा अगर रोख म्हणा मूलतः एकच दिसतो. तो म्हणजे या राकट भागात शांति आणि समतोल नांदावा. रजनीशांवरील टीकाही अतिशयोक्तिपूर्ण असू शकते किंवा बाह्य दर्शनामुळे गैरसमजामधून उद्भवलेली असते, असेही म्हणायला हरकत नाही.

शनिवारची एक चुरचुरीत, चांदणी रात्र. निवडणुकीनंतरचा पहिलाच शनिवार. मधल्या काळातल्या भावनात्मक आणि वैचारिक अशा प्रचंड खळबळीचे दडपण अजून मनावर असणारी माणसं इथं एक क्षणकपैकी नाचगाण्याच्या कार्यक्रमाला एकत्र आली आहेत. ॲन्टेलोप आणि फॉसिल नगराच्या परिसरातील चारी दिशांनी आलेले स्त्रीपुरुष या मेळाव्यात आहेत. प्रवेशद्वाराजवळ श्री. अल कुहलमन वर्गणी जमा करण्यासाठी उभा आहे. ॲन्टेलोपने सुरू केलेल्या कायदेशीर प्रतिकाराच्या लढाईसाठी हा पैसा जमवला जातो आहे, असं सांगण्यात येतं. 'रजनीशांचा लाल धोका केवळ ॲन्टेलोपलाच आहे असं नव्हे, तर प्रथम ॲन्टेलोप, मग जवळचेच फॉसिल गाव, मग वास्को काउंटी, ओरेगॉन राज्य असं करत करत सबंध अमेरिका खंडालाच हा लाल कॅन्सर ग्रासणार !' असं वर्गणी गोळा करता करता कुहलमन सांगत आहे.

'ओह, हा तर हिरवा गुरू,' काउ बॉय हॅट घातलेला एक तरुण एकाकडे निर्देश करून म्हणतो आणि त्यालाच विचारतो. 'How-ya doing Master ?'

प्रश्न विचारतानाचा नाटकीपणा आणि गरजेपेक्षा कमरेत जास्त लवणे लक्षणीय दिसतं. औपचारिक गांभीर्यानं प्रतिसाद देत, हा हिरवी वस्त्रे आणि हिरवी बटने परिधान केलेला गुरू जणू जाहीर करतो आहे की, आपण स्वतः 'डिसेन्डंटस'चे अधिकृत प्रवक्ते आहोत. या पंथाचा आणखी एक स्वयं-घोषित गुरू श्री. हूर्ब मॅके पलीकडेच बाकावर बसला आहे. त्याचे एक दोस्त जॉन बॉवरमन, ज्याना या नव्या 'चर्च'ची कल्पना प्रथम स्फुरली, ते मॅकेजवळ बसलेले आहेत. मोबलो बॅन्डचा ताफा जोशात एक लोकप्रिय गीत सादर करीत आहे. या गदारोळात प्रत्येकजण दुसऱ्याशी रजनीश-प्रकरणाविषयीच बोलत आहे. मॅके म्हणतो, 'नऊ महिन्यापूर्वी आमचा असा एक समाज होता. तो आता संपला. मी ॲन्टेलोपच्या शाळेत शिकलो. ॲन्टेलोप हेच माझं गाव. आता म्हातारपणी आमच्यासारख्या गुराख्यांनी दुसरीकडे कुठं जायचं ?'

## पाच पिढ्यांचं जीवन

'शंभरएक वर्षांपूर्वी अमेरिकन इंडियन लोकांना काय वाटलं असेल याची मला आता कल्पना यायला लागली आहे.' असं श्रीमती मेलिंडा डिक्सन म्हणते. रजनीश इस्टेटीच्या सीमेवरच आपल्या एका चराऊ कुरणात आपला नवरा डेव याच्यासमवेत ती काम करते. 'आता हे दुसऱ्या प्रकारचे इंडियन इथं आलेत-पैशाच्या थैल्या घेऊन-आम्हाला इथून हुसकायला.' म्युनिसिपल निवडणुकीतील हार या

मंडळींना झोंबलेली दिसते. हा पराभव ते तात्पुरता समजत होते; पण त्यांची निराशा आता झाकून राहात नाही. त्यांना असंही वाटतं की, आताच्या जमलेल्या या समुदायात काही 'लाल' हेर असावेत. कॉउबॉय हॅट घातलेल्या आणि नाचगाण्यात रंगलेल्या काही तरुणांकडे काही जण संशयाने पाहात आहेत. नाचरंगाची लय आणि गती वाढत जाते, लहान मुलं बाकावरच किंवा इतर जागी पेंगू लागतात. ते पाहून तो हिरवा गुरू म्हणतो, 'पाहा, असं हे आमचं गाव—एखाद्या मोठ्या कुटुंबासारखं. आमची लहान मुलंसुद्धा इथं नाचगाण्याच्या कार्यक्रमाला निर्धास्तपणे येऊ शकतात. दुसरीकडे आहे कुठं अशी सोज्ज्वळ जागा ?' यातल्या काही लोकांना वाटतं की, हे भगवे 'गुरुबाज' काही तरी शोधताहेत-जे त्यांना आपल्या कुटुंबात मिळत नाही. या धर्तीवर संवाद चालू आहेत. 'रजनीशगण म्हणे शाकाहारी आहे.' 'माझ्या तेरा वर्षांच्या मुलीला मी निर्धास्तपणे शेतावर सोडून येत असे. आता आहे का तशी शाश्वती ?' 'आमची जीवनपद्धतीच बदलायला निघालेयत ते.' सारांश रजनीशांमुळं आपल्यावर एक संकट कोसळलं आहे या बाबतीत साऱ्यांचं एकमत. अॅन्टेलोपच्या ८१ वर्षांच्या आयुष्यात अशी खळबळ कधीही माजली नव्हती !

अल कुहलमनच्या मालकीची एक इमारत रजनीशपुरमच्या समोरच आहे. त्याचा एवढा मानसिक ताण कुहलमनवर पडलेला आहे की, दीर्घकाळ सुट्टी घेऊन तो कुठं तरी लांब निघून जायचा विचार करतो आहे जागेच्या टंचाईचा प्रश्न आता सर्वांना भेडसावू लागला आहे. पूर्वी असं नव्हतं. श्रम करावे लागले तरी आणि खडकाळ-दलदलीची असली तरी जमीन उपलब्ध होती. गाईंच्या किंमती खाली आल्या आहेत. धान्याला दर नाही. हिवाळ्याचा कष्टप्रद हंगाम लांबतोय. दुसरीकडं कुठं जाऊन अधिक आरामाचं जीवन जगण्याचा विचार अद्याप त्यांच्या मनात येत नाही. कारण हे लोक तसे खेडवळ वृत्तीचे, समाधानी व निर्लोभी आहेत. त्यांना वाटतं की, आपल्या वाडवडिलांप्रमाणे इथंच शांत आणि स्वावलंबी जीवन जगावं. एवढीच त्यांची माफक इच्छा

रजनीशपुरमविरुद्ध शीतयुद्ध चालू आहे. रजनीश फाउंडेशनचा एक प्रवक्ता म्हणाला, 'आम्ही जिथं लागवड करतो आहोत, काम करीत आहोत—या वाळवंटाचे आम्हाला नंदनवन करायचं आहे. यासाठी ते किती जागा व्यापणार आहेत हे मात्र तो सांगत नाही. नंदनवन बनवायला लागेल तितका जागेचा विस्तार हवाच असा त्याचा अनुद्गारित सूर दिसतो. ही मुग्धता स्थानिक लोकाच्या मनात भीती उत्पन्न करीत आहे. या भीतीच्या निराकरणासाठी उपाय योजायचे तर पैसा हवा. तो ते जमवायचा प्रयत्न करीत आहेत. सुरुवातीस थोडी गंमत होती. ओरेगॉन पायोनियर्स डिसेन्डंडसची सुरुवात स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या एका पत्राने झाली. रजनीशांचा 'गुरु' आहे—आम्ही आमचाही एक नेमतो. कार बंपर्सवर त्यांनी स्टिकर्स चिकटवली—आम्हीही तेच केलं. थोडी लुटुपुटीची लढाई म्हणा ना; पण आता लोकाचा मूड बदलतोय. चेष्टेचा सूर जाऊन गांभीर्याचे दडपण यायला लागले आहे. शिवाय त्यांची अशीही तक्रार आहे की, प्रचाराची माध्यमं (वृत्तपत्रे वगैरे) इथल्या स्थानिक लोकांना वेडपट किंवा सनातनी वृत्तीचे म्हणून हिणवत आहेत.

अॅन्टेलोपचे नागरिक आता वाट पाहाताहेत त्यांच्यापेक्षा मोठा त्राता त्यांना कोणी भेटेल का याची. रजनीशाकडे पैसे आहेत. त्याचा भगवान असेल. वास्को काउटीचे लोक म्हणतात आम्हाला आमचाही धर्म आहे आणि तो पाच पिढ्यांच्या निढळाच्या घामावर, सहनशक्तीवर आणि अभिमानावर उभा आहे. बघू या काय घडतंय ते.

# मुक्काम : रजनीशपुरम, ओरेगॉन स्टेट, अमेरिका

मा. आनंदशीला सिल्व्हरमन. आरामात पहुडलेली. भगवान श्री रजनीश फाउंडेशनची अध्यक्षा. वय वर्षे ३२.

रजनीशपंथीयाबद्दल अॅन्टेलोपच्या नागरिकाची मते आणि प्रतिक्रिया ज्याप्रमाणे अमेरिकन वार्ताहराने टिपली, त्याचप्रमाणे रजनीश याचे म्हणणेही ऐकून घेतले आणि एकाच वेळी दोन्ही बाजू प्रसिद्ध केल्या. त्यातील हा दुसरा भाग.

इतर 'गुरु'पेक्षा भगवान रजनीश कसे वेगळे आहेत ?

मा. आनंदशीला सिल्व्हरमन म्हणते—'भगवानांची दृष्टी भविष्याचा वेध घेणारी आहे भूतकाळात रमणारी नाही. सर्वच बाबतीत नैसर्गिक समतोल कसा राखायचा हे सांगणारे ते गुरु. भगवानांचा दृष्टिकोन संपूर्णपणे आधुनिक-प्रागतिक आहे. ते विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शंभर टक्के पुरस्कर्ते आहेत. माणसानं सार्थ पण सर्व सोयीसुविधायुक्त असं संपन्न ऐहिक, त्याचप्रमाणे आनंददायी पारमार्थिक जीवन जगावं.'

या लाल-भगव्या वस्त्रधारी रजनीशपंथीय संन्याशिनीचा दावा आहे की, इतर सर्व समाज जेव्हा आणखी अवनत अवस्थेप्रत जाईल, तेव्हा रजनीशाचे वाळवंटात नंदनवन फुलविण्याचे स्वप्न साकार झालेले असेल आणि यासाठी ते काहीही करायला तयार आहेत—शारीरिक श्रम, आध्यात्मिक चेतना, किंमती ट्रॅक्टर्स, लठ्ठ फी घेणारे कायदेपंडित-या साऱ्या साधनांद्वारे ते या गवताळ—खडकाळ कुरणावर माळरानावर रजनीशपुरम नावाचा स्वर्ग निर्माण करतील !

जीजस ग्रोव्ह असं नाव दिलेल्या भागातील आपल्या घरात आरामात बसून मा. आनंदशीला सांगत आहे. त्या रजनीश फाउंडेशनच्या अध्यक्षा असून 'गुरु'च्या वतीने अधिकृतपणे बोलत आहेत. कारण भगवान मौनात आहेत (भारतातून अमेरिकेत गूढ प्रयाण करण्यापूर्वीपासून भगवानानी मौन धारण केलेले आहे. ते अद्याप सुटलेले नाही.) शीलाबाईंच्या घराच्या बाहेर, भेटायला—बघायला आलेल्या यात्रेकरूंना इतर रजनीशीय आपल्या परिसरात हिंडवून आणताहेत. ग्रीन हाउस, कामाला जुंपलेली खडक फोडणारी अजस्र यंत्रे इत्यादी दाखवीत आहेत. धुरळा उडतो आहे. कपडे वाळत घालायच्या दोऱ्यांवर बाहेर भगवी अंतर्वस्त्रे वाऱ्याने फडफडत आहेत.

या रजनीशपुरमच्या निर्मितीबद्दल जो गवगवा झालेला आहे त्यामुळे उत्पन्न झालेल्या अनेक कटकटींना आणि निर्मितीव्यवस्थापनाला तोंड देताना मा. आनंदशीला साहजिकच कामात व्यग्र आहेत. तरीही उत्साहाने आणि संयत शब्दात त्या रजनीशपुरम कसं आकारत आहे हे सांगताहेत (या जागेचं पूर्वीचं नाव आहे मड्डी रांच (Muddy Ranch). 'योग-रोड' नाव दिलेल्या रस्त्यावरील, आधीच तयार असलेल्या (प्री-फॅब्रिकेटेड) घरांची नीटस रचना, लाओ-त्सू ग्रोव्ह, सूफी रोड आणि मोझेस ग्रोव्ह, दीडशे एकरात फुलविलेली सूर्यफुलं, दुभती जनावरं, द्राक्षांच्या बागा, कुक्कुटपालनकेंद्रे, मधमाशा—पालन, फळझाडे—सारं सारं ती सांगते आहे आणि हे सांगताना या चंद्रमुखीचा चेहरा एक प्रकारच्या आत्मिक समाधानानं मोहरून आल्यासारखा दिसतो आहे. ती प्रश्नकर्त्याला विचारते : 'विमानं उतरण्याची धावपट्टी तुम्ही पाहिलीत ? आणि आमची विमाने बघितलीत ना ? आमच्या उपहारगृहात जाऊन आलात का नाहीत ?

त्यांनी तुम्हाला तिथं काही खायला दिलं का नाही, ग्रीन हाउस पाहायला विसरू नका हं आणि हो, आम्ही बनवितो तो ब्रेड चाखलात का ?'

ही बत्तीस वर्षांची तरुणो आपल्या वयाच्या सतराव्या वर्षापासून रजनीशाची शिष्या आहे हिच्याकडं पाहिलं की असं वाटतं की, पूर्व आणि पश्चिमेचा जसा समन्वय व्हायला हवा असं तिच्या गुरूचं-रजनीशाचं-म्हणणं आहे, त्याची जणू ही शीला म्हणजे प्रतीकच. प्रवृत्ती आणि निवृत्ती-आध्यात्मिकता आणि इहवाद यांच्या समन्वयाचा जो आदर्श रजनीशाना अभिप्रेत आहे याचे चालते-बोलते उदाहरण म्हणजे शीला सिल्व्हरमन !

शीला हे नाव तिच्या भारतीय पूर्वजांमुळे आलं आहे, तर सिल्व्हरमन हे पाश्चिमात्य नाव तिच्या पहिल्या नवऱ्याचे आडनाव. जीवनाला वाहत्या पाण्याची उपमा देत ध्यानमग्न दिसावी अशा अवस्थेतील शीला आणि तिखट जिभेची व्यवहारदक्ष सिल्व्हरमन असं हे मिश्रण आहे

जेव्हा अँटेलोपच्या रहिवाशांशी असलेल्या वादाचा उल्लेख येतो तेव्हा 'सिल्व्हरमन' दिसायला लागते. तिच्या बोलण्यात रजनीश समूहाची नऊ घरं, एक उपहारगृह, एक पुस्तकालय, एक ट्रेलर आणि टाउन हेड क्वार्टर्ससाठी आणखीही बऱ्याचशा गोष्टी यांचा उल्लेख येतो. त्यात नव्या उद्योग-व्यवसायासाठी राखून ठेवलेल्या नियोजित सात व्यापारी लॉटस्चा समावेश असतो. 'आम्ही काही बळजबरीने किंवा केवळ पैशाने हे सगळं विकत घेतलेलं नाही. आम्ही इथं आलो त्या वेळी येथील ८० टक्के प्रॉपर्टी विकायला काढलेलीच होती इथल्या रहिवाश्यांनी. आम्ही कुणावरही आक्रमण केलेले नाही. कुणाला कसला त्रास दिलेला नाही. आम्ही दुसऱ्याच्या भानगडीत पडत नाही. आमचा तो स्वभाव नव्हे आम्ही पॉझिटिव्ह आहोत आणि पॉझिटिव्ह वृत्ती संतुलन कधीच बिघडवत नाही. नकारात्मक भूमिका आहे ती अँटेलोपच्या नागरिकांची,' शीला सिल्व्हरमन बोलत असते. विरोधकाची भूमिका नकारात्मक असल्याची तक्रार रजनीशीय आज वीसएक वर्षे करीतच आहेत. याबाबतीत शीला काही वेगळं सांगते आहे असं नाही. रजनीशाच्या मुक्त 'आध्यात्मिक' मार्गाचे जसे कमालीचे कौतुक करणारे आहेत तसे टोकाचे विरोधकही आहेत. आदिमानवासारख्या मुक्त किंकाळ्या, 'रोल्फिंग' व आधुनिक मानसोपचाराबरोबर पौर्वात्य 'ध्यान-धारणा' अशा काहीशा समन्वयवादी तत्त्वज्ञानाचे प्रणेते हे रजनीश गुरु दोन्ही बाजूचे केन्द्रबिंदु आहेत.

भारतातील पुणे शहरात रजनीशांचा आश्रम होता. तेथील बहुसंख्य सनातनवाद्यांना या भगवानाचा संदेश आणि कामजीवनाबद्दलचे विचार आणि तत्संबंधी ध्यानादी प्रकार मानवले नाहीत. 'संभोगातून समाधी'मुळं रजनीश प्रखर टीकेचा विषय झाले. एका संतापलेल्या भारतीय संपादकाने म्हटले आहे की, काही पाश्चात्य लोकाचे स्त्री-पुरुष मुक्त संबंध आणि त्याचे सार्वजनिक प्रदर्शन आणि भगवी वस्त्रे परिधान करून धर्मगुरु म्हणवून घेणारे हे भारतीय गुरु यात काही फरक नाही.

१९७७-७८ मध्ये भगवानांच्या एका भूतपूर्व शिष्याने बनविलेली एक फिल्म बाहेरच्यांना, अॅन्टेलोपच्या नागरिकांप्रमाणे भलतीच धाष्टर्याची वाटते. एका खास सजवलेल्या खोलीत जो नाट्यमय प्रसंग चित्रित केला आहे तो अगदी पुरोगाम्यांनासुद्धा फार गरम वाटतो. या रजनीशियांच्या सात दिवसांच्या विशेष एन्काउन्टर सेशनमध्ये आक्रमण, नग्नता, सेक्स, सगळं काही आहे. एका स्त्री शिष्येवर जवळजवळ बलात्काराच्या प्रसंगाने हा सप्ताह संपतो. म्हणून रजनीशपथ म्हणजे मुक्त विषयोपभोग पंथ असं समीकरण काही जण माडू लागले.

पण या बिग मड्डी रांचवरील रजनीशशिष्य ठामपणे सांगतात की, असला काहीही प्रकार नाही. विषयासंबंधी भगवान रजनीशांची भूमिका स्पष्टपणे जाहीर करणारे एक पोस्टर अॅन्टेलोपमधील झोब्रा व बुद्ध कॅफेत लावलेले आहे· SEX. Never repress it. Never be against it. Rather go deep into it with great clarity, with great love. Go like an explorer !

## नवसंन्यास

एखाद्या धार्मिक स्थळाऐवजी अगर काही तरी रहस्यमय प्रकार चाललेल्या संशयास्पद ठिकाणाऐवजी, रजनोशपुरम एखाद्या 'किबुत्स' सारखे अधिक दिसते. येथे सामूहिक ध्यानसत्रे नाहीत. एकाच गोष्टीवर भर दिसतो-अविश्रांत श्रम. शालेय वर्ग आहेत ते केवळ या वसाहतीतील चाळीस मुलांसाठी (वयाच्या पाचव्या वर्षी या वसतिगृह-शाळेत मुले येऊ शकतात किंवा आई-वडिलांकडे राहून शिकू शकतात, मुलाच्या अगर पालकांच्या इच्छेनुसार.

रजनीशपुरमच्या जनता-संपर्क विभागातील एक अधिकृत व्यक्ती मा प्रेम इझाबेल-स्वामी प्रेम निरेन यांच्या पत्नी-म्हणतात हे सगळं किती सुंदर आहे, प्रेममय आहे. कसलाही अपप्रकार नाही. अगदी हॉट-टबसुद्धा नाही·

सुंदर हा शब्द मा प्रेम इझाबेलप्रमाणे बहुतेक रजनीश-शिष्यांच्या तोंडी वारंवार ऐकायला मिळतो. ओरेगॉन सुंदर आहे, तेथील झुडपे आणि खडक सुंदर आहेत, शेते सुंदर आहेत, भगवान सुंदर आहेत आणि त्यानी लोकांना जे दिलं आहे ते सुंदर आहे, सुरेख आहे.

भगवानानी प्रत्येकाकडून काही ना काही घेतलं आहे. बुद्ध, कृष्ण, येशू ख्रिस्त, लाओत्से, मोहम्मद. ते म्हणतात प्रत्येक प्रेषित एकाच सत्याचं रूप आहे. इझाबेल सागते. रजनीश मौनात जायच्या आधी तिनं त्याचं शिष्यत्व पत्करलं आहे. 'मी फार काळ शोधत होते. रजनीशांना जेव्हा मी पाहिलं, ऐकलं तेव्हा त्या क्षणीच मी त्याच्या 'प्रेमा'त पडले. हे सगळं इतकं शांत-सुरेख आहे की, जणू आम्ही जीजसच्या प्रत्यक्ष सहवासात आहो असं वाटतं.'

रजनीशांच्या एकाच शिष्याचं बोलणं ऐकलं की, त्याच्या बहुतेक सर्व शिष्यांचं ऐकल्यासारखं आहे. हसत-खेळत बोलणं हे या सगळ्यांचं वैशिष्ट्य दिसतं. त्यांच्या बोलण्याचे विषय म्हणजे भगवान रजनीश याची शेकडो प्रभावी पुस्तके, प्रवचने, अर्धजागृत वा निद्रित अवस्थेतून आम्हाला जागं करणारी, जीवनाचा अर्थ सांगणारी त्याची भाष्ये, संन्यास, पारंपारिक भगवी वस्त्रं, गळ्यातील माला या सगळ्याचा अन्वयार्थ, नवे भारतीय नामांतर का, पुरुष संन्याशांना स्वामी व संन्यासिनींना मा का म्हणायचे इ. इ.

रजनीशप्रणीत संन्यास स्वीकारणे याचा अर्थ सर्वसंगपरित्याग नव्हे. आपला उद्योग-व्यवसाय किंवा जन्मजात धर्म सोडणं नव्हे, रजनीश कम्यूनमध्ये सर्व धर्मीयांचे सण साजरे होताते. मा इझाबेल म्हणते की इथं काही संमोहनाचे प्रयोग होत नाहीत किंवा अमली पदार्थांचे सेवन नाही. तसेच तुमच्या ऐहिक साधनसंपत्तीचा त्याग करायचंही कारण नाही. आम्हाला जे यावंसं वाटतं ते आम्ही स्वखु-

पानं-आनंदानं देतो. आमच्यापैकी काही जणांच्या स्वतःच्या गाड्या आहेत काही जण त्या भगवानाना अर्पण करतात. काही जण आपल्या-पाशीच त्या ठेवतात

दोन लाखाहून अधिक शिष्यगण आपल्याकडे आकर्षित करणारे हे भगवान रजनीश आहेत तरी कोण ? (या शिष्यवर्गात ५५००० हजारांहून अधिक अमेरिकन लोक आहेत).

## दर्शनहेळामात्रे

११-१२-१९३१ रोजी जन्मलेल्या एका सुस्थितीतल्या भारतीय व्यापाऱ्याचा हा मुलगा लहानशा खेड्यात जन्मलेला. कथा अशी प्रचलित आहे की, विद्यार्थीदशेत असतानाच रजनीशांना एके दिवशी साक्षात्कार झाला. त्यांनी लिहून ठेवलंय 'त्या रात्री आपण पूर्णपणे भरलेले आणि संपूर्णपणे रिकामे झालो. अस्तित्व आणि अनास्तित्व एकाच वेळी जाणवलं.' त्यानंतर त्यांनी दहा बारा वर्षे रूढ अध्ययन केलं.

तत्त्वज्ञान विषय घेऊन ते एम्. ए. झाले. काही काळ प्रोफेसरकी केली. भारतभर प्रवास केला आणि गेली १६-१७ वर्षे ते परमेश्वर-चरणी रुजू आहेत. प्रथम मुंबईला त्यांनी आपल्या मताचा प्रचार सुरू केला. त्यांच्या विलक्षण प्रभावी व्याख्यानांचा आणि विचार-सरणीचा गाजावाजा होऊ लागला. १९७० पासून पाश्चिमात्य लोक त्यांचेकडे जास्त आकर्षित होऊ लागले. रजनीशांच्या पुण्यातील सात-आठ वर्षांच्या मुक्कामात त्यांच्या आश्रमाचा पसारा वाढला. शिष्य-वर्ग वाढला तसाच विरोधही. रजनीशांच्या दैनंदिन प्रवचनाचे विषय स्त्री-पुरुषसंबंधाव्यतिरिक्त धर्म, शास्त्र, विज्ञान, मानसशास्त्र, तत्त्व-ज्ञान, अन्न, मौजमजा, संगीत, शिक्षण, समाजवाद असे अनेकविध होते.

त्यांच्या शिष्यगणात मोठमोठ्या मान्यवर व्यक्तींचा समावेश आहे. पाश्चिमात्य शिष्यांना पूर्वेच्या आध्यात्मिकतेचं आकर्षण आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या पूर्व-पश्चिम समन्वयवादी भूमिकेचेही आहे. अमेरिकन मानसशास्त्रज्ञ, शिक्षक, व्यावसायिक शिष्यगण यांमध्ये स्वामी आनंद देवम, एम. डी., पूर्वाश्रमीचे न्यूयॉर्क विद्यापीठ यंग डेमोक्रॅटस प्रेसिडेंट; श्री. हॅरॉल्ड कारमेल-रजनीशपुरमजवळच मानसो-पचाराचा डॉक्टरी व्यवसाय करणारे; स्वामी कृष्णदेव-लॉस अॅंजलस, शहरात तेरा वर्षे शारीरिक व्यंगोपचार केंद्र चालविणारे; मा मेरी कॅथरिन-या पोर्टलॅन्डमध्ये असोसिएशन्स चालवीत होत्या-अशा अनेक कर्तृत्ववान स्त्रीपुरुषांचा समावेश आहे.

सर्वसंगपरित्याग ही हिंदु संन्यासाची व्याख्या रजनीशांच्या निओ-संन्यासाला मान्य नाही. त्याची अशीएक खास व्याख्या आहे. रज-नीश केंद्रात अन्न संपूर्ण शाकाहारी असते; पण काही शिष्य मांसाहार करतात. काहीजण धूम्रपान करतात-सीमित मद्यपानही करतात. तसे करण्याची त्याना मुभा आहे. ते वृत्तपत्रे वाचतात. सिनेमा पाहतात, नाच गाण्यात भाग घेतात. काहीजण आठवड्यातून एक दिवस रजनी-शपुरमला येतात, सपाटून काम करतात आणि उरलेले सहा दिवस आपल्या बेव्हर्ली हिल्स मॅन्शन्समध्ये परत जातात. पैसा मिळविणे ही गोष्ट रजनीश मुळीच निषिद्ध मानत नाहीत. आधुनिक सुखसोईंचे त्यांना वावडे नाही. त्यांच्याकडे म्हणे ५ किंवा ७ अगर १२ रोल्स रॉइस गाड्या आहेत ! -ही संख्या सांगणारा जसा भेटेल त्यावर अवलंबून असते !

स्थानिक परिस्थितीमुळे पुणे सोडायचे ठरले त्याच्या थोड्या आधी-पासून रजनीशांनी मौनव्रत धारण केले आहे असे सांगतात. त्यानंतर त्यांनी आपल्या शिष्यांना पुणे आश्रम सोडून जायला सांगितले. अनेक अमेरिकन शिष्य लॉस एंजल्स, बर्कले इत्यादी शहरातील केंद्रात परतले. येथे रजनीशांचा प्रचार पूर्वीपासून थोड्याबहुत प्रमा-णात चालू होताच.



भगवान रजनीश आपल्या अत्यंत निष्ठावंत अशा काही शिष्यां-समवेत कमालीच्या गुप्ततेने भारतातून प्रथम मॉन्टेअर एन. जे. या ठिकाणी गेले. नंतर ते ओरेगॉन भागात आले आणि त्यांनी आपले आध्यात्मिक केंद्र-रजनीशपुरम-येथेच उभं करायला सुरुवात केली.

संपन्न ऐहिकता आणि पारमार्थिक सार्थकता हे रजनीशांचे स्वप्न निःसंशय साकार होणार अशी श्रद्धा असलेले त्यांचे शेकडो शिष्य, शेता-शिवारात राबतात, ऑफिसात काम करतात, रजनीशपुरमच्या उभारणीस मनःपूर्वक हातभार लावतात, सर्व प्रकारच्या कामात सहभागी होतात. या सगळ्यांना दररोज दुपारी बरोबर तीन वाजता 'भगवानां' चे दर्शन घडते. ते कसे ?

एका टेकडीच्या पायथ्याशी भगवानांचे निवासस्थान आहे भोव-तालचा परिसर रम्य आहे. त्याच्या बगलीत 'उपचारार्थ' इन-डोवर पोहण्याचा तलाव आहे. दर्शनाचे वेळी भगव्या रंगाच्या वेगवेगळ्या छटा असलेली वस्त्रे पेहेरलेले शिष्यगण रस्त्याच्या दुतर्फा शिस्तीने उभे राहतात. एक काळीकुळकुळीत फोर्ड ब्रॅन्को गाडी आपल्या प्रखर दिव्यांच्या झोतांनी भगवानांच्या आगमनाची वर्दी देते. भगवानांच्या प्रकृतीची देखभाल (त्यांना मधुमेह आणि पाठीचा विकार आहे) करणाऱ्या एका नर्ससमवेत भगवान एक लख्ख पॉलिश केलेल्या आधु-निक मोटारगाडीतून जाताना दिसतात त्यांच्या दर्शनासाठी आतुर-लेले, हात बांधून उभे असलेले शिष्यगण विलक्षण भक्तिभावाने भारावलेले दिसतात. गाडीतील रजनीशांचे दर्शन होताच त्यांच्या चेहऱ्यांवर कृतार्थतेचा भाव ओसंडून वाहायला लागतो. भगवान संपूर्ण पांढऱ्या शुभ्र वेषात असतात. आपल्या मोठ्या आणि विलक्षण संमोहक डोळ्यांनी आणि हातमोजे घातलेल्या हातांनी ते आपल्या दर्शनेच्छुकांना आशीर्वादपर अभिवादन करतात. मग गाडी वळणावळ-णाच्या खडीच्या साध्या रस्त्याने १५ मैलांवरील अॅन्टेलोप शहराकडे संथपणे मार्गस्थ होते. अॅन्टेलोपमधील शहरी शिष्य त्यांचे याच प्रकारे दर्शन घेतात. काही स्थानिक माणसे हातवाऱ्याने आणि आविर्भावाने टरही उडवितात.

'नवा माणूस जसा साक्षात्कारी योगी असेल, त्याचप्रमाणे तो कवी असेल, शास्त्रज्ञही असेल !' रजनीशानी लिहिले आहे, 'तो साक्षा-त्कारी असेल, कारण परमेश्वराचे सान्निध्य त्याला जाणवत राहील, तो कवी असेल, कारण परमेश्वराची उपस्थिती तो साजरी करेल. तो शास्त्रज्ञ असेल, कारण तो आपले संशोधन ईश्वराच्या अस्तित्वाच्या जाणिवेतून करेल. या तीनही गोष्टींचा मिलाफ म्हणजे संपूर्ण मानव. ईश्वरी अंश असणाऱ्या माणसाबद्दल माझी अशी संकल्पना आहे.' या संकल्पनेने झपाटलेले आणि इतरांना झपाटणारे भगवान रजनीश मग आपल्या सध्याच्या घरी रोल्स रॉइसमधून परततात ! □

**[सॅन जोस मर्क्युरी न्यूज (कॅलिफोर्निया) या नियतकालिकात आलेल्या लिखाणाचा स्वैर अनुवाद. अनुवादक - श्री. बाळासाहेब धोपेश्वरकर, कोल्हापूर.]**

# महात्मा आणि माणूस

गांधी–आर्यविन करारावर सह्या झाल्या होत्या. सर्वसामान्य लोकांबरोबर नेहरूंसारखी नेतेमंडळीही निराश झाली होती. फक्त गांधी पूर्वीसारखेच हसतमुख, प्रसन्न होते. ते म्हणत, 'यातना सहन करणं एका मर्यादेनंतर वेडेपणाचं ठरतं. म्हणून करार झाल्याबद्दल मी सर्वशक्तिमान ईश्वराचे आभार मानतो.'
त्यानंतर गांधींची घोषणा होती, 'संपूर्ण स्वराज्य हेच काँग्रेसचं ध्येय आहे.'
गांधी शिररना आपल्या अहिंसक क्रांतीचं महत्त्व पटवून देत असत. दरम्यानच्या काळात शिरर गांधींबरोबर अहमदाबादला जाऊन आले.
गांधी जिथे जात तिथे हजारोंच्या जमावाची झुंबड उडत असे. गांधींची ही शक्ती शिरर यांना अनपेक्षित होती.
अहमदाबादच्या सर्किटहाउसमध्ये पोचल्यावर शिररना आठवला मार्च १९२२ मध्ये गांधींवर ब्रिटिशांनी चालवलेला खटला.
त्यांच्या बचावाच्या मनोगतानं त्यांची प्रतिमा जास्त दृढ होते हे धूर्त ब्रिटिश अधिकाऱ्यांना कळून चुकलं होतं.
म्हणूनच मिठाचा कायदा मोडल्याबद्दल आणि बहिष्काराचा मार्ग अवलंबिल्याबद्दल व्हाइसरॉयनं खटल्याचा धोका न पत्करता गांधींना गुपचूप गजाआड केलं.

**'गांधी–अ मेमॉर'–विल्यम शिरर**
लिखित पुस्तकाचा परिचयात्मक
संक्षेप व स्वैर रूपांतर
**भाग पाचवा । निखिल वागळे**

त्या आठवड्यात मी गांधींबरोबर काही गावांना भेटी दिल्या. गावकऱ्यांच्या दृष्टीने हा महात्मा देवासमान होता. ते त्याचा आशीर्वाद मिळवण्यासाठी तासन्तास ताटकळत बसायचे. आपली दुःखं त्याच्यापुढे मोकळी करायचे. त्यावर गांधींनी काही उपाय सुचवावा अशी त्यांची अपेक्षा असायची.

लागोपाठ सात दिवस आणि रात्री आमचा हा प्रवास चालला होता. जवळजवळ मोडकळीला आलेली एक गाडी आमच्या दिमतीला होती. गाडी कसली, खटाराच तो! रस्ता मुळात बैलगाडीचा. त्यामुळे गचक्यांना सीमा नव्हती!

हमरस्ता किंवा रेल्वेमार्गापासून कित्येक मैल दूर असलेला तो कैरा आणि बारडोली जिल्ह्यातला प्रदेश त्या वेळी अगदी भारावून गेला होता. बहुतेक वेळा गांधी रात्री प्रवास करणं पसंत करत. दिवसापेक्षा रात्रीची हवा थोडी थंड असे. त्यामुळे प्रवासाचा शीण कमी व्हायला मदत होई.

पण त्या अंधारातही हजारो खेडूत त्यांच्या दर्शनासाठी थांबत. बायका तर आपल्या लहान मुलांना घेऊन येत. त्यांच्या हातातल्या कंदिलाच्या प्रकाशाने सारा रस्ता उजळून निघे. मग काही जण आमच्या गाडीला लोंबकळत तर इतर काही गांधींचं दर्शन मिळावं

म्हणून रस्त्याच्या मध्येच बैठक मारत. गांधी मात्र त्यांच्या हट्टापुढे बधत नसत. गाडीच्या खिडकीतूनच ते हात हलवत. खाली उतरायची त्यांची विनंती काही ते मान्य करत नसत.

दुपारच्या वेळी गांधींची बैठक एखाद्या गावात असे. सूत कातता-कातता ते तासन्तास गावकऱ्यांच्या अडचणी ऐकत. कोणाची गाय पोलिसांच्या ताब्यात असे तर कुणी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला म्हणून जमीन गमावलेली असे. कुणाचा नवरा, कुणाची मुलं अजून तुरुंगात होती, तर काहींचं घरच उध्वस्त झालं होतं.

गांधी सर्वांना धीर देत. सहानुभूतीने त्यांच्याशी बोलत. व्हाइसरॉयबरोबर झालेला करार समजावून सांगत.

कायदेभंगाच्या चळवळीत हेच जिल्हे आघाडीवर होते. गांधींना त्या खेडुतांचा अभिमान वाटे. राजकीयदृष्ट्या ते देशातल्या इतर भागांपेक्षा अधिक जागृत आहेत हे जाणवल्यामुळेच की काय, गांधींनी त्या वेळी त्यांना एक राजकीय संदेशही दिला. हाच संदेश तुरुंगातून नुकत्याच सुटलेल्या कॉंग्रेस स्वयंसेवकांमार्फत देशाच्या कानाकोपऱ्यात पोचवण्याच्या प्रयत्नात ते होते. मी त्या वेळी तो टिपून घेतला. आजही माझी ती टिपणं शाबूत आहेत.

गांधी म्हणाले, 'पूर्ण स्वराज्याचं ध्येय अजून साकार झालेलं नाही. पुढच्या लढाईची तयारी करण्याच्या दृष्टीने आपण सध्याच्या तडजोडीचा उपयोग करून घेतला पाहिजे. जोपर्यंत आपल्या मागण्या मान्य होणार नाहीत तोपर्यंत ही लढाई चालू राहील, किंबहुना अधिकाधिक तीव्र होत जाईल.'

□

त्या खेडुतांना गांधींनी हे सांगितलं असलं तरी त्यांच्या मनात मात्र वेगळेच विचार होते. वाटाघाटीच्या मार्गानं आपलं ध्येय साध्य होण्याची फारशी आशा नाही अशा निर्णयापर्यंत ते दिल्ली सोडतानाच आले होते. आमच्या गप्पांच्या वेळी त्यांनी हे बोलून दाखवलं होतं. भरीसभर म्हणून इंग्लंडमधल्या हुजूर पक्षाने गोलमेज परिषदेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळं गांधींचं हे मत अधिकच पक्कं झालं. 'हुजुरांनी आपली भूमिका बदलली नाही तर मी गोलमेज परिषदेसाठी लंडनला जायचं रद्द करीन!' असं त्यांनी पहिल्यांदाच स्पष्टपणे बोलून दाखवलं.

नंतर एकवीस मार्चला पहाटे मी गांधींबरोबर फिरायला गेलो तेव्हा त्यांची ब्रिटिशांवरची नाराजी अधिकच प्रकर्षानं जाणवली. दिल्लीच्या ऐतिहासिक किल्ल्याकडे जाणारा तो धूळभरला रस्ता गांधी सफाईने कापत होते. सुरुवातीला त्यांच्याबरोबर चालणं मला कठीण गेलं. त्या भरात त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष झालं; पण नंतर ही कसरत जमली.

**'ब्रिटिशांनी काळाची पावलं ओळखलेली दिसत नाहीत.' गांधी पुढे म्हणाले, 'स्वातंत्र्यप्राप्ती आता आमच्या दृष्टीनं फार दूर नाही. काही महिन्यांचाच प्रश्न आहे. देव करो आणि या यातना लवकर संपोत!......'**

गांधी त्या दिवशी काहीसे खिन्नच होते. 'संरक्षक-तत्त्वां'चा घोळ घालून ब्रिटिश सरकार आपल्याला फसवू पहातंय असं त्यांना वाटत होतं. दोन तीन दिवसांपूर्वीच गृहसचिव वेजवुड बेन आणि लॉर्ड चॅन्सेलर सँकी यांनी ब्रिटनच्या संसदेत भाषण केलं होतं. सँकी आगामी गोलमेज परिषदेचे अध्यक्ष होते. नवी घटना तयार करताना व्हाइसरॉयच्या हाती सैन्य, परराष्ट्रधोरण, अर्थनीती आणि अल्पसंख्याकांच्या प्रश्नांची सूत्रं रहातील या दृष्टीनं 'संरक्षक-तत्त्वां'चा आग्रह मजूर सरकार धरेल असं या दोघांनी म्हटलं होतं. त्यामुळं आपली सत्ता अबाधित ठेवायलाच ब्रिटिशांना 'संरक्षक तत्त्वं' हवी आहेत असं गांधींना वाटलं असल्यास नवल नाही.

'संरक्षक तत्त्वां'बद्दल सरकारची ही भूमिका अंतिम असेल तर गोलमेज परिषदेला जाण्यात काहीच अर्थ नाही' गांधी म्हणाले. आदल्या दिवशी त्यांनी व्हाइसरॉयलाही हे सांगितलं होतं. 'केवळ भारताच्या हिताच्या दृष्टीनंच 'संरक्षक तत्त्वं' स्वीकारली जातील असं करारात म्हटलं होतं. आता करारातल्या या अटी ब्रिटिश मोडायला निघालेत असं दिसतंय.'

'ब्रिटिशांनी काळाची पावलं ओळखलेली दिसत नाहीत.' गांधी पुढे म्हणाले, स्वातंत्र्यप्राप्ती आता आमच्या दृष्टीनं फार दूर नाही. काही महिन्यांचाच प्रश्न आहे. देव करो आणि या यातना लवकर संपोत...'

स्वातंत्र्यप्राप्तीच्या भरात देशांतर्गत प्रश्न गांधी विसरले नव्हते. ते म्हणाले, 'देशांतर्गत प्रश्न आधी सोडवायला हवेत याची जाणीव मला आहे. विशेषतः हिंदु-मुस्लिम प्रश्न. उद्या रात्री कॉंग्रेस अधिवेशनासाठी कराचीला जाण्यापूर्वी या प्रश्नावर तोडगा निघेल असं मला वाटतंय.'

त्या वेळी मलाही गांधींच्या या आशावादात तथ्य वाटलं. माझी या काळातली बातमीपत्रंही हाच सूर व्यक्त करत होती. तोडगा निघणार आणि लंडनच्या गोलमेज परिषदेत हिंदु-मुस्लिमनेते एकजुटीनं भारताची बाजू मांडणार असं मी लिहिलं होतं.

घटनाही अनुकूल अशाच घडत होत्या.

कैरा-बारडोलीच्या दौऱ्यानंतर गांधी मुंबईला गेले. जवळजवळ दोन दिवस ते मौलाना शौकतअलींबरोबर वाटाघाटी करत होते. हिंदु-मुस्लिम प्रश्नावर तोडगा निघावा म्हणून त्यांची जिवापाड धडपड चालली होती.

मौलाना शौकतअली चांगले उंचेपुरे होते. भरघोस दाढी आणि दणकट शरीर. दहा वर्षांपूर्वी ते आणि त्यांचा भाऊ महंमद गांधींच्या निकटवर्तीयांत होते. नंतर ते कॉंग्रेसपासून अलग झाले आणि मुस्लिम नेत्यांच्या पंक्तीत जाऊन बसले. अतिरेकी धर्मवादी नेत्यांपेक्षा ते तसूभरही वेगळे असल्याचं मग कधी जाणवलं नाही. आतून त्यांना ब्रिटिशांची फूस असल्याचं मला समजलं होतं.

'गांधींनी आमच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या' दोन दिवसांच्या बोलण्यानंतर शौकतअली मला म्हणाले. चर्चेतला मुख्य मुद्दा होता हिंदु-मुस्लिमांचे मतदारसंघ एकत्र असावेत की वेगळे, हा. एकत्र मतदानात हिंदूंच्या बहुसंख्येपुढे आपला टिकाव लागणार नाही अशी भीती मुस्लिमांना वाटत होती. त्यांची लोकसंख्या एकचतुर्थांश होती. (३२ कोटींमध्ये ८ कोटी) स्वाभाविकच विधिमंड-

ळात आपल्याला एकचतुर्थांश प्रतिनिधित्व मिळावं अशी त्यांची मागणी होती; पण गांधींनी नवा तोडगा शोधला. एकत्र मतदारसंघाला मान्यता द्यायला मुस्लिम तयार असतील तर त्यांना एकतृतीयांश जागा द्यायला ते राजी झाले. हिंदू–मुस्लिमांना राजकीयदृष्ट्या वेगळं ठेवेल अशा कुठल्याही गोष्टीला त्यांची तयारी नव्हती.

'आम्ही मागत होतो त्यापेक्षा जास्त गांधींनी दिलं.' शौकतअली म्हणाले. 'आता एकचतुर्थांशाऐवजी एकतृतीयांश प्रतिनिधित्व आमचं असेल, याच भूमिकेवर आम्ही संयुक्त मतदारसंघाना मान्यता दिली आहे. योग्य अंमलबजावणी झाल्याचं दिसलं तर अंतिम तोडगा म्हणून याचा स्वीकार करायला आम्ही तयार आहोत.'

शौकतअली खुषीत दिसत होते. गांधी मात्र नेहमीप्रमाणेच शांत आणि ठाम!

हजारो बळी पचवणारा खुनशी तणाव संपला असं त्या वेळी तरी वाटलं. आठवडयाच्या शेवटी दिल्लीला शांतता करारावर सह्या होणार होत्या.

'शिकागो ट्रिब्यून' मधल्या त्या दिवशीच्या माझ्या बातमीपत्राचा मथळाही याच आशावादाने सजला होता.

**हिंदू–मुस्लिम नेत्यांची**
**शांतता स्थापनेला तयारी**
**एक प्राचीन धर्मयुद्ध संपले : करारावर सह्या होणार !**

पण शांतता करारावर सह्या कधीच झाल्या नाहीत. त्या होऊ नयेत म्हणूनच जणू मुस्लिम धर्मवादी दक्ष होते! गांधींची कुशाग्र बुद्धिमत्ता, त्यांची धडपड फोल ठरली. एक वेळ स्वातंत्र्य मिळवणं गांधींना शक्य झालं असतं, पण मुस्लिमांना, विशेषत: त्यांच्या अतिरेकी नेत्यांना, जिंकणं ही अशक्यप्राय गोष्ट वाटत होती. स्वतःचं राष्ट्र या नेत्यांना हवं होतं. त्यासाठी भारतातून फुटून निघायचीही त्यांची तयारी होती!

'माझ्या आयुष्यातलं हे सगळयात मोठं अपयश आहे. त्याची बोच मला नेहमीच राहील.' गांधी त्यानंतर अनेकदा म्हणाले.

¤

गांधींच्या या प्रयत्नांना खो घालण्यात आघाडीवर होते महमदअली जिना.

भारतातल्या दोन वर्षांच्या वास्तव्यात जिनांशी माझी दोस्ती झाली. आपल्या मलबार हिलवरच्या प्रशस्त घरी त्यांनी मला अनेकदा बोलावलं. कधी चर्चा करण्यासाठी तर कधी त्यांच्या मित्रमंडळींना भेटण्यासाठी. काही वेळा निव्वळ मद्यपानासाठीही मी तिथे गेलो.

गांधी–नेहरूंप्रमाणेच जिनाही बॅरिस्टर होते; पण त्यांची रहाणी मात्र अगदी विरुद्ध टोकाची. त्यांचा पोशाख, सवयी पूर्णपणे पाश्चात्य. खेळाचीही आवड ऐषारामात रहाणं त्यांना विशेष आवडे. लंडनच्या बॉन्ड स्ट्रीटवर ते कपडे खरेदी करत. ते वापरण्यातली त्यांची टापटीपही और होती. तब्येतीत मद्यपान करायचं, चांगलंचुगलं खायचं आणि उंची सिगरेटी ओढायच्या हा त्यांचा स्थायीभाव होता. मद्यातही व्हिस्कीच घेणं ते पसंत करत.

गोरगरिबांविषयी त्यांना फार आस्था होती, अशातलाही प्रकार नाही. किंबहुना ते त्यांच्याविषयी तुच्छतेनेच बोलत. मग गांधींसारखा तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करणं दूरच. ते पहिल्या वर्गानं जात आणि संस्थानिकांसोबत किंवा पाश्चात्य धर्तीच्या हॉटेलात रहात.

त्या वेळी तरी त्यांचा धर्माशी काही संबंध असल्याचं मला आढळलं नाही. नमाजालाही ते क्वचितच जात. प्रेषिताचा कोणताही कायदा मोडण्यात त्यांना दिक्कत वाटत नव्हती; मग तो डुकराचं मांस खाण्याचा, दारू पिण्याचा किंवा अगदी धर्माबाहेर विवाह करण्याचा का असेना! त्यांची धर्मांधता ही पश्चातबुद्धी होती. तिच्यापाठी राजकीय स्वार्थ होता. पुढं पाकिस्तानसारख्या इस्लामी राष्ट्राचा प्रणेता ठरलेला हा माणूस अक्षरश: अपघातानंच मुस्लिम असल्याचं त्या वेळी मला दिसलं.

जिना बाटगे मुसलमान होते. मुळात ते काठेवाडचे. गांधींप्रमाणेच बनिया. त्यांच्या आजोबानी मुस्लिम धर्म स्वीकारला. का–कशासाठी हे त्यांनाही नीटपणे माहित नव्हतं. मुस्लिम आईबापाच्या पोटी जन्मले म्हणून ते मुस्लिम होते इतकंच. ते आपल्या धर्माचा गंभीरपणे विचार करताहेत असं भारतात असेपर्यंत तरी मला कधी दिसलं नाही. गांधींसारखे ते इतर धर्मांबाबत सहिष्णु होते. एका पारशी मुलीशी त्यांनी लग्नही केलं होतं.

राजकारणाचा एक भाग म्हणूनच त्यांनी मुस्लिमांचं नेतृत्व स्वीकारलं होतं. त्यापाठी किंचितही धर्मश्रद्धा नव्हती. सुरुवातीला ते काँग्रेसमध्येही होते. पहिल्या महायुद्धाच्या शेवटी त्यांनी काँग्रेस सोडली आणि आपल्या अनुयायांसह मुस्लिम लीगमध्ये प्रवेश केला. त्यानंतरही बराच काळ ते हिंदू-मुस्लिम तोडगा आणि स्वराज्याच्या प्रश्नाच्या निमित्तानं गांधींबरोबर काम करत होते. गांधींशी त्यांनी फारकत घेतली १९२१ साली. कायदेभंगाच्या चळवळीला त्यांचा विरोध होता. अशा तऱ्हेने कायदा मोडणं योग्य होणार नाही असं त्यांचं मत होतं. गांधी देशातल्या सुशिक्षितांऐवजी अडाण्यांना हाताशी धरताहेत असं त्यांना वाटे. रस्त्यावर अशा तऱ्हेनं सत्याग्रह करणं त्यांच्या वृत्तीतच बसत नव्हतं. वकीलमंडळींनी बसून नवी घटना तयार केली तर स्वराज्य मिळवता येईल असा कायद्यावर भरवसा ठेवणाऱ्या या घटनातज्ज्ञाचा विश्वास होता.

'इतिहासाकडे नजर टाकली तर आजपर्यंत कुणालाही संघर्षाशिवाय स्वातंत्र्य मिळालेलं नाही हे लक्षात येतं. अगदी आमच्या देशाचं जरी उदाहरण घेतलं तरी हेच सिद्ध होईल.' मी एक दिवस त्यांना म्हटलं.

**जिना बाटगे मुसलमान होते. राजकारणाचा एक भाग म्हणूनच त्यांनी मुस्लिमांचं नेतृत्व स्वीकारलं होतं. त्यापाठी किंचितही धर्मश्रद्धा नव्हती. सुरुवातीला ते काँग्रेसमध्येही होते. पहिल्या महायुद्धाच्या शेवटी त्यांनी काँग्रेस सोडली आणि मुस्लिम लीगमध्ये प्रवेश केला.**

'माझ्यावर विश्वास ठेव मित्रा...' ते आपल्या भूमिकेवर ठाम होते. 'गांधी आणि त्यांच्या अनुयायांसारखंच आमचं ध्येय आहे. स्वराज्य आम्हालाही हवंय; पण फक्त घटनात्मक मार्गानंच ते मिळू शकेल असं आम्हाला वाटतं. लंडनच्या गोलमेज परिषदेतून ते मिळवायचं आम्ही ठरवलंय.'

हे अशक्यप्राय होतं. वास्तवापेक्षा त्यात कल्पनारम्यता अधिक होती; पण जिना भयंकर हट्टी होते. त्यांना हे पटलं नसतं आणि पटलं असतं तरी त्यांनी तसं कबूल केलं नसतं.

हिंदू मुस्लिम तणावावर उपाय म्हणून वेगळं मुस्लिम राज्य निर्माण करावं वगैरे चर्चा मात्र जिनांच्या घरी मला तेव्हा ऐकू आली नाही. अशा तऱ्हेची कल्पना त्यांच्या डोक्यात त्या वेळी आली असेल यावर माझा विश्वास नाही त्यानंतर दोन वर्षांनी, १९३३ मध्ये, लंडनमधल्या भारतीय मुस्लिमांच्या सभेत जेव्हा ही कल्पना पुढे आली तेव्हाही जिनांनी ती उडवून लावली होती. 'हे एक अशक्यप्राय स्वप्न आहे,' असे त्या वेळचे त्यांचे उद्गार होते.

पण त्यानंतर हळूहळू जिनांचं मत बदललं. हिंदूंची बहुसंख्या असलेल्या स्वतंत्र भारतात मुस्लिमांना स्थान रहाणार नाही असं त्यांना वाटू लागलं. शेवटी शेवटी तर त्यांचा हा अतिरेक एवढा पराकोटीला पोचला की, ब्रिटिशांनी, गांधी–नेहरूंनी अनेक आर्जवं करूनही त्यांनी ऐकलं नाही. आपल्या दुराग्रहावर ते ठाम राहिले आणि फाळणी घडवून आणण्यात यशस्वी झाले!

जिनांच्या वकिली चातुर्याचा प्रत्यय इथंही आला. स्वातंत्र्यासाठी लढले गांधी. त्यांनी अहिंसक लढ्यानं देश पेटवला. जिनांच्या पदरी मात्र एक स्वतंत्र राष्ट्र आयतंच पडलं! स्वतंत्र पण डगमगतं मुस्लिम राष्ट्र. फुटीरपणाचा शाप नशिबी असलेलं राष्ट्र. पाकिस्तानातून बांगला फुटून निघाला तेव्हा पुन्हा एकदा हेच सिद्ध झालं बांगला देश जन्मला आणि संपलाही!

'धार्मिक पायावर उभं असलेलं पाकिस्तानासारखं राष्ट्र विसाव्या शतकात तग धरू शकणार नाही. पहिल्या महायुद्धानंतरच तुर्कस्थाननं हे सिद्ध केलं आहे.' नेहरूंनी मला एकदा ठासून सांगितलं होतं. त्या वेळी भारत स्वतंत्र झाला होता आणि ते पंतप्रधान होते.

जवळजवळ पाकिस्तानएवढेच मुसलमान भारतात आहेत, त्यानाही इतर धर्मांप्रमाणे उपासनास्वातंत्र्य आहे आणि ते गुण्यागोविंदाने नांदताहेत याचा नेहरूंना अभिमान वाटे.

ब्रिटिश राज्यात मात्र अशी परिस्थिती नव्हती. कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळीही हिंदू-मुस्लिम दंगे होत असल्याचा आणि हजारो मुडदे पडत असल्याचा अनुभव मी घेतला होता. यापैकी किती दंग्यांना ब्रिटिशांची चिथावणी होती हे शोधून काढणं अवघड होतं. एकदा मुंबईच्या ब्रिटिश पोलिसप्रमुखानं मला हसतहसतच सांगितलं होतं, 'हिंदू–मुस्लिम दंगा पेटवण्याइतकं सोपं काम नाही. फक्त शंभर डॉलर्स खर्चून तुम्ही एखादं हत्याकांड सुरू करू शकता. एखाद्या देवळात गाईचं मांस फेकण्यासाठी काही मुस्लिमांचे हात गरम करा किंवा एखाद्या मशिदीत डुकराचं मांस टाकण्यासाठी चार हिंदूंना लाच द्या. बस्स! मग कशी माणसं मारली जातात एवढंच आपण पहायचं!!'

अर्थात ब्रिटिशांची भूमिका काहीही असो, त्यामुळं हिंदू–मुस्लिम नेत्यांच्या उणीवा मात्र झाकता यायच्या नाहीत. दोन्ही बाजूचे बहुसंख्य नेते बेजबाबदार तर होतेच; पण संशयग्रस्त होते. असल्या अतिरेकापायी ते अनुयायांना भडकवत.

खरं तर भारतातले बहुसंख्य मुस्लिम वर्णदृष्ट्या हिंदूंना जवळचे होते. त्यांची पार्श्वभूमीही सारखी होती. यापैकी अनेकांना मुघल साम्राज्यात जबरदस्तीनं मुस्लिम करण्यात आलं होतं. काही जण मात्र इस्लाममधली विश्वबंधुत्वाची भावना, समतेची तत्त्वं यांच्या मोहात पडून मुसलमान झाले होते. यापैकी बहुतेकजण हिंदू धर्मात खालच्या मानल्या गेलेल्या जातीचे होते किंवा अस्पृश्य होते. बंगालमध्ये तर हिंदू–मुस्लिमात फरक करणंच अवघड गेलं. दोघंही बंगाली बोलायचे, सारखे दिसायचे, तापटपणा आणि काव्यावरचं प्रेम दोघांचंही अगदी खास बंगाली खावयातल. चालीरीतीही सारख्याच. दोघांची लोकसंख्या जवळपास पाच कोटीच्या घरात. (त्यात पूर्व बंगालात मुस्लिमांची किंचित बहुसंख्या) फक्त धर्मानंच ते वेगळे होते असं म्हणायला हवं.

धर्मानंच भारतात एक प्रचंड दुभंग निर्माण केला होता जगाच्या पाठीवर अशा तऱ्हेनं भांडणारे, विरुद्ध टोकाची भूमिका घेणारे दुसरे धर्म नव्हते.

हिंदू धर्माला एखादं विशिष्ट धर्मपीठ नाही, त्यांची उपासनेची पद्धत एकच नाही किंवा एक देव नाही हे मला कळलं तेव्हा तर मी थक्कच झालो. हिंदूंना देव विविध रूपात दिसे. अगदी हत्ती, माकडं, सापापासून दगडधोंड्यापर्यंत!

इस्लामचं रूप यापेक्षा खूपच सोपं होतं. त्यांचा देव फक्त एकच–अल्ला, प्रेषित एकच-महंमद आणि त्या धर्मातलं अंतिम सत्यही एकच–कुराण!

मुस्लिम मशिदीत समूहानं प्रार्थना म्हणत. हिंदू आपल्या घरी किंवा देवळात एकट्यादुकट्यानंही प्रार्थना करत.

मुस्लिम धर्म कर्मठ असहिष्णु विचाराचा होता, तर हिंदू त्यामानाने सहिष्णु. हिंदूतली जातिव्यवस्था मात्र भयानक होती. त्या जातिव्यवस्थेवरच हिंदू धर्म आधारलेला होता. मुस्लिमाना ती अजिबात आवडत नसे.

या जातिव्यवस्थेमुळे हिंदू–मुस्लिमातली दरी अधिक वाढली. हिंदू अस्पृश्यतेचा नियम मुस्लिमांनाही लागू करत. मुस्लिमांचा संपर्क त्यांना अभद्र वाटे. कर्मठ हिंदू मुस्लिमांबरोबर जेवायचं तर सोडाच पण पाणीही घेत नसत. गावात हिंदू–मुस्लिमांसाठी वेगळ्या विहिरी होत्या. दारिद्र्यातही ही मंडळी धर्माभिमान टिकवून होती.

आहारातला फरकही तणावाला कारणीभूत होता. हिंदू शाकाहारी होते. गाईला ते पवित्र मानत. गाईचं मांस त्यांना निषिद्ध होतं. गाईला मारणं ते पाप समजत. सहाजिकच त्यांना मांसाहार करणाऱ्या ब्रिटिशांची व मुसलमानांची तिडिक येई.

गाईबद्दलची हिंदूंची श्रद्धा हे मला त्या वेळी एक गूढच वाटे. गावातच नव्हे तर मुंबई–कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरातल्या रस्त्यावर अनेकदा हे जनावर मुक्तपणे फिरताना मी पाहिलं. मरणाच्या घरात आलेल्या अवस्थेत त्या गाई अन्नाच्या शोधात फिरत. त्या जर्जर-अवस्थेत त्यांना पहाणं अक्षरश: नकोसं वाटे. हे असह्य झालं म्हणूनच की काय एकदा एका गोऱ्या साहेबानं त्यांना मारावचं ठरवलं

तर संतापलेल्या जमावानं त्याच्यावर हल्ला केला. हाडकुळी का होईना गाय त्यांना देवासमान होती !

गाईबाबतचं हे कर्मकांड मला त्या वेळी निरर्थक वाटत असलं तरी, प्राचीन काळी मात्र ती एक उपयुक्त गोष्ट होती. मध्य आशियातून भारतावर चाल करून येणारे आर्य आक्रमक प्रामुख्यानं गाईचं दूध, लोणी वगैरे आहार घेत. स्वाभाविकपणे बरोबरच्या गाईंच्या कळपावर त्यांची भिस्त होती कधी तरी ते गाईच्या मांसाचाही अन्न म्हणून उपयोग करत; पण दुष्काळ पडला तेव्हा गाईंची ही हत्या प्रमाणाबाहेर वाढली. हे थांबलं नाही तर गाईंचे कळप पूर्णतः नष्ट होतील असं त्या वेळच्या काही मंडळींना वाटलं. त्यांनी गाईसोबत पावित्र्य जोडलं. गाईची हत्या करणं पाप वगैरे कथा तेव्हापासूनच सुरू झाल्या या पावित्र्याच्या कल्पनेनंच आर्यांच्या गाईंचं रक्षण झालं.

पण यामुळं गाईंची संख्या भरमसाठ वाढली. ती दहा-पंधरा कोटीच्या आसपास असावी असं एकदा प्रोफेसर शहांनी मला सांगितलं. भारतासारख्या देशाला हे परवडणारं नव्हतं. मुळात इथले बहुसंख्य लोक अर्धपोटी जगत होते, मग गाईंना पोसायला अन्न कुठून आणणार ?. प्रोफेसर शहांच्या मते यापैकी फक्त अर्धीच जनावरं उपयुक्त होती. काही दूधदुभत्यासाठी तर काही ओझी वाहण्यासाठी म्हणजे उरलेली ५ ते ७ कोटी अनावश्यक होती. त्यांच्यावर खर्च केलं जाणारं अन्न फुकट गेल्यातच जमा होतं. त्यांना मारून टाकणंच योग्य असं शहांना वाटायचं; पण ते स्वतः हिंदू होते आणि असली मारून टाकायची भाषा इतर हिंदू ऐकून घ्यायचे नाहीत हे त्यांना माहीत होत.

गांधीही या इतर हिंदूंपैकीच एक होते. या सर्व गाईंचं रक्षण झालं पाहिजे अशी त्यांची ठाम भूमिका होती. ईश्वराचीच तशी इच्छा आहे असं ते म्हणायचे.

'देव जर खरोखर असेल तर त्यालाही या हडकुळ्या जनावरांची दया येईल आणि त्याना मारायची परवानगी तो देईल.' मी एकदा त्यांना म्हटलं; पण त्याची भूमिका कायम होती.

हिंदू धर्मातल्या जातिव्यवस्थेचंही ते असंच समर्थन करत. एकेकाळी या जाती उपयुक्त होत्या, वर्णव्यवस्थेमुळं श्रमविभागणी झाली होती वगैरे बऱ्यावाईट गोष्टी मला समजत होत्या; पण विसाव्या शतकात ही विषमता चालू ठेवणं हे मला दिवाळखोरीचं लक्षण वाटत होतं. स्वतंत्र होण्यासाठी धडपडणाऱ्या भारताच्या दृष्टीनं तर या जाती कुचकामाच्या होत्या. आधुनिक समाजाच्या प्रगतीच्या मार्गातला तो एक अडथळा बनून राहिला होता. जवाहरलाल नेहरूंसारख्या काँग्रेसच्या तरुण नेत्यांना तो एक शाप वाटे. जातिवर्गविरहित समाजवादी प्रजासत्ताकाचं स्वप्न नेहरूंच्या डोळ्यांसमोर होतं; पण गांधी याच्याशी सहमत नव्हते. समाजवादाची आपल्याला फारशी आवड नाही असं ते बऱ्याचदा बोलून दाखवत. (यावर त्याना समाजवाद समजत नाही असं नेहरू म्हणत )

गांधींना जातिव्यवस्थेत सुधारणा करायच्या होत्या. जातिव्यवस्था मूलतः चांगली आणि अजून उपयुक्त आहे असंच ते म्हणत. खरं तर त्यांनी आयुष्याच्या सुरुवातीलाच जातिव्यवस्थेचा फटका खाल्ला होता. म्हणूनच त्याच्या या मताचं मला आश्चर्य वाटे. 'मोध बनिया' ही त्यांची जात. जमातीच्या नेत्यांचं ऐकायला नकार दिला म्हणून त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला होता.

१८८८ सालची गोष्ट. कायद्याचा अभ्यास करायला गांधी लंडनला चालले होते. त्या वेळी समुद्रपर्यटन हे हिंदूंच्या दृष्टीनं धर्मबाह्य कृत्य होतं. गांधींना त्यांच्या जातीतल्या वयस्कर मंडळींनी बोलावलं आणि लंडनला जायचं रद्द करायला सांगितलं. युरोपिअनांबरोबर खाण्यापिण्याची आपल्या धर्मात परवानगी नाही असं ही मंडळी म्हणाली. गांधींनी त्यांना धुडकावलं. त्यांच्यावर कडकडीत बहिष्कार पडला. जवळचे नातेवाईकसुद्धा त्यांना घरात घ्यायला, पाणी द्यायला नकार देऊ लागले.

गांधींनीच एकदा हसतहसत हे मला सांगितलं होतं. या बहिष्कारानंतर पुन्हा कधीच त्यांनी जातीत पुनर्प्रवेश मिळवायची खटपट केली नव्हती. या अनुभवामुळं इतर हिंदूंपेक्षा आपली दृष्टी व्यापक झाली असं ते म्हणाले. त्यानंतर त्यांनी कधी जाती-पातीची बंधनं मानली नाहीत. पुढं अहमदाबादमधल्या आश्रमात त्यांनी एका अस्पृश्य कुटुंबाला प्रवेश द्यायचा आग्रह धरला तो याच दृष्टिकोनामुळं सनातनी हिंदूंना हे पटणं शक्यच नव्हतं. किंबहुना यामुळं त्यांच्या तळपायाची आग मस्तकात जात असे !

एक दिवस माझी गांधींशी या विषयावर खूप वेळ चर्चा झाली. त्यानंतर आठवडाभराने त्यांनी मला 'यंग इंडिया'तल्या त्यांच्या जातिविषयक लिखाणाची कात्रणं दिली.

'आजही मी यातला एक शब्द बदलणार नाही !' ते म्हणाले, 'माझ्याबरोबरच्या काही संतप्त तरुणांना हे आवडत नसलं तरी माझा यावर ठाम विश्वास आहे !'

त्यांना नेहरू अभिप्रेत होते; पण त्यांनी कुणाचं नाव घेतलं नाही.'

या कात्रणातले काही उतारे मी अजून जपून ठेवले आहेत. गांधींची जातीबद्दलची मतं त्यावरून स्पष्ट होतात. खास 'गांधीवादी विसंगती' ही त्यात दिसते !

एका लेखात ते म्हणतात—

'जातिव्यवस्था भारताच्या गुलामीला कारणीभूत आहे आणि तिच्यामुळं विनाश ओढवेल असं काही जण म्हणतात; पण आजच्या आपल्या स्थितीला जात कारणीभूत आहे असं मला वाटत नाही. कोणत्याही मूल्यांबद्दल आपल्याला आदर राहिलेला नाही. आधाशीपणानं अधिकाधिक फायदे उकळण्यात सगळे गुंग आहेत. गुलाम-

**हिंदू धर्मातल्या जातिव्यवस्थेचंही ते असंच समर्थन करत. विसाव्या शतकात ही विषमता चालू ठेवणं हे मला दिवाळखोरीचं लक्षण वाटत होतं. जवाहरलाल नेहरूंसारख्या काँग्रेसच्या तरुण नेत्यांना तो एक शाप वाटे. पण गांधी यांच्याशी सहमत नव्हते.**

गिरीची खरी बीजं यातच आहेत. जातिव्यवस्थेमुळं उलट हिंदुस्थानची अधोगती रोखली गेली आहे.'

पुढे लगेच विरोधाभास—

'मी जातीपाती मानत नाही असं मी अनेकवार सांगितलं आहे. तो प्रगतीतला एक अडथळा आहे. माणसामाणसातल्या विषमतेवरही माझा विश्वास नाही. आपण सगळे समान आहोत.'

पण—

'माझा वर्णव्यवस्थेवर विश्वास आहे. त्यामुळं श्रमविभागणी होते ती आवश्यक आणि नैसर्गिकही आहे. ही मूलभूत विभागणी नष्ट करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला माझा विरोध राहील!'

वर्णव्यवस्थेतल्या आनुवंशिकतेला त्यांनी दिलेला पाठींबा तर निव्वळ आश्चर्यकारकच म्हणावा लागेल. ते म्हणतात—

'आनुवंशिकतेचा कायदा हा एक सनातन, शाश्वत कायदा आहे असं मी मानतो. तो बदलण्याचा, सुधारण्याचा प्रयत्न करणं म्हणजे गोंधळाला आमंत्रण होय. पूर्वीही हेच सिद्ध झालं आहे. एखाद्या ब्राह्मणाला आयुष्यभर ब्राह्मण मानणं यात मला आणखी एक फायदा आहे तो जर ब्राह्मणासारखा वागला नाही तर त्याला तसे मानसन्मानही मिळणार नाहीत!

याहीपेक्षा अधिक आश्चर्य मला वाटलं गांधींनी सहभोजन, आतरजातीय विवाह, एक पाणवठा वगैरेला आक्षेप घेतला तेव्हा. हिंदू धर्मातली विषमता मोडून काढण्यासाठी या मार्गानं वातावरण निर्माण केलं पाहिजे असं नेहरू आणि त्यांच्या तरुण सहकाऱ्यांना वाटत होतं; पण गांधींनी आपल्या लेखात लिहिलं—

'लोकशाहीच्या वाढीच्या दृष्टीनं या गोष्टी आवश्यक आहेत असं मला वाटत नाही. लोकशाही घटनेनुसार प्रत्येकाला आपले रीतिरिवाज पाळण्याचा हक्क आहे. कुणाबरोबर खायचं—प्यायचं हे ठरवणं हा प्रत्येकाच्या मर्जीचा प्रश्न आहे. एखाद्याबरोबर खायला—प्यायला एखाद्यानं नकार दिला तर ते मी पाप मानायला तयार नाही.'


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

—डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर

प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.


सगळ्यात मजेची गोष्ट म्हणजे गांधींनी हिंदू रीतिरिवाज कधीही पाळले नाहीत. रस्त्यात किंवा आश्रमात ते कुणाबरोबरही जेवत, मग तो माणूस अस्पृश्य असो मुस्लीम असो किंवा माझ्यासारखा अमेरिकन असो.

जातिव्यवस्था किंवा गायीबद्दलची कालबाह्य मतं वागवणारे गांधी मला एखाद्या जरठ म्हाताऱ्यासारखे वाटले. कर्मठपणानं जणू त्यांचा मेंदू धुरकटून गेला होता.

पण हेच गांधी अस्पृश्यतेविरुद्ध मात्र आपल्या आयुष्याच्या अंतापर्यंत लढले. सनातन्यांना गांधींनी अस्पृश्याबरोबर रहाणं, त्यांच्या थाळीत जेवणं हे पाप वाटत होतं; पण गांधींनी त्यांना दाद दिली नाही. जोपर्यंत अस्पृश्यतेचा हा सैतानी कलंक मिटत नाही तोपर्यंत भारताच्या स्वातंत्र्याला अर्थ नाही असं ते हिंदूंना बजावत. देशातल्या अनेक सभांतून हाच विषय पुन्हा पुन्हा मांडताना ते मला दिसले.

'हिंदू-मुस्लिम ऐक्याप्रमाणे अस्पृश्यता नष्ट होणंही स्वराज्याच्या दृष्टीनं आवश्यक आहे. आपण ब्रिटिश साम्राज्याचे गुलाम झालो, कारण आपणही कुणाला तरी गुलामीत ठेवलं. देशातल्या एकपचमांश लोकांची ही गुलामगिरी जोपर्यंत चालू राहील तोपर्यंत स्वातंत्र्य मिळवायला आपण नालायक ठरू.' ते सांगत.

अस्पृश्यांना ते 'हरिजन'—देवाची लेकरं म्हणत.

गांधींच्या लैंगिक कल्पनाही विचित्र होत्या. नुसत्या विचित्र नव्हे तर अमानुषसुद्धा! नेहरूंनी त्या स्वीकारायचं नाकारलं. त्यांचा धिक्कारही केला. लैंगिकतेबाबत गांधींचा स्वतःशीच एक झगडा चालू होता. त्याविषयी त्यांनी मोकळेपणाने लिहिलं आहे. अनेकदा बोलतही. अनेक भारतीयांच्या मते पुढे पुढे आपल्या उतारवयात गांधी ब्रह्मचर्याच्या शपथेपासूनही ढळले. त्याबद्दल मी नंतर लिहिणार आहे.

भारत सोडताना गांधी आणि महमदअली जिना यांच्यातली दरी मला स्पष्टपणे दिसत होती. स्वातंत्र्य मिळवणं, हिंदू-मुस्लिम प्रश्न सोडवणं ही दोघांची समान ध्येयं होती; पण दिवसेंदिवस ते अधिकाधिक दूर जात होते. स्वतंत्र भारतात हिंदूंचं वर्चस्व असेल असं जिनांना वाटत होतंच; पण त्याहीपेक्षा गांधींविषयी त्यांच्या मनात तिरस्कार निर्माण होत होता.

'गांधींची हिंदू फॅडं मला पसंत नाहीत' ते म्हणत. इथे मला भेटायला आल्यावर त्यांना जाड्याभरड्या रगवर बसण्याची गरजच का? बोलणी चालू असताना तुरुंगातून आणलेल्या घाणेरड्या कपातून ते शेळीचं दूध पितात तेव्हा तर मला किळस येते. वर पुन्हा त्यांची दारू—सिगरेट—मांसाहाराविरुद्ध प्रवचन कशाला? मला मास आवडतं. स्कॉच पिणं, तब्येतीत सिगरेटी ओढणं हा तर माझा छंद आहे. हिंदूंच्या मूर्खपणाचा मला राग येतो, तिरस्कार वाटतो. गाईला पवित्र काय मानतात! म्हणे मुस्लिमांना गाय मारायचा अधिकार नाही! मी मुस्लिम म्हणून हे माझ्याबरोबर जेवणार नाहीत, हातही मिळवणार नाहीत. गांधीही याचं समर्थन करतात. त्यांच्या प्रत्यक्ष वागण्यात तेवढा अतिरेक नसतो हे खरं; पण हिंदूंची वैशिष्ट्यं त्यांच्यातही आहेतच!'

पुढे जिनांच्या मनातल्या या तिरस्काराचं रूपांतर हिंदुद्वेषात झालं असं मला माझ्या भारतातल्या मित्रांनी सांगितलं; पण मी

भारतात होतो तोपर्यंत जिना सौम्यच होते. त्यांची विनोदबुद्धी शाबूत होती. स्वातंत्र्याच्या सुमाराला त्यांच्या चेहऱ्यावर सतत दिसणारा कठोर भाव अजून दूर होता. त्यांच्या घरच्या पार्ट्यांना मुंबईतल्या लावण्यवती स्त्रियांची उपस्थिती असते. त्यापैकी बहुतेकजणी गोड पारशिणी होत्या. पार्ट्यांतून कुराणाची मनाई असलेलं दारूकामही सर्रास चालायचं !

काही वेळा जिना हरवल्यागत दिसत. काही तरी दुःख त्यांना जाचतंय असं त्यांच्या चेहऱ्यावरून वाटे. स्वतःविषयी ते कधीच बोलायचे नाहीत. माझ्याकडे तर कधीच नाही; पण दोन–तीन वर्षांपूर्वी त्यांचं लग्न मोडल्याचं आणि त्यानंतर वर्षभरातच त्यांची बायको गेल्याचं मला माहीत होतं. हेच दुःख अजून हलकं झालं नसावं...

जिना त्या वेळी एकेचाळीस वर्षांचे होते. ती सुंदर पारशी मुलगी त्यांना आवडली. ते प्रेमातच पडले. तिचे वडील त्यांचे मित्र होते; पण त्यांचा या लग्नाला विरोध होता. जिनांनी त्यांना न जुमानता मुलगी अठरा वर्षांची होताच तिच्याशी लग्न केलं.

मुलगी हुशार होती. जिनांप्रमाणेच राजकीय कार्यकर्ती होती आणि स्वातंत्र्यचळवळीसाठी तिनं वाहून घेतलं होतं. अत्यंत आकर्षक असं हे जोडपं. त्यांचं नेमकं का फाटलं हे मला कधीच समजू शकलं नाही; पण जिनांकडे पार्टीला येणाऱ्या बायकांकडून समजलं की, त्यांच्या वयातलं अंतर याला कारणीभूत होतं. शिवाय स्वतंत्र बाण्याच्या या बुद्धिमान स्त्रीशी जमवून घेणंही जिनांना जमलं नाही. फार दिवस ते एकत्र राहू शकले नसते !

अखेर १९२८ साली–लग्नानंतर दहा वर्षांनी-त्या मुलीनं जिनांचा निरोप घेतला. त्यानंतर वर्षानं मादक पदार्थांच्या अंमलाखाली तिचा मृत्यु झाला !

जिना या धक्क्यातून कधीच सावरले नाहीत. त्यांनी पुन्हा लग्न केलं नाही. पूर्ण वेळ ते भारतातल्या मुस्लिमांसाठी काम करू लागले.

इतिहासाच्या या करामतीचं कौतुक करायला पाहिजे...

जिनांसारखा निधर्मी माणूस बघता बघता धर्मातिरेकी झाला आणि एका मुस्लिम राष्ट्राचा जनक बनला !...

आणि गांधी...धर्मावर अपरंपार श्रद्धा ठेवणाऱ्या या भारतीयाच्या नशिबी आली भारताची फाळणी ! या फाळणीतून जन्मला एक निधर्मी भारतीय सर्व धर्मांबद्दल सहिष्णुता दाखवणारा, कोणत्याही एका धर्माचा झेंडा न मिरवणारा...

या दोन्ही गोष्टी धक्कादायक वाटतात. विश्वास ठेवणं कठीण जावं इतक्या परस्परविरोधी वाटतात! ...

इतिहास अशाच धक्कादायक घटनांनी समृद्ध असतो म्हणा !

(क्रमशः)

---

काही प्रतिनिधींनी दिल्ली कराराला मान्यता देणाऱ्या ठरावाला विरोध दर्शवला. ब्रिटिशांबरोबर वाटाघाटी करण्याचे पूर्ण अधिकार गांधींना द्यायलाही ते तयार नव्हते. लंडनच्या गोलमेज परिषदेत गांधी जे काही ठरवतील त्याला नंतर काँग्रेसने मान्यता दिल्याशिवाय ते अंतिम समजण्यात येऊ नये अशी दुरुस्ती या मंडळींकडून आली.
आता गांधींची कसोटी होती; पण त्यांनी ज्या कौशल्याने, हुशारीने या प्रतिनिधींवर विजय मिळवला ते एक रोमहर्षक दृश्य होते....

## महात्मा आणि माणूस : भाग ५ वा

# कराची काँग्रेस

## पुढील अंकात



पुस्तके

# गुडबाय् जॅनेट!! गुडबाय् अमेरिका!

**प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी**

एकेका लोकप्रिय लेखकाची सद्दी असते, जशी मराठीत खांडेकर–फडके यांची होती. अर्थात फडके–खांडेकर सातत्याने लोकप्रिय नव्हते. आता तर त्यांच्या कादंबऱ्या हव्या तेवढ्या खपतही नाहीत. कारण फडके–खांडेकरांचे 'फॉर्म्युले' आणि आजची पिढी वेगळ्या वेव्हलेंग्थवर वावरतात. सिनेमाप्रमाणेच लेखकही लोकप्रिय असेल तरच मोठा ठरतो. निदान बहुसंख्य निरक्षर व परभृत साहित्य असलेल्या भारतात तरी लोकप्रिय झाल्यावर तो लेखक स्वतःच्या ताकदीच्या वर्तुळात गिरक्या घेतो. ही गिरकी चालू असता अनेक कारणांनी आपला रसिक (फॅन) वर्ग उठून गेल्याचे त्यांना जाणवते;परंतु प्रकाशक,भाषांचे इतिहासकार वगैरे मंडळी त्यांची ढासळलेली लोकप्रियता, तार कमी पडलेल्या पाकातल्या बुंदीच्या लाडूप्रमाणे पुन्हापुन्हा बांधून पुढचा बांधतच असतात. अमेरिकन लेखकांत आयर्विंग वालास व हॅरॉल्ड रॉबिन्स (ज्यू धर्माचे) यांची लोकप्रियता ओढूनताणून तेवढीच स्वबळावर टिकून राहिली आहे. इंग्लिश भाषेत लिहिणाऱ्या 'पापिलर' लेखकाला त्याच्या देशातल्या वाचकांनी टाकले, तरी इतर देशांतील आंग्लशूद्र मंडळी त्यांना हात देतात. भारतापुरते पाहिले तरी ज्या नायपॉलचे नाव इंग्रजी भाषा व साहित्य शिकविणाऱ्यांना माहिती नाही, त्या नायपॉलला इंग्लंडमध्येच गिऱ्हाईक नाही, तर तो नोबेल–पारितोषिकाच्या 'नॉमिनीज्'मध्ये आहे! तेव्हा चालू चित्रपट काढणाऱ्यांना हसून उपयोग नाही. शेवटी यशस्वितेचाही एक फॉर्म व फॉर्म्युला असतो, प्रोफार्मा भरल्याप्रमाणे! पण बहुतेकांना तो साधत नाही. कारण 'मिडासचा स्पर्श' कामयाब ठरू शकतो, तो दिसत नाही की दाखवता येत नाही. हॅरॉल्ड रॉबिन्सच्या एकूण १६ कादंबऱ्या 'नेव्हर लव्ह ए स्ट्रेंजर' ते 'गुडबाय जॅनेट'! सरासरी २४ महिन्यांना एक या वेगाने ह्या सरासरी ४०० पृष्ठांच्या कादंबऱ्या त्याने लिहिल्या. ह्या ३०–३२ वर्षांत रॉबिन्स कोट्याधीश तरी जरूर बनला! बर्नार्ड शॉ देखील एवढा श्रीमंत होता का याची चौकशीच करावी लागेल! रॉबिन्सची संपत्ती मॉमएवढी असावी; परंतु मॉम व रॉबिन्स वेगळ्या जातीचे लेखक आहेत.

'गुडबाय, जॅनेट्'ची नायिका जॅनेट.ती सर्वगुण (सौंदर्य,श्रीमंती) व अवगुणसंपन्न आहे. रॉबिन्सच्या सोळाशे कादंबऱ्यांत आढळणारा रोमान्स–प्रेम यांत आहेच. विशेषतः शारीरपातळीवर गुडबाय जॅनेट शब्दशः मराठीत भाषांतरित केली तर अश्लीलता-कोतवालांना ओव्हर टाइम करावा लागेल! ज्याला ग्लास–फॅमिली किंवा 'ग्लास पीपल' म्हणतात, ती यातील पात्रे: तान्याची मुलगी जॅनेट व लॉरेन. ही जॅनेट 'डॉन' (गॉडफादर)प्रमाणे वाटते एवढी बेडर व बिनधास्त आहे. स्थळ आहे दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील फ्रान्स व काळ १९७९–८० पर्यंत पसरला आहे. त्यामुळे शेवट अर्थातच अमेरिकेत होतो.या वेळी बदल म्हणून रॉबिन्सनी फ्रान्सच्या ड्रेस डिझाइन्सनर्स व ग्लॅमरवर्ल्डचा बॅक्ड्रॉप वापरला आहे. जॅनेट जेवढ्या वर्षांची नाही, तेवढे तिचे शरीर–भोक्ते आहेत. तिच्या आईच्या नवऱ्यापासून–सावत्र बापापासून ते तिच्या आफ्रिकी नोकरापर्यंत. तिचे लग्न शेवटी तिच्या आईच्या प्रियकराशी होते. मौखिक व समसंभोग, साडीझम, लेस्बियन, चाईल्ड सेक्स. फ्री– सेक्स, व्हॅयूरिझम वगैरे तमाम सेक्स हत्यारांसोबतीला चरस, दारू, सिगरेटी, फ्लश बंगले, अपार्टमेंटस्, मोटारी व अब्जावधीच्या संपत्तीची यातायातही होताना दिसते. कादंबरीतील पात्रे बलदंड, सुंदर, एकनिष्ठ, वेगवेगळ्या धर्मांची, भाषांची,देशांची दाखविली आहेत. तरी ती मनाने षंढ वाटतात. तान्या युद्धकाळात एका नाझी जनरलवर प्रेम करते, तो प्रचंड भ्रष्ट व शिष्ट आहे, शेवटी तो मारला जातो, मॉरिस नावाच्या व्यक्तीशी तान्या विवाह करते. शहरातील हमरस्त्यातील गर्दीप्रमाणे प्रचंड गडबड वाटली, तरी रॉबिन्सची कादंबरी बसप्रमाणे नेमकी मुक्कामाला पोचते. रांगोळीच्या ठिपक्याप्रमाणे प्रथम रॉबिन्स काही आडाखे, पॅजेस वगैरे आखून घेतो; कुशलपणे ते ठिपके जोडले की झाली तुफान लोकप्रिय कादंबरी व दशलक्षांची जुळणी! हॅरॉल्ड रॉबिन्स लोकप्रिय (पेपरबॅक) कादंबरीचा तर सम्राटआहेच. जसा 'सेसिल बी द मिल' भव्य व यशस्वी चित्रपटांचा बादशहा होता; परंतु द मिलने ऐतिहासिक व पौराणिक विषय निवडले व धंदा केला, रॉबिन्स समकालीन असल्यामुळे ह्या सर्व काळ्याकुट्ट वासनांच्या पाटवाखाली अस्तर आहे ते भ्रष्ट, नपुंसक ओंगळवाण्या समकालीन समाजजीवनाचे, पौरुषहीन समाजाचे व पहूँचे हुवे ही भावना प्राप्त केलेल्या रजनीशशिष्यसदृश नशाबाज तरुणांचे! वक्षस्थळे व लिंगाचा आकार हे तर अमेरिकन जनमानसात फेटिश (Fetish) होऊन बसले आहे. जॅनेट ही अशी टिपिकल अमेरिकन आहे की, जिच्या दृष्टीने 'टू बी सकर इज् ए टॅबू.' जॅनेटची कथा किंवा इतर विस्ताराने सांगण्याचे कारण नाही. ही एक अमेरिकन ॲमेझॉन किंवा ॲटलांटाची गोष्ट आहे. तिच्यातील गोष्टीपेक्षा त्या कादंबरीतून गळणाऱ्या इतर कराळ रसायनाचा विचार इथे महत्त्वाचा आहे.

## गंडग्रस्त समाज

मॅथ्यू ॲरनॉल्डने पोएट्री इज् क्रिटिसिझम ऑफ लाइफ म्हटले, तो मूर्ख होता, इलीयटने साहित्य हे एस्केप फ्रॉम लाइफ नसून एस्केप 'इंटू' लाइफ असते असे म्हटले तो गाढव होता, साहित्य एक धंदा असतो–तोही 'स्ट्रिप-टीज्' प्रमाणे चाळवाचाळवीचा वा फेडाफेडीचा! दुसऱ्या महायुद्धानंतर कुटुंबनियोजनाच्या साधनाचा शोध लागला आणि स्त्री–पुरुषसंबंध एवढे कागदी, कपटी व कसनुसे झाले की, 'पिल'चा शोध लावणा-

त्याने परवा जाहीर क्षमायाचना केली. पिल-मुळे स्त्री-पुरुषसंबंध मुक्त झाले नाहीत, फक्त संभोग 'मुक्त' झाला. कारण अरबस्तानातील स्त्रीपेक्षा अमेरिकन स्त्रीची स्थिती फार मोठी उच्च पातळीवर नाही. कुटुंब-नियोजनाची साधने हे ड्रग होते व त्यामुळे स्त्री-पुरुष आकर्षणच संपुष्टात आले. जसे कु. नि. साधनांचे फंक्शन होते, तसेच डिस्फंक्शन होते, त्याचा वैज्ञानिकांना विसर पडला. अमेरिकेत लैंगिक विकृतींना एवढा ऊत आला की, तेथील स्त्री-पुरुषांना 'इंपोटेंट' वाटू लागले. लैंगिक विकृतीच्या विळख्यात सापडलेली अमेरिका आपल्या गंडांना परकीय मदतीबरोबर-गव्हाबरोबर काँग्रेसगवताच्या बियांप्रमाणे निर्यात करू लागली. हे नपुंसकत्व शारीरिक पातळीवरचे कमी व अध्यात्मिक पातळीवरून अधिक आहे. अमेरिकन समाज एकूण उठावगीर म्हणून उत्साही आहे. चिरतरुण वाटला तरी ते तारुण्य पिचके आहे. हे तारुण्याचे तडे 'पर्लहार्बर' पासूनचे आहेत. अमेरिकन समाज आजही 'अन् प्रेडिक्टेबल' आहे. तो गंडग्रस्त आहे म्हणूनच वेगवेगळ्या विध्वंसक अस्त्रांचे शोध हे एका लैंगिक विकृतीचेच पैलू आहेत. रिव्हॉल्व्हर, तलवार ह्या घातक वस्तू शेवटी लैंगिक प्रतीकेच असतात. एकूण ग्रासलेल्या समाजाचा विकृत दशावतारी खेळ आज अर्ध्या जगभर इंद्रधनुष्याप्रमाणे कमान उभारून आहे. इतक्या लैंगिक विकृती असलेल्या समाजातील विवाहितांना अर्भके आयात करून दत्तक घ्यावी लागतात आणि असा 'खचलेला' समाज देशोदेशीच्या बुद्धिवंतांचा आदर्श (?) आहे. अमेरिकन समाजशास्त्रात 'रेफरन्स ग्रुप' (संदर्भ-समूह) म्हणून सकल्पना आहे. हा संदर्भ-समूह असा असतो को, त्याचे सभासद नसणारेही मनाने, कृतीनी त्या संदर्भसमूहाचे अंधानुकरण करत राहतात. गॅलब्रेथने वर्णिलेली 'अफल्युएंट सोसायटी' (सुजलेला समाज) अमेरिकेतच आहे आणि वरचा वर्ख खरवडला की, जाणवणारा 'इंपोटेंट समाज' ही अमेरिकन वास्तवता आहे. हा वर्ख मढविण्याचे घाऊक व्यापारी हॅरॉल्ड रॉबिन्सचे सहकारी आहेत. भारतात हे अमेरिकेचे अंधानुयायी एवढे आहेत की, सदाशिवपेठेत राहून ते स्टेट्स्मध्ये असल्याच्या थाटात रॉबिन्स, ख्रिस्ती, चेज्, पुझो, वालासना छातीवर घेऊन कुरवाळत फिरतात. अमेरिकन साम्राज्यवाद हा असा ऐहिक व आक्रमक आहे आणि म्हणूनच कॅन्सरप्रमाणे भयभीत करणारा आहे. अमेरिकेत काही डझन नोबेल विजेते असतीलही; परंतु गांवढळ शिक्षितांना, अर्ध्या रात्रीत इंग्लिश मिडियममध्ये इंग्लिश शिकून 'शिट्' आणि 'ब्लडी' म्हणत लचकत चालणारे जे त्यांचे देशोदेशीचे भ्रष्ट अनुयायी आहेत, त्यांचे अमेरिकेचे ज्ञान अमेरिकेच्या 'मास लिटरेचर' व मास कल्चरपलीकडे पोचत नाही. राजवाड्यांनी पूर्वी ज्याचे हत्यार त्याची संस्कृती हा सिद्धांत मांडला होता. त्यानंतर गुप्तरोगांच्या (S. T. D.) आक्रमक नेत्यांकडून होणाऱ्या प्रसाराने संस्कृतीचा कसा कब्जा घेतला हा सिद्धांत आला, आता अमेरिकन गॉडफादर्सनी (त्यात रीगनपासून रॉबिन्सपर्यंत सर्व येतात.) ज्याच्या ऐश्वर्याची सूज अधिक, त्याची संस्कृति लोकप्रिय हा सिद्धांत सर्वदूर फाकला आहे.

यंत्र-तंत्र-विज्ञानाच्या मदतीने माणसाने आपल्या ऐहिक गरजा तर शरीर फाटेपर्यंत पुरविल्याच, ऐश्वर्याचे एफील टॉवर्स व एंपायर स्टेट इमारती खड्या केल्या; पण हे सर्व करताना पाश्चात्य समाजाने आहार, निद्रा, भय, मैथुन ह्या अंतःप्रवृत्तींना म्हातारी वाऱ्यावर उडवावी तसे उडवून दिले! हॅरॉल्ड रॉबिन्स घ्या की मारिया पुझो की आणखी कुणी, त्यांना 'नॉर्मल' संबंध किंवा शरीरसंबंध रंगवताच येत नाहीत. अधिक सुख – अधिक समृद्धीच्या नादाने प्रत्येक अमेरिकन घर 'नाटकशाळा' बनते. नवशिक्षित व नवश्रीमंत हे तेवढेच धोकादायक असतात ही वस्तुस्थिती आपल्याही समाजात जेव्हा साक्षर-पदवीधर शहरी नागरिक ग्रामीण श्रीमंतांवर टीका करतात तेव्हा स्पष्ट होते. शहरी स्वार्थी साक्षर व सहानुभूतिशून्य बडे बागायतदार दोघेही त्याज्य व्यक्तिविशेष आहेत. ह्या दोघानाही 'नॉर्मल' संबंध सुखवू शकत नाहीत, शरीरसंबंध भावत नाहीत. मग आकृती-विकृती बनतात. प्रत्येक समाजात हे अपरिहार्यपणे घडते; परंतु आज तर अमेरिकन् समाज रहाटगाडग्यांतले सर्वात खालचे भरलेले मडके मानले, तर ते त्यांच्या व आपल्या डोळ्यांदेखत 'रिकामे' शुष्क पडणार आहे, हे दिसत नाही का जगाला? जगभरच्या नवशिक्षित शहरी व नवश्रीमंतांनी झापडे लावली आहेत आणि ती झापडे घाऊक पुरवठा करणाऱ्या ठेकेदारात एक दिग्गज ठेकेदार आहे हॅरॉल्ड रॉबिन्स. हॅरॉल्ड रॉबिन्सला कमी लेखण्याचा इथे एवढासाही हेतु नाही. हॅरॉल्ड रॉबिन्सचे साहित्य-साम्राज्य शेक्स्पियरहून चलती असणारे आहे. त्याला मुंबईला येऊन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याकडे 'माझ्या नावाने कादंबऱ्या खपविल्या जातात, त्या माझ्या नसतात!' 'माझ्या कादंबऱ्यांच्या चाच्या (Pirate) आवृत्त्या निघतात' वगैरे तक्रारी नोंदवाव्या लागतात. हेमिंग्वे किंवा शॉना असे जगभर फिरावे लागले नाही; पण 'मास लिटरेचर' ही मास-कल्चरवाल्यांची उपभोग किंवा नशेची वस्तु असल्याने ती बनावट व चोरट्या बाजारातही चालू शकते, नव्हे धावते!

असले इंग्रजी साहित्य वाचणारे (किंवा वाचन परवडणारे म्हणजे रिकामटेकडे) जगभर २५-३० कोटी वाचक असावेत. तेव्हा साहजिकच चालताना ज्यांची पायताणे वाजतात किंवा वस्त्रे सुळसुळतात, अलंकार किणकिणतात, भोवतालच्यांना वास येतो (सेंट किंवा पेट्रोलचा किंवा व्हिस्की-बीरचा) अशा प्रत्येक समाजाच्या फ्रेमवरचे जे आइसिंग असते, तेच हॅरॉल्ड रॉबिन्सचे वाचक असतात. त्यांना, त्यांच्या आत्मतुष्ट सुस्त सुजलेल्या कोशातल्या जीवनाला, दर्जाला कोणी लाथा घालू शकत नाही, ते Kicks (किक्स) येण्याकरता किंकी रोम्समध्ये लोळतात आणि अनाथ मुले दत्तक घेतात. 'समर्था' घरची दुसरी खूण कधी कधी विकृतीच्या कृतीतूनही उफराट्या तऱ्हेने अशी जाणवते. मतभ्रष्ट पिलसनी (कुटुंबनियोजन व पौरुषवृद्धीच्या) पौरुष हरवलेला बेजबाबदार समाज, हा आज जगातील आदर्श समाज आहे. जिथे भरदिवसा खून पडतात, बलात्कार होतात, तो समाज त्यांचा त्यांना न वाटेना का पण जगभरच्या कृतिशून्य नलिकासमाजाला आदर्श रहात वेडावत राहतो. नलिका-समाज ही संकल्पना मर्ढेकरांच्या नळीतले जग नवीन जगते, जातीची असते. फक्त ती नळी सोन्याची असावी अशी आस प्रत्येकाला लोभावत असते.

## वन-मॅन इंडस्ट्री

अशा प्रकारचे लिखाण, चित्रपट, मासिके, रेकॉर्ड्स् (उदा. फालतू नाझिया हसनची विक्रमी घेडगुजरी डिस्को) खिरापतीचा हिमवर्षाव केल्याप्रमाणे समाजावर सांडत राहतात. प्रत्यक्ष वापर करणारे कमी, परंतु गवागवा एवढा होतो की, हे सर्व केलं, अनुभवलं निदान भासविलं पाहिजे अशी हवा निर्माण होते. एवढी लोकप्रियता असूनही 'मास-कल्चर' ही जानपद-संस्कृति बनू शकत नाही. कारण ही करमणूक सिंथेटिक स्वरूपाची असते. अमेरिकेसारख्या अवाढव्य व अतिसुधारलेल्या समाजात शिष्ट संस्कृति (एलिट) व मास कल्चर एक नाही, हे इथल्या बहुतेक आंग्लशूद्रांच्या गावीही नसते. रेडिओ, टी. व्ही., सिनेमा व ग्लॉसी मासिकांतील जाहिराती यांचे 'कोलाज' मिळून एका मास-कल्चरची योग्य वातावरणनिर्मिती होते. विशेष म्हणजे ही मास-कल्चर प्रस्थापितांविरुद्ध नसते, जरी त्याचे चाळे प्रस्थापित मूर्तिभंजनाचे असतात, मास-कल्चरमधील-मास-एंटरटेनमेंट हा सारा-झटपट करू दे खटपट-असला प्रकार असतो.

ह्या सपन्न पार्श्वभूमीवर हॅरॉल्ड रॉबिन्स-सारखे गाजत-गाजवत राहतात. गेली ३० वर्षे अमेरिकेसारख्या नवनवीन हव्यास व व्यसने करणाऱ्या देशात (व तिला मन.पूर्वक भजणाऱ्यांच्या जागतिक घोळक्यात) सतत ३० वर्षे टिकून राहणे ही कामगिरीच आहे. त्याला 'सेक्स मर्चंट' म्हणून अमेरिकन उच्चभ्रू हिणवितात; पण त्याच्या १६ कादंबऱ्यांपैकी कोणत्या ना कोणत्या एका कादंबरीची दर मिनिटाला एक प्रत खपते; कोणी 'उच भुवईचा' टीकाकार म्हणतो, ह्या सर्व कादंबऱ्या रॉबिन्सच्या चरित्राच्या भ्रष्ट आवृत्त्या आहेत. तो पब्लिसिटी करून, पार्ट्या-जाहिराती देऊन (व त्यात बयंडे-सूटमध्ये वावरणाऱ्या स्त्रियांचा वापर करून) पुस्तकाचा खप वाढवितो. रॉबिन्स टी. व्ही. वर मुलाखती झोडून आपण कसा व किती रिसर्च करून अमुक कादंबरी लिहिली ते सांगतो. गुडबाय जॅनेटचे वर्णन 'लेटेस्ट सेक्स एपिक' (ताजे तुळतुळीत लैंगिक महाभारताड) असे टीकाकारांनी केले तरी रॉबिन्सच्या खपावर तिळमात्र परिणाम होत नाही. रॉबिन्सला 'जगातील सर्वांत श्रीमंत टायपिस्ट' म्हटल्यानेही काही बिघडत नाही, कारण प्रत्येक कादंबरीच्या प्रकाशनानंतर त्याच्या बँकेतील कारकुनांचे स्टेटमेंट्स् टाइप करून कणाटा ढिला होतो! त्याचे प्रत्येक पुस्तक (२-३ अपवाद वगळता) 'बेस्टसेलर्स' ठरले आहे. हॅरॉल्ड रॉबिन्सने त्याच्या वाचकांच्या नाडीवर (कोणत्या?) नेमके बोट ठेवले आहे. हा सर्व अचाट लोकप्रिय साहित्याचा कारखाना हॅरॉल्ड एक हाती चालवू शकतो कारण जे त्यांच्या कादंबरीतील पात्रांप्रमाणे 'संपला' (?) जीवन जगू शकत नाहीत, त्यांचे समाधान रॉबिन्स करतो. हे एक प्रकारचे शब्द-मैथुन आहे; पण त्यात रॉबिन्स वात्स्यायनाहून पारंगत ठरला आहे.

कामगारांना मॅनेजिंग डायरेक्टरची बेडरूम व कामजीवन फक्त २-४ डॉलर्सना रॉबिन्सशिवाय कोण दाखविणार? नेहमी राईस प्लेटवर दिवस काढणाऱ्यांना ताजमहालमधील चायनीज व कॉन्टिनेंटलची खुमारी आणण्याचाही दर मोजावा लागतो! विशिष्ट मर्यादेत सर्व लोकप्रिय लेखन हेच वाटत (मसाला वाटल्याप्रमाणे) राहतात; मग तुम्ही त्यांना युगंधर म्हणा की शककर्ते! हॅरॉल्ड रॉबिन्स हा अमिताभबच्चनप्रमाणे 'वन्-मॅन-इंडस्ट्री' आहे.

मास-कल्चर व मास-लिटरेचरवाल्या ह्या डॉक्टरांना आपला एक सुपर ड्यूपर किंवा शुअर फायर फॉर्म्युला तयार करावा लागतो. अधूनमधून ह्या प्रिस्क्रिप्शनमध्ये रुचिपालट किंवा रंगबदल करावा लागतो. प्रत्येक कलावंत एक प्रकारे एक अप्राप्य स्वप्नांचा आरसा असतो, काही स्वप्ने स्वप्नभंग करणारी तर काही निव्वळ चाळविणारी असतात! हॅरॉल्ड रॉबिन्सने गेल्या ३० वर्षांचे एकेक दशकाचे तुकडे करून जमावाच्या अशा आसुसलेल्या वासनांची स्वप्ने विणून उत्तम धंदा चालविला आहे. शिळी पालेभाजी पाणी थोपून टवटवीत करावी तसा हा 'ओल्या' स्वप्नांचा किफायशीर धंदा आहे. १९५०-६० ह्या कालखंडात (नेव्हर लव्ह ए स्ट्रेंजर, ७९ पार्क अॅव्हेन्यू वगैरे) गरीब तरुण तरुणी आपापल्या ध्येयशिखरावर जिद्दीने पोचलेल्या दाखवून, कायदा धाब्यावर बसविताना दाखवून अमेरिकन 'तारुण्याला' त्याने आवाहन केले. (आपल्या हिंदी चित्रपटांतील अमिताभ फॉर्म्युला अजून अमेरिकेच्या ३० वर्षे मागे आहे.) जीवनाच्या पत्तेबाजीत हुकुमाची पाने वेळप्रसंगी लपवून व लावून प्रतिस्पर्ध्यावर मात करणे क्षम्य ठरते. इथे काहीही करून स्व-चैन महत्त्वाची. रूथलेसनेस (नंगटपणा) अचीव्हमेंट (यशस्विता) आणि विकट महत्त्वकांक्षा (नेकेड अँबिशन) ह्या ऑमलेटच्या जोडीला सेक्सची सॉस लावून रॉबिन्सने अशी हॉट 'पुडिंग' फेकली की यंव! अमेरिकेने व तिला पूज्य मानणाऱ्यांनी हॅरॉल्ड रॉबिन्सला डोक्यावर नव्हे उरावर घेतले.

हॅरॉल्ड रॉबिन्सच्या कादंबऱ्यांतून आढळणाऱ्या विकृती दर ५-१० वर्षांनी बदलत गेल्या. सॉमरसेट मॉम स्त्री-पुरुष-लैंगिकसंबंध रंगविण्यास नाखूष असे. कारण त्यात बोरिंग तोच तो-पणा असतो. विंदा करंदीकरांच्या भाषेत 'तोच पलंग, तीच नारी, सतार नव्हे एकतारी' ही विषण्ण हताशता असते. तरीही रॉबिन्सने न कंटाळता लैंगिक विकृतीची किंवा संबंधाची 'कॉंबिनेशन्स' बदलली. शेकहॅंडपेक्षा संभोग सोपा व इन्स्टंट केला. किशोरवयापासून लैंगिक व्यवहार करणाऱ्या अमेरिकन तरुणपिढीला विकृती वाचायला लावून उत्थापित करण्याची प्रचंड इंडस्ट्री उभी केली, तरी 'उत्पादन' काही वाढलेच नाही. हॅरॉल्ड रॉबिन्सची उष्टी लैंगिक वर्णने वाचणारे पर्लेहार्बरच्या हॅंगओव्हरमुळे आलेल्या षंढपणातून बाहेर पडण्यासाठी वाट्टेल ते छापलेले प्रपापत सोसतात, ही गुरुकिल्ली रॉबिन्सच्या हातात आहे. हे लिंगगंड प्रच्छन्न प्रदर्शन आता अमेरिकनांना सुखवू शकत नाही. तरी ते इथल्या आंग्ल (की अमेरिकन) शूद्रांना सुखवते. हॅरॉल्ड रॉबिन्स भारतातील नवश्रीमंत व नवशिक्षितात (दोघेही तेवढेच समाजद्रोही असतात!) इन्-थिंग आहे. वास्तविक हॅरॉल्ड रॉबिन्सने सुंदर सेक्सी शब्दांची गुळगुळीत हत्यारे वापरून गर्भाशयापासून सुंदर चेहऱ्यापर्यंत सर्वांची मोडतोड चालविली आहे. त्याची पुस्तके वाचल्यानंतर स्त्री-पुरुषांना परस्परांत 'डिस्कव्हर' करण्यासाठी काही रहातच नाही. स्त्री-पुरुष-शरीरे म्हणजे प्लगपीन्स व सॉकेट्सच्या प्लॅस्टिक पातळीवर पोचविणारा रॉबिन्स मर्द लेखक म्हणून मिरवितो, हा आपल्या पौरुषहीन समाजाचा पराभव आहे.

प्लेबॉयचे कित्येक वर्षांपूर्वीचे अंक चाटत वाचणारे हजारो अमेरिकेनंतर दरिद्री जसे ह्यू हेफ्नर (प्लेबॉयचा मालक) चे अनगिनत अशील आहेत, तसेच नेमके रॉबिन्सचे रसिक विकसनशील देशात घरोघर दिवास्वप्नात 'रॅग्ज् टू रीचेसची' स्वप्ने पाहत 'नळीतले जग नळीत जगते'च्या चालीवर जगत आहेत. 'किकियर' व 'बिझार' सेक्स वाचून सुखावणारे जीव भारतात अधिक आहेत. कारण भारतीयांचे विशेषत: मध्यमवर्गीय व सुस्थित भारतीयांचे सेक्स डोळ्यांत व तोंडात आहे, जिथे असायला हवे तिथे नाही. 'बोलून गर्भार करणे' अशी म्हण ग्रामीण भागात रूढ असली तरी वाचून गर्भार व तृप्त होणाऱ्यांची जनअरण्ये शहरात सिमेंटच्या बिल्डिंगप्रमाणे वाढत आहेत. रॉबिन्सचा पैसा तिथून येतो! अमेरिकन तरुणांना रॉबिन्स बच्चा वाटतो. भारयीयांना तो चिरयौवनदायक 'स्पॅनिश फ्लाय' (Spanish-fly) वाटतो. ढीलेच्या थंडपणाने सर्व बारकाव्यांनिशी केलेली लैंगिक वर्णने वारंवार न कंटाळता वाचणारे रॉबिन्सकडे बौद्धिक शिलाजित म्हणून पाहतात. रॉबिन्सची एकेक कादंबरी म्हणजे लैंगिक सर्कशी चाललेल्या बंद खोलीच्या दाराच्या 'की-होल' जवळची (अंगच्या कुलुपाला किल्ली लावण्याचे छिद्र) 'सीट' मिळते म्हणून ५-२५ रुपये सहज खर्च करणारे इथे हजारो आहेत. मादक द्रव्य सेवन करणारे व विकृत संभोगातून अधिक विकृत संभोगाकडे नेणारा रॉबिन्स हा आधुनिक अमेरिकेपेक्षा भारताचा साहित्यिक भगवान रजनीश होऊन राहिला आहे. त्यातच रॉबिन्सच्या कादंबरीतील श्रीमंत पात्रे दरिद्री माणसाएवढीच मानुष-अमानुष दाखविली गेल्यामुळे तर त्यांच्या कादंबऱ्यांवर ज्यांना ह्या जन्मात ते ऐश्वर्यमय जीवन जगता येत नाही, त्यांच्या उड्या पडतात. शिवाय भारतीय वाचक पुनर्जन्म तरी मानतो, बिचाऱ्या अमेरिकन वाचकाला पुढच्या जन्मी तरी निदान हे भोग भोगू असे म्हणण्याचा अध्यात्मिक दिलासाही नाही!

धीट अमेरिकन समाजाचे वैशिष्ट्य असे की, ते सतत इम्पॉसिबल स्वप्नाची अस धरून जगतात, ती इम्पॉसिबल स्वप्ने इम्पॉसिबल सेक्सच्या सॉसमध्ये घोळून रॉबिन्सच्या कादंबऱ्यांचे 'हॉट-डॉग्ज्' तयार होतात, आणि हातोहात खपतातही. अशांत, अस्थिर तेवढ्याच बेभरवशी शहरी जीवनातील Tonic (टॉनिक) म्हणजे हॅरॉल्ड रॉबिन्स, असे समीकरण अमेरिकेतच नव्हे तर अर्ध-अमेरिकन भारतीयांनाही पटते. उलट काही अल्कोहोलयुक्त टॅानिक्स अपायकारक असतात त्याप्रमाणे रॉबिन्सच्या १६ कादंबऱ्या पौरुषहीन व संज्ञाहीन समाजाला अधिक विकल करत आहेत.

## अचाट लिंगपिसाट!

अमेरिकन गव्हाबरोबर केवळ काँग्रेस गवताची काळी बीजे वा खाजच विकसनशील भारतात आली नाही तरी वात्सायनला मागे टाकणारी एच्. आर. १६ द्वारे लैंगिक विकृतीचा पिसाट प्रसार झाला. एका भारतीय वैज्ञानिकाने सात्विक संतापाने म्हटल्याप्रमाणे जेव्हा आपण परकीय तंत्रज्ञान आयात करतो तेव्हा एक परकी संस्कृतीही आयात करतो याचे भान राहत नाही. त्याचप्रमाणे हेरॉल्ड रॉबिन्स आयात करताना गूढ, अबोध, एका अर्थाने आध्यात्मिक स्त्री-पुरुष-संबंधांचा आपण बाजारात आणून लिलाव चालविला याचे भानही सोडले. पाश्चात्य समाजात लैंगिक व्यवहार, आपल्याइकडल्याप्रमाणे व तेवढे टॅबू (Taboo) नाहीत, हेही हेरॉल्ड रॉबिन्स व तत्सम लेखकांना आश्रय देणारे विसरले. एका अर्थाने रॉबिन्स बालिश आहे, कारण ठराविक लैंगिक वर्णने वजा केली तर त्याच्या कथा Fairy Tales प्रमाणे 'अचाट' यशाच्या कथा असतात. अती लैंगिक कथा व चित्रपट पाहून पिढी नि:सत्त्व व षंढ होते, त्यांची सर्वांगीण 'सुपीकता' कमी होते, हे पाश्चात्यांना कळते पण वळत नाही, दुर्दैवाने इथे ते कळतही नाही, तिथे वळण्याचा प्रश्न उद्‌भवतो कुठे? फ्रँक मॉरिअॅकचे एक सुंदर सुभाषित आहे. 'A man is sum total of all the woman he has loved.' माणसाचे आयुष्य म्हणजे त्याने जतन केलेले स्त्रियांचे प्रेम! रॉबिन्सचे नायक-नायिका प्रेम करतात कुठे? फक्त त्यांची शरीरे भन्नाट भिडतात! न संपणाऱ्या टँगोप्रमाणे! ज्या अमेरिकन जगातील सर्वाधिक नोबेल पारितोषिकविजेते आहेत (आणि आता तर त्यांच्या वीर्यबँकेतून पहिला वीर जन्मल्याची वार्ता आहे) जगातील उत्कृष्ट विद्यापीठ ह्या देशात आहेत, पण ती अमेरिका निर्यात काय करते? लष्करी राजवटींना पाठिंबा, लैंगिक स्वैराचाराची वर्णने असलेली पुस्तके (ताजे उदाहरण: Hite Report) आणि सर्व अनैसर्गिक शरीरसंबंधांची वर्णने; अमेरिकेची परदेशी प्रतिमा एक स्वतंत्र तेजस्वी राष्ट्र अशी निर्माण होण्याऐवजी overfed (खादाड) व oversexed (लिंगपिसाट) अशी निर्माण झाली आहे व त्याचेही त्यांना कौतुक आहे. अमेरिकन जपान व इंग्लंडमध्ये गेल्यानंतर एक प्रकारचा लिंगज्वर त्या देशात पसरला. नागडेपणा व नंगटपणा म्हणजे जर मुक्त (open) समाजाचे अविभाज्य अंग असेल तर भारत closed (बंदिस्त) समाज राहिला तरी चालेल; पण मी ते म्हणून उपयोग नाही. मराठीतल्या दहा-पाच कादंबरीकारांच्या मिळून जेवढ्या कादंबऱ्या खपत नाहीत, तेवढ्या प्रती हॅरॉल्ड रॉबिन्सच्या नव्या कादंबरीच्या खपतात, व वाचल्या जातात. H. R. has come to stay. अमेरिकेतून कित्येक दुसऱ्या उदार आणि उदात्त गोष्टी व साहित्य आणण्यासारखे असूनदेखील येथील असंस्कृत आंग्लशूद्रांना हॅरॉल्ड रॉबिन्सच कवटाळावासा वाटतो हे रॉबिन्सचे सुदैव असले तरी आमचे दुर्दैव आहे. अर्थात लैंगिक वर्णने व विकृतीच्या ऑक्टोपसच्या विळख्यातून आपणही पुढेमागे सुटूही, पण दरम्यान (उगाचच) बुद्धिवादी म्हणून घेणाऱ्या महाराष्ट्राचे बरेच 'सत्त्व' कमी झाले असेल त्याची भरपाई कोण करेल? रॉबिन्स ज्या भाग्याने 'गुडबाय जॅनेट' म्हणतो त्याच्या दुप्पट वेगाने आमचे 'वेलकम् हेरॉल्ड रॉबिन्स' म्हणणे जोवर थांबत नाही, तोवर अमेरिकेचे जोखड आपल्या मनाच्या मानेवरून उठणार नाही. अमेरिकेचे साम्राज्य हे असे बहुमुखी असल्याने जरी अमेरिकन पी. एल्. ४८० मधून आपण सुटका करून घेतली तरी हॅरॉल्ड रॉबिन्सच्या मगर (की मकरध्वज?) मिठीतून सुटणे तेवढे सोपे नाही. हॅरॉल्ड रॉबिन्सच्या वाचनाने वाचणारांचे इंग्रजी अंमळ सुधारते; पण मन अमली पदार्थ सेवन केल्याप्रमाणे बावचळते त्याचे काय? या प्रश्नाला येती ५० वर्षे तरी समर्पक उत्तर सापडणार नाही याची ग्वाही स्टँपपेपरवर देण्यास मी तयार आहे. □



रेखा

आपण उमरावजान पाहिली
असं वाटत नाही.
रेखानं केलेली
उमरावजान
पाहिली असं वाटतं.

रेखा देशपांडे

# उमरावजान

## कादंबरीतल्या उमरावजानची जखम जुनी जखम आहे. तर चित्रपटातल्या उमरावजानची जखम ताजी, भळाळती आहे

## म्हणूनच....

रूढार्थाने आपण ज्याला कादंबरी म्हणतो त्या रूढार्थात मिर्झा हादी 'रुसवा'ची 'उमरावजान अदा' खरं तर बसतच नाही. ही १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात केव्हा तरी लिहिली गेलेली कादंबरी. 'अदा' हे टोपणनाव घेऊन शायरी करणाऱ्या उमरावजान ह्या लखनौच्या प्रगल्भ, विद्वान कलावंतिणीने आयुष्याच्या उत्तरार्धात अगदी तटस्थपणे आपले जीवनानुभव सांगितले आणि मिर्झा हादी 'रुसवांनी' ते प्रथमपुरुषी निवेदनाच्या स्वरूपात लिहून काढले. ह्यात व्यक्ती म्हणून तिची स्वतःची काही स्वप्नं, आयुष्याविषयीच्या कल्पना, संस्कार असं सारं असणार. त्याचप्रमाणे तिच्या भोवतालच्या परिस्थिती, लोक, समाजाच्या मान्यता, परंपरा, त्या विशिष्ट काळातलं वातावरणं, समाजातले विशिष्ट वर्ग – ह्या सर्व गोष्टींचा परिणाम, समाजाची अदृश्य बंधनं मिळून तिच्या आयुष्याला काही विशिष्ट वळणं, विशिष्ट दिशा मिळाली असणार. ह्या वळणांनी, ह्या दिशांना झालेला तिचा प्रवास म्हणजेच ही कादंबरी. त्यातून सर्वसामान्य स्त्रीपेक्षा वेगळं आयुष्य वाट्याला आल्यामुळं तो प्रवास वाचणाऱ्याला अधिक मनोरंजक होतो. त्यातून ती काही केवळ कलावंतीण, मुजरेवाली नसते. ती शायरा आहे. कोठ्यावरच्या मौलवीसाहेबांकडे उर्दू शायरीबरोबरच तर्कशास्त्र, साहित्यशास्त्र इत्यादींचा अभ्यासही तिनं केला आहे. ह्या अभ्यासातून आणि स्वतःच्या अनुभवांतून, व्यक्तिगत तडफडीतून तिचं असं एक जीवनविषयक तत्त्वज्ञान तयार होतं. संवेदनाक्षम कवीमन अनुभवांकडे पाहतं तेव्हा त्या अनुभवांना एक वेगळं परिमाण, अधिकच मूल्य लाभतं. त्यामुळं हे जीवनानुभव अधिकच मनोरंजक वाटू लागतात.

व्यक्तित्व म्हणून अशी एक समर्थ पण करुणरम्य प्रतिमा रंगत असतानाच तत्कालीन समाजावरही ती एक कॉमेंट करीत असते. एका चांगल्या घरातील मुलीला अजाण, अबोध वयात तिचा काही अपराध नसताना पळवून नेऊन लखनौच्या कोठ्यावर विकलं जातं आणि मग आपोआप ज्या समाजात ती जन्मली होती त्या समाजाच्या आणि ज्या कोठ्याच्या विश्वात तिला कोंबलं गेलं त्या कोठ्याच्या मधोमध एक भिंत उभी राहते. समाजाच्या मान्यता ह्या भिंतीवर सतत पहारा करीत राहतात. प्रेम, प्रणय, माया, ममता ह्या कोणत्याच भावबंधनात इतकी ताकद नसते की, तिला पुन्हा पूर्वीच्या जगात घेऊन यावं.

उमरावजानच्या व्युत्पन्न, रंगीन व्यक्तित्वाचा आणि ह्या तशा शाश्वत असणाऱ्या सोशल कॉमेंटचा मोह 'गमन' सारखी कलाकृती निर्माण करणाऱ्या मुजफ्फर अलींना झाला तर नवल नाही. त्यातून लखनौची संस्कृती ही त्यांच्या जन्मगावची संस्कृती. त्या संस्कृतीचा, तिथल्या इतिहासाचा मोह पडणं स्वाभाविक. शिवाय लखनौची 'सरजमीं' म्हणजे रंगीन मिजाज तबियतीची संस्कृती.

वर म्हटल्याप्रमाणे उमरावजान 'अदा'

म्हणजे अदाच्या आयुष्याचा पट आहे. त्यात अनेक घटना असणार. त्यातला प्रत्येक अनुभव ही एक कथा होऊ शकेल. सलग अशी एकच कथा ही नाही. त्यामुळे एकापाठोपाठ अनुभव नुसते येत राहतात. वेळोवेळी व्यक्तीवर, जीवनावर त्याचे पडसाद उमटत राहतात आणि अर्थातच उमरावजान 'अदा'च्या शायरीवरही. त्यामुळेच 'उमरावजान' चित्रपटात नाट्य रंगत नाही असा आरोप होऊ लागतो.

दहाव्या–बाराव्या वर्षी खानमच्या कोठ्यावर विकली गेल्यानंतर अमीरन रात्री पळून जाण्याचा असफल प्रयत्न करते. खानम तिला खूप मारझोड करते तर तिच्याशी विशेष ममतेनं वागणारी हुसैनी तिला 'बाळे, आता हेच तुझं घर' म्हणून समजावते. हुसैनीमध्ये आपल्याला एका आईचं दर्शन घडतं. कोठ्यावर नृत्यसंगीत, शायरी, तर्कशास्त्रादींचा अभ्यास सुरू होतो. अमीरन ऊर्फ उमरावचा गळा गोड असतो. ती स्वतः शायरी करीत असते. त्यामुळे सामान्य रूप आणि सावळा रंग असूनही अमाप कौतुक तिच्या वाट्याला येऊ लागतं. तिच्या स्वतःच्या तारुण्यसुलभ इच्छाही असतातच. बरोबरच्या बिस्मिल्लाजानच्या 'मिस्सी'ची रस्म पाहून (म्हणजेच तवायफ म्हणून तिने कुणा एका श्रीमंत तरुणाला 'मालक' केल्यानंतर) तिच्या इच्छा अधिकच पालवतात. त्याच कमजोर क्षणी ती गौहर मिर्झा ह्या कोठ्यावर आपल्याबरोबरच वाढलेल्या आपल्या सवंगड्याच्या बाहुपाशात शिरते. उमरावच्या बौद्धिक, भावनिक पातळीवर गौहर मिर्झा पोहोचू शकत नाही हे ती स्वतःही समजून असते, तसंच गौहर मिर्झाही समजून असते; पण तरी शरीराची हाक असतेच! तर गौहर मिर्झा आणि उमरावच्या नात्याचं स्वरूप हे असं असतं किंबहुना ह्या कलानिपुण पण मजबूर मुलींच्या आयुष्यात गौहर मिर्झासारखी 'डोमनी की औलाद' ही 'स्टेपनी'सारखीच असते. उमरावप्रमाणे बिस्मिल्लाजान देखील तिच्या छब्बनमियांच्या आत्महत्येनंतर घटकाभराच्या रोमान्ससाठी गौहर मिर्झाशीच छेडछाड करताना दिसते. (डोमनी की औलाद म्हणजे दासीपुत्र म्हणता येईल. एखाद्या नबाबाला एखाद्या डोम जातीच्या म्हणजे गाणंबजावणं करून लोकांना रिझवणाऱ्यांच्या एका जातीच्या–रखेलीपासून झालेलं मूल. कोठ्यावर ह्या मुलाचं आर्थिक महत्त्व शून्य. स्त्रिया



बुला रहा है कौन मुझको चिलमनोंके उस तरफ...

कमावणार आणि हा लाचारपणे विडीकाडीसाठी त्यांच्याकडे मागणार, त्यांच्या आश्रयाला राहणार. म्हणायला, अडीअडचणीला एक पुरुष माणूस म्हणूनही झाला, नि वरकामालाही विश्वासू. म्हणून अशी मुलं कोठ्यावर बहुधा पाळली जात, असं स्वतः उमरावजान कादंबरीतही गौहर मिर्झाच्या संदर्भातच विवरण देते.)

मग उमरावच्या आयुष्यात येतो नबाब सुलतान नावाचा विशीचा हळुवार कविमनाचा तरुण. तो तिच्या शायरीवर लुब्ध होऊन तिच्या प्रेमात पडतो. आपल्या पेशाच्या नियमांप्रमाणे त्याला रिझविण्याचं काम करता करताच उमरावचे आणि त्याचे भावनिक, बौद्धिक सूर जुळतात. तीही त्याच्या प्रेमात पडते; पण नवाब आपल्या विशिष्ट वर्गाच्या परंपरांनी, मान्यतांनी जखडलेला. 'नाट्य' निर्माण करण्यासाठी ह्या नवाबाला समाजाच्या शृंखला तोडून उमरावशी लग्न करायला मिर्झा हादी 'रुसवां'नी लावलं असतं तर ती 'पाकीझा' सारखी कल्पित कथा झाली असती. कल्पितात विद्रोह दाखवणं सोपं असतं. वास्तवात विद्रोहाच्या नावाखाली उरते ती अगतिक चडफड. ही चडफड चित्रपटात व्यक्त केलीय् उमराव नवाबाचे लग्नाचे कपडे फाडते त्या दृश्यात (कादंबरीत लग्नाचे कपडे फाडण्याचा प्रसंग उमरावच्या नव्हे तर खानमच्याच जवानीतला प्रसंग म्हणून आला आहे.)

'पाकीझा'मध्ये वेश्येशी लग्न करणारा, तिला घरी आणू न शकल्याने एकटा आयुष्यभर तडफडणारा शहाबुद्दीन (अशोककुमार),

समाजाच्या दगडफेकीला दाद न देता साहब-जानला घेऊन जाणारा सलीम (राजकुमार) सलीमच्या लग्नात 'आज की रात बचेंगे तो सहर देखेंगे' असा अल्टिमेटम देत रक्तबंबाळ होइस्तोवर नाचणारी साहबजान (मीना-कुमारी) आणि 'तुझ्या पुतण्याच्या लग्नात मुजरा नाचणारी ही तुझीच दुर्दैवी मुलगी आहे' म्हणून 'सरे–आम' शहाबुद्दीनला सुनाव-णारी तिची मावशी (वीणा) अशी सगळी मेलोड्रॅमॅटिक कॅरॅक्टर्स असल्याशिवाय हृद-याला पाझर फोडणारं भडक नाट्य रंगलं नसतं.

'उमरावजान'ची उणीव नेमकी इथे आहे. वास्तवात घडलं, घडलं तसं ते दाखव-ल्यामुळं ह्यातल्या नवाब सुलतानच्या मनाला उमरावशी लग्न करण्याचा विचार तर शिवत नाहीच, आपलं लग्न झाल्यानंतर तिच्याशी संबंध ठेवणंही आपल्याला जमणार नाही हेही तो सांगून टाकतो. एका हव्या हव्याशा वाटणाऱ्या स्त्रीला कधीकाळी आपण भेटलो एवढीच एक ठुसठुसणारी आठवण मनाच्या चोरकप्प्यात दडवून ठेवण्यापलीकडे तो काही करू शकणार नसतो आणि मिळाला तो एक अनुभव म्हणून पुढे सरकण्याशिवाय उमरावही काही करू शकणार नसते.

पण ह्या अनुभवातूनच, कोठ्यावरच्या रिवाजांची, केवळ पैशाच्या तालावर कुणा-साठीही नाचण्यात आता तिला जबरदस्ती वाटू लागते आणि ह्यातून सुटण्यासाठी कुणा एकाचीच होऊन राहण्यासाठी ती फैज अलीबरोबर पळ काढण्याचा प्रयत्न करते. नवाब सुलतानशी होता तसा कोणताही भावबंध फैज अलीशी जुळलेला नाहीयं. ती तर तो कोण आहे ह्याची साधी चौकशीही करण्याच्या फंदात पडत नाही; पण नियतीनेच जणू तिला बाजारू औरतच बनवायचं ठरवलं होतं. फैज अली राजा-साहबच्या शिपायांकडून मारला जातो आणि राजासाहेबाची होऊन राहिलेली बिस्मिल्ला-जान पाहून तिला आपलं एकटेपण अधिकच जाणवतं. त्यात तिला कानपूरला अचानक रामदेई भेटते. लहानपणी तिच्याबरोबरच पळवली गेलेली रामदेई इथे नबाबाची राणी बनलेली असते. नबावही तोच नवाब सुलतान —ह्या एवढा नाट्याचा भाग निश्चितपणे.

खानमच्या कोठ्यावर ती परतते तो तिनं पुन्हा असली बंडं करू नये म्हणून आणि खानमला भिऊन असणारी सारीच जणं कारस्थान करतात. गौहर मिर्झा तिला माझ्याशी लग्न कर म्हणतो; पण उमरावला हे *असलं 'कुंकवाला धनीपण' गळ्यात* बांधून घ्यायचं नसतं. 'मी कमावणार आणि तू खाणार?' म्हणून ती त्याची निर्भर्त्सना करत नकार देते. गौहर मिर्झाविषयीची तिची भावना इथे अधिक स्पष्ट झाली आहे.

गोरे सोजिर लखनौत शिरल्यावर लखनौ खाली करून जाताना नेमकं तिनं आपल्या जन्मगावी–फैजाबादेत यावं, आईला भेटावं आणि आयुष्यभर साठलेल्या अश्रूंचा बांध एकदाच फुटून वाहू लागावा, हरवलेलं निरागस बाल्य क्षण-दोन क्षण आईच्या कुशीत परत मिळावं तोच समाजाचा प्रति-निधी बनून येणाऱ्या धाकट्या भावानंच ते निर्दयपणे हिरावून घ्यावं—ह्यात वास्तव आणि नाट्य दोन्ही हातात हात घालून येतात. 'घरंदाज' समाजाचा अनुभव घेऊन उमराव लखनौच्या कोठ्यावर परत येते. आरशावरची धूळ पुसते. आरशात पुन्हा तेच प्रतिबिंब अटळपणे उमटतं — उमरावजान नावाच्या कलावंतिणीचं.

कोठ्यावर तिच्या येण्यातल्या हताश संथ-पणाची *छाया* एकूणच संपूर्ण चित्रपटावर जाणवते. ह्या संथपणामुळे आणि 'सबडच्यूड' नाट्यामुळे मनाला कुठे धक्केबिक्के बसत नाहीत.

नाट्य पैदा करण्यासाठी नवाब सुलतान समाजाविरुद्ध बंड करतो, बंड करण्याचा प्रयत्न करतो असं दाखवायचा प्रयत्न मुज-फ्फरने केला असता तर प्रेक्षक–वाचकांनी ओरड केली असती — कादंबरीशी इमान राखलं नाही म्हणून.

**'उमरावजान' मधे 'आज की रात बचेंगे तो सहर देखेंगे' असा अल्टिमेटम देत रक्तबंबाळ होइस्तोवर नाचणारी साहबजान, 'पाकीझा'तली (मीनाकुमारी) इथे नाही किंवा 'मुजरा नाचणारी साहबजान ही तुझीच दुर्दैवी मुलगी आहे' असं 'सरे–आम' शहाबुद्दीनला सुनावणारी तिची मावशी (वीणा), असली मेलोड्रॅमॅटिक कॅरॅक्टर्स नाहीत!**

मात्र मूळ कादंबरीशी इमान राखण्याचा खूप प्रयत्न करूनही दोहोंत एक फार मोठा फरक राहून जातो. तरुण हताश उमराव पुन्हा खानमच्या कोठ्यावर येऊन आपल्या नित्यक्रमाकडे वळते–इथे चित्रपट संपतो, तर कादंबरीची नायिका उमराव हीच मुळी एक प्रौढ किंवा वृद्धा नायकीण आपले जीवनानु-भव तटस्थपणे सांगते आहे—तिच्या वयामुळे आणि तटस्थपणामुळे तिच्या अनुभवांना एक वेगळं परिमाण लाभतं. कादंबरीच्या अखे-रीला समारोप करता करता ती म्हणते... काही लोक नशीबाच्या पडद्यात आपल्या चुका लपवतात, हे खरं आहे. हेही खरं आहे की, ज्याच्या अंगात धमक असते त्याला यश मिळतं. मी कित्येक दिवस आपलं नशीब आणि आपलं कर्म ह्यांच्या मध्ये दोलायमान अवस्थेत होते; पण आपल्या प्रतिकूल परि-स्थितीला कसं विसरूं? माझ्या आयुष्यात मौलवीसाहेबांची शिकवणच फक्त काय ती उपयोगी पडली. नाच–मुजरे करीत होते तेव्हा त्यांच्याकडून मिळालेल्या ज्ञानामुळे माझं सगळीकडे नाव झालं. मला नेहमी प्रशंसकांचा गराडा पडलेला असे. लिहा–वाचायला फारसा वेळ मिळत नसे. आता एकटीच असते. मौलवीसाहेबाकडून मिळा-लेल्या वाचनाच्या छंदावर जगतेय. हा छंद नसता तर सरलेल्या यौवनाची खंत, भूत-काळातील दुःख, पुरुषांनी केलेले विश्वास-घात–बेवफाई–ह्याच गोष्टी आठवून अश्रू ढाळत बसावं लागलं असतं.'

ह्या तिच्या गोष्टी तटस्थपणामुळे, अनु-भवी निबरपणामुळे जेव्हा ती म्हणते की—

'किसको सुनायें हाल–ए–दिल–ए–ज़ार,
ऐ 'अदा' आवारगी में हमने जमाने की सैर
की'—तेव्हा त्याला भरपूर खोली, गहराई जाणवते; पण वयाचा हा तटस्थपणा चित्र-पटातल्या उमरावला न लाभल्यामुळेच ती जेव्हा शाहरियारच्या शब्दात—

'तमाम उम्र का हिसाब मांगती है
जिंदगी ये मेरा दिल कहे तो क्या, के खुदही
शर्मसार है'

किंवा

'जुस्तजू जिसकी थी उसको तो न पाया हमने, इस बहाने से मगर देख ली दुनिया हमने.'

असं आपल्या जीवनव्यापी अनुभवाचं वर्णन करू लागते तेव्हा ते अधुरं वाटू लागतं इम्बॅलन्स्ड वाटू लागतं. म्हणजे अनुभव कमी, तत्त्ववेत्याचा आव मोठा असं वाटत.

कादंबरीतल्या उमरावजानची जखम खूप जुनी जखम आहे. दुखणं वागवत जगण्याची सवय झालेल्या जुन्या दुखणेकऱ्याची स्थिती आहे ती. तर चित्रपटातल्या उमरावजानची जखम ताजी भळभळ वाहणारी आहे. हे भळभळणं सतत जाणवायला हवं तसं न जाणवता कधीकधी कादंबरीतला प्रौढ संथ तटस्थपणा डोकावतो आणि आपला गोंधळ होतो.

आणि त्यातून रेखा हा आपल्याला चिरपरिचित चेहरा. त्यामुळेच अभिनयातले बारकावे कौशल्याने आणि सहजतेने टिपणारी रेखा आपल्याला उमरावपेक्षा रेखा म्हणून आठवत राहते. आपण 'उमरावजान पाहिली असं म्हणण्याऐवजी 'रेखाने केलेली उमरावजान' असं म्हणत राहतो. भूमिकेपेक्षा कलाकाराचं व्यक्तित्व जपणाऱ्या आपल्या फिल्म इंडस्ट्रीच्या परंपरेचा स्टार सिस्टिमचा बळी ठरलीय रेखा. 'पाकिझा' बघतानाही आपण साहबजानपेक्षा मीनाकुमारीलाच पहात नव्हतो का ?

'रेखापेक्षा ती जी बारा वर्षांची अमीरन (छोटी उमराव) होती न, तीं मुलगीच जास्त खरी अमीरन वाटत होती.' असं म्हणणारे हे विसरतात की त्या मुलीला आपण आजवर कधी पाहिलंच नव्हतं. ती आपल्यासमोर आली तीच अमीरन म्हणून. तसं रेखाचं नाही.

ह्यावर उपाय एकच होता. कठीण होता. मुजफ्फर अलीने उमरावजानच्या भूमिकेसाठी अगदी नवीनच मुलगी शोधून आणणं हा. हे काम कठीण होतं. तेव्हा मग सध्या इंडस्ट्रीत असलेल्या अभिनेत्रींमध्ये रेखाशिवाय पर्याय उरला नाही. मुजफ्फर अली स्वतः ह्या गोष्टीची कबुली देतात.

'इंडस्ट्रीत ज्या अभिनेत्री आहेत, त्यांत उमरावची भूमिका पेलू शकेल, अशी रेखाखेरीज दुसरी अभिनेत्रीच नव्हती.'

दुसरी अडचण—

'ह्या चित्रपटांचं जे बजेट होतं, त्यात उमरावजान म्हणून नवी अभिनेत्री उभी केली असती तर डिस्ट्रिब्यूटर्सनी चित्रपटाला हात लावला नसता.'

—आणि ही गोष्ट खरी आहेच. मुंबईत 'उमरावजान प्रदर्शित व्हायला लागलेला वेळ आणि प्रदर्शित झाल्यावर 'रेखाच्या उमरावजान' साठी होणारी गर्दी हेच तर सांगते.

तरीही, ह्या उणीवा राहूनही, 'उमरावजान' ही पहावी-पहावीशी, ऐकावी-ऐकावीशी अशी कलाकृती वाटते ती तीतल्या कलात्मक जाणिवांमुळे, मेहनतपूर्वक त्या जाणिवांना मूर्तरूप देण्याच्या सफल प्रयत्नांमुळे. म्हणजेच दिग्दर्शक—कलादिग्दर्शक-छायाकार-संगीतकार आणि कॉस्टयूम डिझायनरच्या वातावरण—निर्मितीमुळे; शाहरियारच्या अर्थपूर्ण गीतांना खय्यामने दिलेल्या करुणमधुर चालींमुळे.

मुजफ्फरअलींचं लखनौ—संस्कृतीवरचं प्रेम ह्या चित्रपटाच्या विषयातून आणि वातावरण—निर्मितीतून जाणवतंच. वंसी चंद्रगुप्तांचे सेट्स आणि सुभाषिणी अलींनी कलाकारांना दिलेले वेष त्या काळातल्या विशिष्ट संस्कृतीचं जिवंत, रसरसतं चित्र उभं करतात. आपण जसं ते पुस्तकांतून वाचलेलं असतं, मनःचक्षूंपुढं उभं केलेलं असतं असं.

रंगीबेरंगी फुलांनी नटलेलं, हिमशिखरांचे मुकुट आणि देवदारूंची कुंडलं ल्यालेलं नयनरम्य काश्मीर दाखवणं ह्यापेक्षा त्या त्या प्रसंगाचा मूड टिपणं हे चित्रपटाच्या छायांकनाचं जास्त महत्त्वाचं काम आहे आणि उमरावजानच्या छायाकारानं ते चोख बजावलंय. दिशा अंधारून येईपर्यंत दाही दिशांना आपल्या हरवलेल्या अमीरनचा तिच्या बापानं घेतलेला डेस्परेट शोध आणि त्या 'डेस्परेटनेस'ची हताशपणात झालेली परिणती नुसत्या छाया—प्रकाशांच्या किमयेतून छायाकार व्यक्त करतो. अमीरन हरवल्याचं कळल्यावर तिची आई कोंदट, अंधाऱ्या घरात शोक करते. इकडे अमीरनला लखनौच्या रंगीबेरंगी वातावरणात आणलं जातं. ह्या रंगीबेरंगी वातावरणात ती उमरावजान बनते आणि उमराव जेव्हा पुन्हा फैजाबादेत येते तेव्हा भूतकाळाच्या अंधुक खुणा तिला पटू लागतात. त्या त्याच कोंदट, अंधाऱ्या वातावरणात, आपलं म्हणता यावं अशा प्रत्येक व्यक्तीला हरवून बसलेली निराश उमराव गाते—

'यह क्या जगह है दोस्तो
यह कौनसा दयार है'


## तिसरी आवृत्ती

संपत आली



## सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

हद–ए–निगाह तक जहाँ
गुबार ही गुबार है'

हरवलेल्या काळाचा शोध घेत तिची नजर त्या पटू लागलेल्या क्षणाक्षणांत एक क्षीण आशेचा तंतू पकडू पहाते–

'बुला रहा है कौन मुझको
चिलमनों के उस तरफ
मेरे लिए भी क्या कोई
उदास, बेकरार है ?'

फैजाबादच्या अमीरनच्या घरातलं, तिच्या मायाळू दुर्दैवी आईचं हे हताशपण ह्या अंधाऱ्या कोंदटपणात छान टिपलंय्.

ह्याउलट नवाब सुलतानच्या सहवासातले रोमँटिक, काव्यमय क्षण बागेतल्या दृश्यात हळुवारपणे पेश केलेत.

सर्वसाधारणपणे हिंदी चित्रपटांतून काय होतं की नायक–नायिका बागेत बेफाम धावाधाव करतात आणि छायाकाराचा कॅमेरा कधी नायक–नायिकांना फोकसमध्ये आणि फुलांच्या ताटव्यांना आउट ऑफ फोकस आणि व्हाइस–व्हर्सा ठेवत त्यांच्याबरोबरच बेफाम ट्रॅनिंग किंवा पॅनिंग करीत सुटतो. ऐतिहासिक कॉस्टयूम चित्रपट असेल तर मुगल शैलीच्या बागेत रांगेनं कारंजी उडत असतात. त्यांच्या एका बाजूनं हळूहळू 'बडी अदासे' पावलं टाकीत नायिका आणि दुसऱ्या बाजूनं फूल हुंगत नायक फिरतात. 'आपल्याला लाज वाटतेय्' हे नायिका सुरेल गाण्यातून सांगते. नव्हॅसनेसमुळं ती बेसुरी झाली असं कधी होत नाही.

'उमरावजान' मधला बागेतला सीन मात्र खरंच वेगळा, हळुवार टिपलाय्. विशेषत: रेखा आणि फारुख शेखच्या नुसत्या क्लोजअप्समधून. हे क्लोजअप्स ह्या दृश्यांतला सगळा रोमांस, स्वप्निलपणा, नबाबाच्या प्रेमनिवेदनातला हळुवारपणा आणि रेखाची मुग्धावस्था सारं बोलून टाकतात.

ह्या हळुवारपणाला आणखी हळवे बनवतात शाहरियारच्या गझलचे शब्द आणि खय्यामचे सूर–

'याद तेरी कभी दस्तक, कभी सरगोशी से रात के पिछले पहर रोज जगाती है हमें यह जमीं चाँद से बेहतर नजर आती है हमें'

मुळात चित्रपटाचा विषय आणि प्रकृती *चरित्रप्रधान आणि संगीत–काव्यप्रधान* असल्यानं त्या त्या वेळेस ते ते कवित्व, ते ते सूर त्या त्या चरित्रातून उगवल्यासारखे वाटणं हे ह्या चित्रपटाचं दुर्लभ यश म्हटलं पाहिजे.

गझलांसोबत सुरुवातीलाच वापरलंय ते ढोलीचं गाणं. मुलीच्या पाठवणीच्या वेळचं ( चित्रपटात अमीरनच्या साखरपुड्याला गायलं गेलेलं) उत्तरप्रदेशातलं पारंपरिक गीत सुरिंदरकौरच्या खड्या आवाजात.

'भैया को दीयो, बाबुल महल–दोमहला
अरे हमको दीयो परदेस
अरे लखिया बाबुल मोरे
काहे को ब्याहे बिदेस'

ह्यातही दुल्हनची आर्त तक्रार अमीरनच्या आयुष्यात किती वेगळ्या प्रकारे खरी ठरते ... तिचा भैयाच जेव्हा तिची बाजारू औरत म्हणून संभावना करतो आणि 'तू मेली का नाहीस ?' असं म्हणून तिला पुन्हा 'परदेस'ची वाट-कोठ्याची वाट धरायला लावतो.. खरं तर चित्रपटातलं उमरावचं हे जीवनगाणं इथेच समेवर येऊन संपतं तर कथेला अभिप्रेत असलेली सोशल कॉमेंट अधिक बोचरी झाली असती. ☐


**तिचं सौंदर्य हाच तिचा शाप ठरला !....**
**स्त्रीबुवाबाजीवर झोत टाकणारी**
**'माणूस'मधून क्रमशः प्रसिद्ध**
**झालेली कादंबरी आता पुस्तकरूपात**
**प्रकाशित झाली.**

**सबला**
माधव शिरवळकर

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य रुपये बारा

सर्चलाइट

अमृत पुरंदरे

# 'ग' ची बाधा

एक दिवस मी सकाळी बाहेर पडलो आणि दारातच एका मित्राने हटकले,

'काय अमृतराव, हल्ली लिहिणं चालू केलंय वाटतं ?'

'अं, हो, हो, का...का बरं ?'

'नाही, तुमचा 'माणूस' मधला लेख वाचला. आवडला बर का.'

'का उगाच टिंगल करताय राव !'

'टिंगल वगैरे काही नाही, खरंच आवडला' इ.

तेथून थोडा पुढे गेलो आणि दुसऱ्या मित्राने पहिल्याचाच कित्ता गिरवला. आणि त्या दिवशी मला अनेकांनी 'सतावले' मी (मनात) म्हटलं एकदम एवढा रिस्पॉन्स यायचं कारण काय असेल ? विचार केला आणि खालील कारणे शोधून काढली...

१) मी असे काही करेन यावर कोणाचाही विश्वास बसत नसावा.

२) माणूसचा खप प्रचंड वाढला असावा.

३) माझा लेख खरोखरच चांगला झाला असावा.

थोड्या वेळाने मला ही तीनही कारणे खरी वाटू लागली. 'आपण म्हणजे कोणी तरी भारी' असे वाटायला लागले, 'माणूस' चा खप माझ्यामुळेच वाढलाय असे सुद्धा वाटायला लागले !

दुसऱ्या दिवशी मी रस्त्यातून जाताना आजुबाजूचे सर्व लोक माझ्याचकडे बघतायत माझ्याचबद्दल बोलतायत असे वाटून मी मनात खूष झालो. कोणी ओळखीचा मित्र समोरून येताना दिसला की मुद्दामून मी तंद्रीमध्ये असल्यासारखा चालू लागलो. कोण त्याही फालतू विषयावर अतिशय अधिकाराने बोलू लागलो, त्यात कोणी विरोध केला तर प्रचंड खवळू लागलो, माझ्या छातीचे माप काही इंचांनी वाढले.

थोडक्यात मला 'हवा' लागली किंवा 'ग' ची बाधा झाली.

गंमत म्हणजे मला गर्व चढायला काहीही कारण पुरतं. कोणी थोडंसं कौतुक केलं कोणी माझं मत मान्य केलं, मी माझी सायकल स्वत: दुरुस्त केली, घरातला गेलेला फ्यूज बदलला, परिक्षेत बरे मार्कस पडले...आपण लगेच खूष. आपण म्हणजे मग कोणाला ऐकत नाही !

पण हे थोडा वेळच. मला 'ग'ची लागण झाली आहे हे मला थोड्याच काळात कळतं. असं कळलं की मनात 'कससंच' होतं. आणि मग मी माझ्यावरच एक जालीम उपाय योजतो. 'ग'ची हवा काढून घेण्यासाठी. हा उपाय चालू केल्यानंतर पाच मिनिटांच्या आत मला मी एकदम क्षुद्र आहे असं वाटायला लागतं. सातव्या मिनिटाला मी कमालीचा अस्वस्थ होतो आणि शेवटी तर मला मनापासून आत्महत्या करावी असं वाटू लागतं.

कोणता बरं हा जालीम उपाय ? एखादं औषध ?

'नाही'

'जादुटोणा ?'

'नाही' ... 'मग ?'

'एक कुठेसा छापून आलेला लेख'

'कोणता ?'

'सांगतो. हा लेख आहे आपल्या विश्वा-(Universe) संबंधी. आपली आकाशगंगा (Galaxy) ही साधारणपणे १०० अब्ज ताऱ्यांनी बनलेली आहे. रात्री आकाशामध्ये जो अंधुकसा पांढरा पट्टा दिसतो, तो म्हणजे आकाशगंगा. हे सर्व तारे एका चपटया चकतीच्या आकारामध्ये एकत्र फिरत आहेत. या चकतीचा मध्यभाग फुगीर असून टोकाकडे तो चपटा होत गेलेला आहे. एखाद्या बैलगाडीच्या चाकासारखाच तिचा आकार आहे.

'तिची लांबी रुंदी किती आहे ?'

तिची लांबी आहे शंभर हजार प्रकाशवर्षे तर रुंदी फक्त ४०० प्रकाश वर्षे इतकी आहे. (एक प्रकाशवर्ष म्हणजे; समजा तुम्ही सेकंदाला तीन लाख कि. मी. एवढ्या वेगाने सतत एक वर्ष प्रवास केला तर मूळच्या ठिकाणापासूनचे तुमचे अंतर म्हणजे १ प्रकाशवर्ष) सूर्यापासून प्रकाश निघाला की तो पृथ्वीवर पोचायला आठ मिनिटे लागतात (१५ कोटी कि. मी) याच प्रकाशाला आकाशगंगेच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जायला १००,००० वर्षे लागतात.

या प्रचंड चक्राचा आकार कायम रहावा म्हणून ही आकाशगंगा स्वत:भोवती फिरत असते. तिच्या मध्याजवळ असणारे तारे हळू तर आता जवळचे तारे वेगाने फिरत असतात. आपली ग्रहमाला मध्यापासून तीस हजार प्रकाशवर्षे दूर आहे आणि ती दर सेकंदाला २५० कि. मी. इतक्या वेगाने फिरत आहे. या वेगाने एक संपूर्ण फेरी मारायला आपल्याला वीस कोटी वर्षे लागतात!'

साधारण एवढे वाचले की, मी बधीर झालेला असतो. माझा 'ग' पूर्ण उतरलेला असतो. पण मी एवढ्यावर कधीच थांबत नाही. मी माझी मलाच शिक्षा करतो. पुढे वाचायला लागतो.

'गॅलेक्सी म्हणजे एक असा प्रकार आहे की, ज्याच्यामधे असलेले तारे हे बरेचदा जोडी जोडीने किंवा अनेक पुंजक्यांच्या (तारकापुंज) रूपाने असतात. सुट्टे-सुट्टे, एक-एक तारेसुद्धा असतात. पण असा तारा विरळाच. आपल सूर्य हा एक असाच एकलकोंडा तारा आहे असा समज होता परंतु काही शास्त्रज्ञांच्या मते सूर्य आणि एक विझलेला तारा (काळे विवर) असे एक जोडपे आहे. (सध्या जी दोन पायोनियर याने सोडली आहेत त्यांच्या गतीमधे होणाऱ्या फरकावरून या काळ्या विवाराची जागा समजू अशी शास्त्रज्ञांची खात्री आहे.)

१०० ते १००० तारकांच्या पुंजक्याला 'क्लस्टर' (Cluster) असे म्हणतात तर साधारण दहा लाख ताऱ्यांच्या पुंजक्याला 'ग्लोब्युलर क्लस्टर' (Glotulor Cluster (असे म्हणतात. याचे कारण त्याचा आकार एखाद्या चेंडूसारखा असतो. सूर्याला सगळ्यात जवळ असलेला तारा 'मित्र' या नावाने ओळखला जातो. तो आपल्यापासून चार प्रकाशवर्षे दूर आहे. आपल्या आकाशगंगेमध्ये बहुतेक तारे साधारणपणे एकमेकांपासून तेवढ्याच अंतरावर आहेत.

आपल्या आकाशगंगेच्या मध्यभागाजवळ

MANOOS (Marathi Weekly) Two Rupees Regd. No PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11)

दोन ताऱ्यांमधले अंतर बरेच कमी आहे. तसेच ताऱ्यांची संख्यासुद्धा बरीच जास्त आहे. या अनेक ताऱ्यांमध्ये आपल्या-प्रमाणे पोकळी नसून हायड्रोजन आणि धूली-कण आहेत. काही काही भागात हे वायू आणि धूलीकण इतके घन झालेले असतात की त्यामुळे 'नेब्युला' (Nabula) तयार होते. ही नेब्युला अनेकदा बाकी ताऱ्यांच्यामध्ये येते व त्यामुळे आपल्याला हे तारे दिसत नाहीत. फोटोमध्ये त्यामुळे 'काळे ढग ' आल्याचाभास होतो.

गॅलेक्सीमध्ये असलेले तारे हे त्यांच्या उत्क्रांतीच्या अनेक टप्यामध्ये असलेले सापड-तात. ज्याप्रमाणे एखादा नवीन तयार होणारा तारा आपण बघू शकतो त्याप्रमाणेच ' न्युट्रॉन स्टार ' किंवा ' शुभ्रबदु ' (White Dwarf) हे सुद्धा आपण बघू शकतो."

एवढं वाचलं की, मला मी एकदम क्षुद्र; कःपदार्थ, क्षणभंगूर आहे, असं वाटायला लागतं. पण थांबणे नाही. शिक्षाही व्हायलाच पाहिजे...

हुश्य ! ' आपली आकाशगंगा म्हणजे विश्व नव्हे. आपल्या विश्वात अनेक आकाश-गंगा आहेत. अनेक म्हणजे अनेक कोटी ! आपल्या आकाराची आपल्याजवळची गॅलेक्सी म्हणजे ' अँड्रोमोडा. ' अशा अनेक गॅलेक्सीज जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांचा एक पुंजका बनतो. त्याला 'क्लस्टर ऑफ गॅलेक्सी असे म्हणतात आणि अशी अनेक क्लस्टर्स जेव्हा एकत्र येतात तेव्हा सुपर क्लस्टर्स तयार होतात.

हल्ली ' रेडिओ टेलिस्कोप ' नावाची एक वेगळी दुर्बीण तयार करण्यात आली आहे.या दुर्बिणीतून अत्यंत दूरवरून येणाऱ्या रेडिओ लहरी पकडल्या जातात. अनेक तारे अशा रेडिओ लहरी सोडतात असे लक्षात आले आहे.नुसते तारेच नव्हे तर काही गॅलेक्सीसुद्धा अशा रेडिओलहरी प्रक्षेपित करत असतात. यांना 'रेडिओ गॅलेक्सी' असे म्हणतात. 'पल्सर्स' (स्पंदन करणारे) नावाचे तारे काही ठराविक वेळाने किंवा ' पल्सेस 'नी रेडिओ लहरी सोडतात. त्याचप्रमाणे ' क्वासार्स ' नावाची अतिदूरची मंडळी आहेत. हीसुद्धा या नव्या दुर्बिणीतून 'दिसतात.' आपल्याला सगळ्यात जवळ असलेली आकाशगंगा आपल्यापासून १७ लाख प्रकाशवर्षे दूर आहे, म्हणजेच आपण जर प्रकाशाच्या वेगाने येथून निघालो तर त्या ठिकाणी पोचायला १७ लाख वर्षे लागतील. आणि ही सर्वात जवळची आकाशगंगा ! आपण फारफार तर एक अब्ज प्रकाशवर्षे इतक्या लांब बघू शकतो. ते आपले क्षितिज आहे. त्याच्या पलीकडे काय चालू आहे हे आपल्याला कधी कळू शकणार नाही. '

झालं, एवढं वाचलं की मला आत्महत्या करावी असं वाटू लागतं ! आपण कोऽऽण ? आपण या जगात राहून काऽऽय फायदा ? असे अनेक आले आणि गेले परंतु जगरहाटी त्यांच्यामुळे बदलली नाही. या प्रचंड विश्वात आपण कोणी नाही. आयुष्य हे संपणार आहे मग का उगाच दगदग करून आटापिटा करून जगायचं ? पटकन मरून गेलो म्हणजे चितेतून मुक्तता. एखाद्या वेळेला मेल्यानंतरच सर्वांचे गूढ समजेल ! झालं. संपलं. आत्महत्या करायची. ठरलं.

पण असं वाटायला लागलं की, थोड्याच वेळात माझ्या लक्षात येतं की काही तरी चुकतय आणि मग मी दुसरा जालीम उपाय वापरतो. माझ्यावरच हा उपाय केला की आत्महत्येचा विचार कुठल्या कुठे पळून जातो' हा उपाय काय ? कोणता ? कसा ? हे जाणून घ्यायचे असेल तर त्वरीत भेटा अथवा लिहा... ☐

नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

प्रसिद्धी ?

किंमत ?

चौथी डिलक्स आवृत्ती प्रकाशनाच्या वाटेवर

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०